


प्रस्ताव 'लालफिती'त; प्रवाशांची 'दमछाक'...!

पुणे, बुधवार, २ जुलै २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 214 • वर्ष ४ थे, अंक २१४ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



१२ भारत दोन हुकूमी एक्के काढणार

# शक्तिपीठ विरोधात शेतकरी आक्रमक

## शेतकऱ्यांना रस्त्यावर ठिय्या मांडल्याने महामार्गावरील वाहतूक ठप्प

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शक्तिपीठ महामार्गाविरोधात शेतकरी आक्रमक झाले आहेत. या महामार्गाविरोधात मंगळवारी (दि. १) कोल्हापूरसह सांगली, सोलापूर, धाराशिवमधील शेतकऱ्यांना रास्ता रोको आंदोलन केले. यामुळे वाहतूक ठप्प झाली. कोल्हापूरमध्ये शेतकऱ्यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांच्या नेतृत्त्वात आंदोलन केले. त्यांनी पुणे-बंगळूर महामार्ग तब्बल अडीच तास रोखून धरला. शेतकऱ्यांना रस्त्यावर ठिय्या मांडल्याने महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली.

कोल्हापूरमध्ये शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शक्तिपीठ विरोधी सर्वपक्षीय संघर्ष समितीच्या माध्यमातून जोरदार आंदोलन केले. 'एकच जिद्द...शक्तीपीठ रद्द' या नाऱ्यातून सरकारला कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा असा इशारा दिला. या आंदोलनात राजू शेट्टी यांच्यासह ऋतुराज पाटील, माजी आमदार राजूबाबा आवळे, शिवसेनेचे संजय पवार, विजयराव देवणे, काँग्रेसचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, रविकिरण इंगवले, इरिगेशन फेडरेशनचे विक्रांत पाटील, किसान काँग्रेसचे सागर कोंडेकर, कॉ. सतिश्चंद्र कांबळे, प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाभरातील हजारो शेतकऱ्यांनी पुणे- बंगळूर महामार्ग रोखून धरला.



### लातूरमध्ये शेतमोजणी थांबवली

• शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणीला लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कडाडून विरोध केला आहे. यामुळे प्रशासनाने आजची मोजणी तूर्तास थांबवण्यात आली आहे.

शक्तिपीठ महामार्गाविरोधात धाराशिवमधील शेतकऱ्यांनी धुळे-सोलापूर महामार्गावर चक्काजाम आंदोलन केले. शेतकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या मांडल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. यामुळे सुमारे १० किमीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या असल्याचे दिसून आले. शक्तिपीठ महामार्गासाठी धाराशिव तालुक्यातील १७ गावे आणि तुळजापूर तालुक्यातील २ गावे असे मिळून १९ गावांतील जमिनीचे भूसंपादन केले जात आहे. या दोन तालुक्यातून जाणारा हा मार्ग ४६ किमीचा आहे. रत्नागिरी- नागपूर महामार्ग असताना आता शक्तिपीठ महामार्गाची गरज काय? असा सवाल शेतकऱ्यांनी केला.

दरम्यान, येथील आंदोलक शेतकरी आणि धाराशिव जिल्हा प्रशासनासोबत प्रहार संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांनी फोनवरून संवाद साधला.

» पान ७ वर

# वारीदरम्यान मृत्यू झाल्यास आर्थिक मदत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विठ्ठलाच्या भेटीसाठी पंढरपूरला पायी जाणारे हजारो वारकरी शेकडो मैल अंतर कापत पंढरपुरात येतात. २५० किमीच्या प्रवासात काट्या कुट्यातून, चिखलातून माऊलीचा गजर करत पंढरीच्या वारीला निघतात. यंदा महाराष्ट्र सरकारने वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून वारीदरम्यान कोणत्याही प्रकारच्या अपघातात वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. यासंदर्भातलं नवं परिपत्रक महसूल विभागाने जाहीर केले आहे.

या निर्णयामुळे वारीदरम्यान घडणाऱ्या अनपेक्षित घटनांमध्ये वारकऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे. १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत

» पान ७ वर

### मदतीची तरतूद काय?

- अपघाताने व दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकटच्या वारसदारांस ४ लाखांची मदत
- वारीदरम्यान अपंगत्व आलेल्या वारकऱ्यांना ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४ हजार
- ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख
- एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी इस्पीतळात दाखल झाल्यास १६ हजार रुपये तर एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५४०० रुपयांची मदत



### कोणत्या घटनांमध्ये मदत मिळणार?

• शासनाच्या नव्या परिपत्रकानुसार, विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांकरता वारी सुरू झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच १६ जून ते १० जुलै दरम्यान, अपघाताने अथवा दुर्घटनेत मृत्यू झालेल्या तसेच जखमी झालेल्या वारकऱ्यांसाठी मदतीची तरतूद करण्यात आली आहे. आत्महत्या विषबाधा खून वगळून इतर नैसर्गिक मृत्यू अपघाताने झालेल्या दुर्घटनांमध्ये ही आर्थिक मदत दिली जाईल.

# विधानभवनात राडा

## नाना पटोले दिवसभरासाठी निलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानभवनात मंगळवारी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ उडाल्याचं पाहायला मिळालं. शेतकऱ्यांबद्दल कृषीमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी काही दिवसांपूर्वी वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. या दोन्ही नेत्यांवर कारवाई करण्याची मागणी करत काँग्रेस नेते आणि आमदार नाना पटोले सरकारविरोधात आक्रमक झाले. या दोघांवर कारवाई करण्याची मागणी करताना पटोले थेट विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या आसनाकडे गेले आणि हातवारे करत आक्रमकपणे बोलू लागले. नाना पटोलेंच्या या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही आक्रमक झाले आणि अध्यक्षांच्या अंगावर धावून जाणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी पटोले यांना फटकारले. या सगळ्या राड्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी नाना पोटोले यांना दिवसभरासाठी निलंबित केले.

### बाप हा बापच असतोः शिंदे

• विधानसभा अध्यक्षांच्या या कारवाईवरुन विरोधकांनी सभात्याग केला. या घटनेनंतर नाना पटोले यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली होती. त्यांनी केलेल्या एका वक्तव्याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी हो, बाप बापच असतो, नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहे, असं म्हटलं. तसेच नाना पटोलेंनी हा स्टंट प्रसिद्धीसाठी केला. कारण दिल्लीत काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठीत आता त्यांचं नाव कुठेच दिसत नाही, असा टोला एकनात शिंदे यांनी लगावला.



विधानसभा अध्यक्षांच्या आसनापाशी जाऊन केलेल्या आक्रमक वक्तव्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नाना पटोलेंवर भडकल्याचं पाहायला मिळालं. "विधानसभा अध्यक्षांनाच दोषी धरून त्यांच्या अंगावर धावून जाणं चुकीचं आहे. नानाभाऊ हे स्वत: अध्यक्षपदावर राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांनी अध्यक्षांची माफी मागायला हवी," अशी मागणी मुख्यमंत्र्यांनी केली. मात्र त्यानंतरही नाना पटोले आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. शेतकऱ्यांचा अपमान करणाऱ्या माणिकराव कोकाटे आणि बबनराव लोणीकर यांच्यावर कारवाई झाल्याशिवाय आणि मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागितल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही.

» पान ७ वर

# अहमदाबाद विमान अपघाताबद्दल मोठा दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदाबाद :** अहमदाबादमध्ये १२ जून २०२५ रोजी एअर इंडियाचे विमान एआय-१७१ चा भीषण अपघात झाला. या विमान अपघातात तब्बल २७४ लोकांचा जीव गेला. टेकऑफनंतर काही सेकंदात या विमानाचा अपघात झाला. एका मेडिकल हॉस्टेलवर हे विमान कोसळले. विमानातील फक्त एकच प्रवासी वाचला. हे विमान अहमदाबादहून लंडनला निघाले असता हा अपघात झाला. या विमान अपघाताची सध्या चौकशी सुरू आहे. अमेरिकेच्या माजी परिवहन महानिरीक्षक मेरी शियावो यांनी बोईंग ७८७ विमानातील सॉफ्टवेअरमुळे थ्रस्ट रोलबॅक झाल्याची शक्यता आता नुकताच वर्तवली आहे.

अहमदाबादहून लंडनला निघालेल्या एअर इंडियाच्या या विमानातील

» पान ७ वर

# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा एनडीएत अश्वारूढ पुतळा

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते शुक्रवारी अनावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचे साम्राज्यात रुपांतर करणारे अजेय योद्धा थोरले बाजीराव पेशवे यांचा खडकवासला येथील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचा अनावरण समारंभ शुक्रवार, दि. ४ जुलै रोजी आयोजित करण्यात आला असून अनावरण केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते होणार आहे.

अजेय योद्धा थोरले बाजीराव पेशवे यांच्या पुतळ्याचा अनावरण समारंभ सकाळी वाजता राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री



» पान ७ वर

# कर्नाटकातील नेतृत्व बदलाच्या चर्चांना पूर्णविराम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला कर्नाटक काँग्रेस पक्षातील अंतर्गत कलह आता मोठ्या प्रमाणात वाढल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्यामध्ये राजकीय संघर्ष सुरू असल्याचं बोललं जातं. मात्र, या संघर्षाच्या चर्चांनंतर काँग्रेस हायकमांडने याची दखल घेत अखेर काँग्रेसचे नेते रणदीप सुरजेवाला कर्नाटक दौऱ्यावर आले असून, त्यांनी असे काहीही होणार नसल्याचे सांगत चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

काँग्रेस हायकमांडने रणदीप सुरजेवाला यांना कर्नाटकला पाठवलं असून ते काँग्रेस आमदारांचा आढावा घेण्यासाठी आल्याची चर्चा आहे. दरम्यान, कर्नाटकला

» पान ७ वर

### मंडी परिसरात ढगफुटी

# हिमाचलमध्ये पावसाचा हाहाकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील अनेक राज्यांमध्ये मान्सूनने कहर केलेला आहे. त्यातच हिमाचल प्रदेशात तुफान पाऊस सुरु आहे. येथे पावसामुळे आतापर्यंत येथे सुमारे ८०० कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. यादरम्यान, मंडी जिल्ह्यात ढगफुटीमुळे ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, १६ जण बेपत्ता असल्याची माहिती आहे.

पाण्याच्या प्रचंड प्रवाहामुळे नद्या आणि नाले ओसंडून वाहत आहेत. या दरम्यान अनेक रस्ते, पूल वाहून गेले आहेत. हा विनाशकारी पाऊस अद्यापही थांबलेला नाही. सततच्या पावसामुळे आणि ढगफुटीमुळे येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे.



मंडी जिल्ह्यातील कारसोग आणि धरमपूरमध्ये ढगफुटीच्या घटना घडल्या आहेत. त्यामध्ये ४ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी ११७ जणांना वाचवण्यात आले आहे. तसेच, १६ जण अजूनही बेपत्ता आहेत. त्यांना वाचवण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. अनेक रस्ते, पूल वाहून गेले आहेत. मुसळधार पावसामुळे नद्या आणि नाले तुडुंब भरुन वाहत आहेत.

ढगफुटीमुळे १२ गोशाळा आणि ३० गुरे वाहून गेली असून, सुमारे १८ घरांचे नुकसान झाले आहे. गोहर परिसरात चार ठिकाणी ढगफुटीसदृश पाऊस झाला, ज्यामध्ये २ घरं पूर्णपणे वाहून गेली.

धरमपूरमध्ये ढगफुटीमुळे ६ घरं पाण्यात बुडाली आहेत. ही आकडेवारी मंगळवारी दुपारी १ वाजे दरम्यान घडल्याची माहिती आहे. जूनमध्ये राज्यात ३७ टक्के जास्त पाऊस पडला असून, पावसाळा ६ जुलैपर्यंत राहणार असल्याची शक्यता आहे.

हिमाचल प्रदेशात पावसामुळे विध्वंस झाला आहे. आतापर्यंत ८०० कोटी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे असा अंदाज आहे. मंडी जिल्हा

» पान ७ वर

# राज्यात वाहनांवरील नवीन करप्रणाली लागू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात वाहनांवरील करावर आजपासून मोठा बदल करण्यात आला असून यानुसार १ जुलै २०२५ पासून नवीन वाहन कर प्रणाली लागू करण्यात आली आहे. यामुळे महागड्या वाहनांसोबतच सीएनजी, एलएनजीसह मालवाहू वाहनांच्या किंमती वाढणार आहेत.

या नव्या कर सुधारणेमध्ये सर्व खासगी सीएनजी/एलपीजी वाहनांसाठी वन टाईम करात १% वाढ करण्यात येणार आहे. तसेच मोटार वाहन (एमव्ही) कराची कमाल मर्यादा २० लाख रुपयांवरून ३० लाख रुपये करण्यात आली आहे. म्हणजेच आता २० लाख रुपयांवरील वाहनांना जास्त कर द्यावा लागणार आहे. यामुळे वाहनांची ऑनरोड किंमत वाढली आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारला २०२५-२६ साठी सुमारे १७० कोटी रुपये अतिरिक्त

» पान ७ वर

# रविंद्र चव्हाण भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** भारतीय जनता पक्षाचे नेते रविंद्र चव्हाण यांची महाराष्ट्राचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून आज (१ जुलै) निवड करण्यात आली आहे. भाजपाचे नेते तथा केंद्रीय संसदीय कार्य व अल्पसंख्याक विकासमंत्री किरेन रिजिजू यांनी ही अधिकृत घोषणा केली आहे. काही दिवसांपूर्वीच रवींद्र चव्हाण यांच्यावर भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. मात्र, आता त्यांची प्रदेशाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे रविंद्र चव्हाण हे भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष असणार आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्यामुळे रविंद्र चव्हाण यांच्यावर आता ही जबाबदारी देण्यात आली आहे. रविंद्र चव्हाण यांच्या निवडीबाबत भाजपाने मुंबईत एक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात रविंद्र चव्हाण यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. महाराष्ट्र भाजपा प्रदेशाध्यक्ष पदाच्या निवड प्रक्रियेत फक्त रविंद्र चव्हाण यांनी अर्ज दाखल केला होता. दुसरे कोणीही अर्ज दाखल न केल्यामुळे रविंद्र चव्हाण यांची भाजपाचे नवे



» पान ७ वर

# नद्यांच्या पूररेषा तपासण्यासाठी समिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहरातून वाहणार मुळा आणि मुठा नदीच्या एकूण स्थितीबाबत पर्यावरण तज्ज्ञ सारंग यादवाडकर, विजय कुंभार आणि विवेक वेलणकर यांनी २०१२ मध्ये नदीच्या पूररेषा अशास्त्रीय पध्दतीने आखल्या गेल्या असून त्या शास्त्रीय पद्धतीने आखण्यात याव्यात अशा मागणीसाठी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती .ही याचिका आज मंगळवारी दि.१ जुलै रोजी निकाली काढण्यात आली.उच्च न्यायालयाने याचिका निकाली काढताना नदीच्या पूररेषा चार महिन्यात तपासण्याबाबत एक समिती स्थापन करण्याचे आदेश दिले असून हे काम चार महिन्यात पूर्ण करावयाचे आहे.

या संदर्भात जलसंपदा खात्यानेही उच्च न्यायालयात पुण्यातील पूररेषा शास्त्रीय पद्धतीने आखण्यात आलेल्या नाहीत असे प्रतिज्ञापत्र सादर केले. या प्रतिज्ञापत्राच्या आधारावर उच्च न्यायालयाने एक उच्च स्तरीय समिती स्थापन करून पुण्यातील पूररेषांचे पुनरावलोकन करण्याचे निर्देश २६ जून २०२४ रोजी दिले. या निर्देशांन्वये उच्चस्तरीय समितीतील एक सदस्य, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांनी पुण्यातील नद्यांमध्ये निळ्या

» पान ७ वर

# तोट्यातील मार्गांवर 'लालपरी'चा 'रुसवा'...!

## जादा उत्पन्नाच्या मार्गाला 'डबल बेल': उत्पन्न कमी; मार्ग थेट बंद

राष्ट्रसंचार EXCLUSIVE

> "कमी उत्पन्न मिळवणाऱ्या मार्गांची पाहणी सुरू आहे. अशा मार्गांवरील सेवा कमी केली जाणार आहे. त्याऐवजी लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सुरू केल्या जातील. तसेच जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या मार्गांवर अतिरिक्त फेऱ्या सुरू होतील. त्यासाठी नवीन वेळापत्रक तयार करण्यात येत आहे."
>
> — **अरुण सिया,** विभाग नियंत्रक, एसटी महामंडळ पुणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे विभागातील एसटी बससेवेमध्ये मोठे फेरबदल होणार असून, तोट्यात चालणाऱ्या मार्गांवरील बससेवा हळूहळू थांबवण्यात येणार आहेत. त्याऐवजी जास्त मागणी असलेल्या आणि महसूल मिळवून देणाऱ्या मार्गांवर जादा फेऱ्या आणि नव्या बस सोडण्याचे नियोजन सुरू आहे.या वर्षाअखेरीपर्यंत पुणे विभागाच्या ताफ्यात १५० नवीन बस दाखल होणार आहेत. मात्र; तोट्यातील मार्गांवर 'लालपरी' चा 'रुसवा' असल्याने त्याचा जबरदस्त फटका ग्रामीण भागातील प्रवाशांना सहन करावा लागण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका नुकतीच जाहीर केली. त्यानंतर पुणे विभागाने महसूलवाढीच्या दृष्टीने बससेवेचे फेरनियोजन सुरू केले आहे. सध्या पुणे विभागात १४ आगार आणि ४२ स्थानकांमधून एकूण ८५० बस सेवा पुरवतात. त्यामध्ये ६४ इलेक्ट्रिक 'शिवाई' बस, ३६ लक्झरी 'शिवशाही' व्होल्व्हो बस आणि २०० सीएनजी बस समाविष्ट आहेत.

### अशी आहे 'लालपरी'ची जय्यत तयारी...

- पुणे विभागात ८५० बसपैकी २०० सीएनजी, ६४ इलेक्ट्रिक, ३६ शिवशाही
- १५० नवीन बस वर्षाअखेरपर्यंत सेवा सुरू करणार
- उत्पन्न नसलेल्या मार्गांवरील सेवा बंद
- जास्त मागणी असलेल्या मार्गांवर वाढीव फेऱ्या
- मासिक उत्पन्न ५५ कोटीवरून ६५ कोटींपर्यंत नेण्याचे लक्ष्य

पुणे विभागाचे नियंत्रक अरुण सिया म्हणाले, "कमी उत्पन्न मिळवणाऱ्या मार्गांची पाहणी सुरू आहे. अशा मार्गांवरील सेवा कमी केली जाणार आहे. त्याऐवजी लांब पल्ल्याच्या मार्गांवर सीएनजी आणि इलेक्ट्रिक बस सुरू केल्या जातील. तसेच जास्त उत्पन्न मिळवणाऱ्या मार्गांवर अतिरिक्त फेऱ्या सुरू होतील. त्यासाठी नवीन वेळापत्रक तयार करण्यात येत आहे."

नव्या बस व वाढीव सेवा- सध्या ७० नव्या बस लांब पल्ल्याच्या

#रा

» पान ७ वर

## 'एनआयपीएम' चॅप्टरच्या अध्यक्षपदी कल्याण पवार



**पुणे :** एनआयपीएम ही मनुष्यबळ अधिकाऱ्यांची भारतातील एक अग्रगण्य संस्था असून या संस्थेच्या पुणे विभागाच्या निवडणुकीत पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी कल्याण पवार यांची बहुमताने फेर निवड झाली.

एकूण दहा पदांसाठी झालेल्या या निवडणुकीत नऊ पदे बिनविरोध निवडून आली, तर अध्यक्ष पदाकरता गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक झाली. अत्यंत पारदर्शक पध्दतीने पार पडलेल्या या निवडणुकीसाठीपुण्यातील अत्यंत नामांकित आणि वरिष्ठ वकील ॲड. रामचंद्र निर्मल यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले.

यामध्ये इंडुअरन्स कंपनीचे मनुष्यबळ विभागाचे एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट कल्याण पवार यांना एकूण मतदानाच्या ६६ टक्के मते मिळाली. एनआयपीएम पुणे चॅप्टरच्या उपाध्यक्षपदी बाळासाहेब सोनवणे, सचिव पदी डॉ. अजित ठाकूर, अतिरिक्त सचिवपदी ॲड. प्रशांत क्षीरसागर, खजिनदारपदी डॉ. संजय झोपे यांची निवड झाली. तर कार्यकारिणी समितीमध्ये डॉ. कीर्ती धारवाडकर, खंडू गायकवाड, प्रशांत माळी, पवन शर्मा, डॉ. सतीश पवार या सगळ्यांची बिनविरोध निवड झाली.

## 'बार्टी'च्या अर्थसहाय्य योजनेस मुदतवाढ

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने (बार्टी) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-अराजपत्रित गट-ब २०२४ ची पूर्वपरीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी एकरकमी दहा हजार रुपये अर्थसाह्य देण्यात येणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत १० जुलैपर्यंत वाढविली आहे. यापूर्वी उमेदवारांना ३० जूनपर्यंत मुदत दिली होती.

बार्टीने याबाबतची जाहिरात यापूर्वीच आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती. या जाहिरातीमध्ये ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी गूगल फॉर्म दुवा उपलब्ध करून दिला होता. मात्र, काही तांत्रिक अडचणींमुळे गूगल फॉर्ममध्ये अर्ज भरता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे अर्ज करण्यासाठी आता नवीन लिंक दिली असून अर्ज करण्यासाठी मुदतवाढ दिली. सर्व उमेदवारांनी आता https://forms.office.com/r/nrHvU64dHA या नव्या लिंकवर जाऊन अर्ज ऑनलाइन भरावा. याबरोबर १६ जूनला बार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेला अर्ज व्यवस्थित भरून आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह जोडून तो बार्टी कार्यालयाच्या २८, क्वीन्स गार्डन, कॅम्प पुणे-४११००१ या पत्त्यावर पाठवणे अनिवार्य आहे.

उमेदवारांनी हार्ड कॉपी कार्यालयात न पाठविल्यास त्यांचे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही. पूर्वीच्या गूगल फॉर्म दुव्यावर ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केला होता, त्यांनीही नव्याने https://forms.office.com/r/nrHvU64dHA या दुव्यावर ऑनलाइन अर्ज पुन्हा करावा.



## 'अवकारीका' लवकरच येतोय प्रेक्षकांच्या भेटीला

**पुणे :** पर्यावरण संवर्धन आणि मानवी आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा स्वच्छता हा विषय घेऊन रेडबड मोशन पिक्चर्स द्वारा 'अवकारीका' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. स्वच्छता केवळ घर किंवा परिसराची नाही तर मनामनातील स्वच्छता दूर करण्याचा संदेश देत आणि स्वच्छतेचा वसा प्रत्येकाच्या मनामनांमध्ये ठवसणारा हा चित्रपट प्रेक्षकांना आवडल्याशिवाय राहणार नाही. या सिनेमात एकीकडे स्वच्छतेचे महत्व तर अधोरेखित केलेच आहे, परंतु स्वच्छतेच्या प्रक्रियेतील महत्वाचा दुवा असणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या संघर्षाची गाथा अत्यंत ज्वलंत पद्धतीने मांडली आहे. त्यामुळे हा सिनेमा प्रेक्षकांमध्ये स्वच्छतेविषयी एक परिवर्तनवादी दृष्टिकोन तयार करेल, असा विश्वास या चित्रपटाच्या टीमने व्यक्त केला.

चित्रपटाविषयी माहिती देण्यासाठी पुण्याच्या श्रमिक पत्रकार भवनात पत्रकार परिषद घेण्यात आली, त्या वेळी या सिनेमाचे निर्माते, लेखक आणि दिग्दर्शक सीए अरविंद भोसले यांच्यासह निर्माते अरुण जाधव, भारत टिळेकर, डीओपी करण तांदळे, संगीत दिग्दर्शक श्रेयस देशपांडे, अभिनेता रोहित पवार, लाईन प्रोड्यूसर चेतन परदेशी, असोसिएट दिग्दर्शक रहेमान आदी उपस्थित होते.

## जुन्या वाहनांसाठी एचएसआरपी अनिवार्य

**पुणे :** राज्यात एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणीकृत सर्व खासगी व व्यावसायिक वाहनांसाठी उच्च सुरक्षा नंबर प्लेट (HSRP) लावणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी अद्याप नोंदणी न केलेल्या वाहनधारकांना दिलासा देत, १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

एचएसआरपी ही चोरी आणि बनावट नंबरप्लेट रोखण्यासाठी केंद्र शासनाने घालून दिलेली विशेष सुरक्षा यंत्रणा आहे. यात वाहन क्रमांक लेझर कोडिंगसह कोरलेला असून, तो केंद्रिय डेटाबेसमध्ये नोंदविला जातो. पुणे शहरात एकूण २६ लाख वाहनांना एचएसआरपी बसवणे आवश्यक आहे. मात्र, आतापर्यंत फक्त ६ लाख वाहनधारकांनीच ही प्रक्रिया पूर्ण केली आहे. उर्वरित वाहनधारकांनी लवकरात लवकर नोंदणी करून प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन आरटीओ विभागाकडून करण्यात आले आहे.

## सन्मान पदाधिकाऱ्यांचा...!



**पुणे** पुणे श्रमिक पत्रकार संघाचे नवनिर्वाचित कार्यकारिणीचा दैनिक 'राष्ट्र संचार' च्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी नवनिर्वाचित अध्यक्ष ब्रिजमोहन पाटील, सरचिटणिस मंगेश फल्ले, खजिनदार दिलीप तायडे, उपाध्यक्ष राजा गायकवाड आणि सागर आव्हाड यांना पुष्पगुच्छ देताना दैनिक 'राष्ट्र संचार' च्या सारीका रोजेकर, नानासाहेब साळुंके आणि कल्याणी संत.

## विद्यापीठाचा १२६वा पदवी प्रदान कार्यक्रम सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा १२६वा पदवी प्रदान कार्यक्रम सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. पदवी, पदविका, पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करावा लागणार असून, त्यासाठी १ जुलै ते १४ ऑगस्ट या कालावधीत नियमित शुल्कासह, तर १५ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. १२६व्या पदवी प्रदान कार्यक्रमात ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ आणि एप्रिल-मे २०२५मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना, तसेच दूरस्थ अभ्यासक्रमाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी, पदविका, पदव्युत्तर प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. प्रमाणपत्रासाठी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना https://www.unipune.ac.in/ या संकेतस्थळाद्वारे अर्ज करून शुल्क भरता येणार आहे. अर्जासह मूळ गुणपत्रिका सादर करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# विमाननगरमध्ये कचराकोंडीचा 'भार'...!

### कचरा संकलन ठप्प : नागरिक हतबल; घाणीचे साम्राज्य

शहराच्या पूर्व भागात असलेल्या विमाननगर या उपनगराचा गेल्या काही वर्षांच्या कालावधीत चांगलाच विस्तार झाला आहे; हा परिसर अगदी विमानतळाच्या लगतच असल्याने याठिकाणी उच्चभ्रू नागरिकांची वसाहत असून अनेक सेलीब्रेटीसह विविध शासकीय अधिकारी वास्तव्य करण्यासाठी याच भागाला पसंती देत आहेत. त्याशिवाय आयटी पार्क, बडे मॉल आणि खासगी कार्यालयांमुळे या भागाला सर्वाधिक पसंती वाढत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनालाही या भागातून सर्वाधिक महसूल मिळत आहे, तरीही या भागातील रहिवाशांना दर्जेदार सुविधा देण्यात सपशेल अपयश आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत येथील कचरा उचलण्यात अनियमितता दिसून येत आहे.



> या भयानक परिस्थितीला महापालिकेचे अधिकारी आणि कर्मचारीच जबाबदार आहेत; त्याचा नाहक त्रास हा स्थानिक नागरिकांना होत असून कचरा वाढत असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे त्याची दखल वरिष्ठ पातळीवर घेण्याची आवश्यकता आहे; त्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येणार असून त्यामधील हलगर्जीपणा कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतला जाणार नाही.
>
> **-डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे मनपा

> "स्वच्छ संस्थेचे कर्मचारी कचरा संकलनात अनियमितता करतात. त्यामुळे नागरिक रस्त्यावर कचरा फेकतात. याविषयी आम्ही लवकरच बैठक घेणार आहोत. "कर्मचाऱ्यांना नियमित संकलनासाठी सूचना दिल्या आहेत. मात्र आरोग्य विभागाची कचरा वाहून नेणारी गाडी वेळेवर न आल्यामुळे अडचणी निर्माण होतात.
>
> **-राजेश शेवरे,** आरोग्य निरीक्षक, पुणे मनपा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विमाननगर परिसरातील म्हाडा कॉलनी, जेल सोसायटी, राजीव नगर, यमुनानगर व संजय पार्क या भागांतील बैठ्या घरांमधून कचरा संकलन अनियमित होत असल्यामुळे रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचू लागले आहेत. त्यामुळे परिसरातील स्वच्छतेचा बोजवारा उडत असून, नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

महानगरपालिकेच्या स्वच्छ संस्था व आरोग्य विभागातील समन्वयाचा अभाव आणि कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणामुळे ही परिस्थिती ओढवली आहे. नियमित



घंटागाडी न येणे, अर्धवट कचरा उचलणे, अचानक कामावर दांडी मारणे अशा तक्रारी सातत्याने येत असून, प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नागरिकांच्या संयमाचा बांध तुटू लागला आहे.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांनी वारंवार तक्रारी केल्या असून, वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयात झालेल्या मोहल्ला समितीच्या बैठकीतही हा विषय ऐरणीवर आला होता. खुद्द आमदार बापूसाहेब पठारे यांनीही याबाबत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्याप कुठलीही ठोस कृती झालेली नाही.

म्हाडा कॉलनीतील रहिवासी अंजुम शेख म्हणाल्या, "मागील वर्षभरापासून तक्रारी करत आहोत, पण कोणतीही सुधारणा झालेली नाही. कर्मचाऱ्यांचे मनमानी वर्तन सहनशीलतेच्या पलीकडे गेले आहे. पुन्हा अशीच परिस्थिती राहिली, तर आम्हालाच कचरा कार्यालयात आणून टाकावा लागेल."

राजीव नगरमधील अरविंद परदेशी यांनीही प्रशासनाला इशारा दिला, "कचरा संकलन व सफाई कामात सुधारणा झाली नाही, तर आम्ही आंदोलन करू." जबाबदाऱ्यांची बोटे एकमेकांकडे

या प्रश्नावर स्वच्छ संस्था व आरोग्य विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत. प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे विमाननगर परिसर बकाल होत चालला आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी, रोगराईचा धोका वाढतो आहे. त्यामुळे तातडीने संयुक्त कृती आराखडा आखून नियमित संकलनास सुरुवात झाली पाहिजे, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे.

## बलात्कारी दत्ता गाडेचा जामीन अर्ज फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वारगेट बसस्थानकात २५ फेब्रुवारी रोजी एका २६ वर्षीय तरुणीवर झालेल्या बलात्कार प्रकरणातील मुख्य आरोपी दत्तात्रेय गाडे याचा जामीन अर्ज पुणे सत्र न्यायालयाने फेटाळला आहे.



सत्र न्यायाधीश ए. एस. गांधी यांच्या न्यायालयाने हा निर्णय दिला असून, युक्तिवाद व उपलब्ध पुराव्यांच्या आधारे आरोपीला जामीन नाकारण्यात आला आहे.

या प्रकरणात आरोपी गाडे याने न्यायालयीन कोठडीत असताना जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर सरकारी पक्ष व बचाव पक्षाकडून सविस्तर युक्तिवाद करण्यात आला. सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसार, तर पीडित तरुणीच्या वतीने ॲड. श्रीया आवले यांनी जामिनास तीव्र विरोध केला.

विशेष सरकारी वकिलांच्या मते, ही घटना पीडितेच्या इच्छेविरुद्ध व संमतीविना घडली आहे. तपासादरम्यान काही निर्णायक पुरावे उघडकीस आले असून, आरोपीच्या मोबाईलमधील लोकेशन ट्रॅकिंग, घटनास्थळाचे पंचनामे, तज्ज्ञांचे मत इत्यादी गोष्टी आरोपीच्या दोषारोपांना पुष्टी देणाऱ्या आहेत. तसेच, आरोपी व पीडित तरुणीमध्ये पूर्वी कोणताही संपर्क नव्हता, तसेच त्यांच्यात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही, असेही नमूद करण्यात आले. पीडितेच्या वतीने ॲड. श्रीया आवले यांनी सांगितले की, आरोपीने यापूर्वी पीडितेची बदनामी करण्याचा प्रयत्न केला होता आणि जामिनावर सुटल्यास तो पुन्हा तसा प्रयत्न करू शकतो. त्यामुळे त्याला जामीन देऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.

दुसरीकडे, बचाव पक्षाने असा युक्तिवाद केला की, आरोपीचे पूर्वीचे गुन्हे हे स्त्रियांवरील अत्याचाराशी संबंधित नसून चोरी व दरोड्याचे होते. तसेच पीडितेच्या संमतीने संबंध झाल्याचा दावा त्यांनी केला.

परंतु, उपलब्ध पुरावे, तपासाची दिशा आणि संभाव्य परिणाम लक्षात घेता न्यायालयाने आरोपी दत्तात्रेय गाडे याचा जामीन अर्ज फेटाळत त्याला कारागृहातच ठेवण्याचा आदेश दिला.

## औषधासोबतच डॉक्टर जगण्याचे बळ देतात : नाटेकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जेव्हा रुग्ण बरा होऊन रुग्णालयातून बाहेर पडतो. तेव्हा तो देवासोबतच त्याला वाचवणाऱ्या डॉक्टरांसमोर देखील नतमस्तक होतो. डॉक्टर रुग्णाला औषधासोबतच जगण्याचे बळ देखील देतात. रुग्णाला आधार आणि मार्गदर्शन करतात. असे मत एमएमआरडीए, वांद्रेचे अतिरिक्त जिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी व्यक्त केले.

डॉक्टर्स डे निमित्ताने जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन,पुणे आणि रुबी हॉल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे निमित्त वैद्यकीय परिषद आणि सर्वोत्तम जनरल प्रॅक्टिशनर पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. वर्षातील सर्वोत्तम जनरल प्रॅक्टिशनर पुरस्कार डॉ. सुनिल दिवाकर अंभोरे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी महानगरपालिका वैद्यकीय प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रल्हाद पाटील, जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणेचे अध्यक्ष डॉ. सुनिल भुजबळ, उपाध्यक्ष डॉ. अप्पासाहेब काकडे, सचिव डॉ. भाग्यश्री मुनोत-मेहता, डॉ.राजेश दोशी, सहसचिव उपस्थित होते.

डॉ. साक्षे जैन यांचे द ट्रिनिटी थर्ड जेंडर, डॉ. कपिल झिरपे यांचे हवेद्वारे पसरणाऱ्या आजारांवरील संक्रमण नियंत्रण, डॉ. हिमेश गांधी यांचे युरोलॉजीमधील रोबोटिक सर्जरी व प्रोस्टेट वरील मिनिमली इनवेसिव्ह सर्जरी, डॉ. उर्मी शेठ यांचे रक्तक्षयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, डॉ. पियुष लोढा यांचे एन्डोक्रायनॉलॉजीतील रंजक केसेस, डॉ. सायमन ग्रांट यांचे वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रयोग या विषयावर व्याख्याने झाली.




**पुणे** डॉक्टर्स डे निमित्ताने जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन,पुणे आणि रुबी हॉल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे निमित्त वैद्यकीय परिषद आणि सर्वोत्तम जनरल प्रॅक्टिशनर पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

# ज्योतिष शास्त्रामध्ये अंधश्रद्धेला थारा नाही : मोहन दाते




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विज्ञानावर आधारित अभ्यास आणि संशोधन ही केवळ ज्योतिष शास्त्राचीच नव्हे तर काळाची गरज आहे. विज्ञान हे ज्योतिषशास्त्राचे मूळ आहे. त्यामुळे ज्योतिष शास्त्रामध्ये अंधश्रद्धेला वाव नाही, असे मत ज्येष्ठ पंचांग कर्ते मोहन दाते यांनी व्यक्त केले.

ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र, पुणे यांच्या वतीने चतुर्थ पदवी प्रमाणपत्र वितरण व पुरस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ ज्योतिषतज्ञ शुभांगिनी पांगारकर, संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती उमेश रमेश कुलकर्णी गुरुजी उपस्थित होते. विद्यावाचस्पती ज्येष्ठ गाणपत्य डॉ. स्वानंद पुंड महाराज यांना शारदा पुरस्कार, अभिनव ज्योतिष मंडळ सोलापूर या संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ पंचांगकर्ते मोहन दाते यांना रत्नमाला पुरस्कार, योगीराज वेद विज्ञान आश्रम या पाठशाळेचे अध्यक्ष अश्वमेघयाजी चैतन्य नारायण काळे गुरुजी यांना वेद संवर्धन प्रेरणा पुरस्कार, वेदमूर्ती दत्तात्रय मनोहर साधले गुरुजी यांना वेदमार्ग दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात वास्तु विशारद, लोलक विशारद, अंक विशारद आणि वास्तु भूषण अभ्यासक्रम पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या वर्षीच्या पदवी वितरण सोहळ्यात १२० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व गौरवचिन्ह प्रदान करण्यात आले. पुरोहितांचे मंगल मंत्र पठण, सान्वी फुंडकर यांचे सुसंस्कृत नृत्य आणि सन्मान समारंभ पार पडला.

स्वानंद पुंड म्हणाले, माणसाला जगण्यासाठी बुद्धी आणि सिद्धी दोन्ही ची गरज असते. केवळ विद्वत्ता किंवा पुस्तकी ज्ञान असणे गरजेचे नाही, तर त्याला व्यवहार ज्ञानाचीही जोड असावी लागते.

> विज्ञानावर आधारित ज्योतिष वास्तुविद्येचे अध्ययन केलेले लाखो वास्तु ज्योतिष विशारद तयार करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे. आमच्या विद्यार्थ्यांना स्वत:चे व्यासपीठ मिळावे, त्यांना इतरांकडे व्यासपीठ मिळवण्यासाठी याचना करायला लागू नये, यासाठीच पुरस्कार आणि अशा प्रकारच्या उपक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे.
>
> **-वेदमूर्ती उमेश कुलकर्णी;** अध्यक्ष, ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्र

# प्रस्ताव 'लालफिती'त; प्रवाशांची 'दमछाक'...!

## वाढीव डब्बे 'यार्डात'च : हजारो प्रवाशांना फटका; महसूलालाही 'तिलाजंली'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** गेल्या अनेक वर्षांपासून पुणेकरांचा दाटीवाटीने सुरू असलेला पुणे-मुंबई, मुंबई-पुणे प्रवास आणखी काही महिने तसाच सुरूच राहणार आहे. सीएसएमटी स्थानकावरील ११ व १२ क्रमांकाच्या फलाटांची लांबी वाढविण्याचे काम पूर्ण झाले आहे; मात्र अद्याप 'आयआरएसडीसी'च्या (इंडियन रेल्वे स्टेशन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) वतीने सीएसएमटी स्थानकावरच 'डेक' बनविण्याचे काम पूर्ण झालेले नाही. ते पूर्ण झाल्यानंतरच पुण्यातून सुटणाऱ्या रेल्वे गाड्यांचे डबे वाढविले जाणार आहे. मात्र त्यासाठी आणखी किमान दीड ते दोन वर्षे वाट पाहावी लागणार आहे.

प्रगती, सिंहगड व डेक्कन क्वीन एक्स्प्रेसला डबे वाढविण्यासाठी पुण्याच्या परिचालन विभागाने मुख्यालयाला प्रस्ताव दिला. त्या वेळी मुंबईत त्या लांबीचे फलाट नाही, असे कारण मध्य रेल्वे प्रशासनाने दिले. या गाड्यांच्या माध्यमातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत आहेत, परंतु डब्यांची संख्या वाढत नसल्याने त्यांना धोकादायक परिस्थितीत प्रवास करावा लागत आहे. धक्कादायक बाब म्हणजे या माध्यमातून रेल्वे प्रशासन दररोज लाखो रुपयांच्या महसूलाला 'तिलाजंली' देत आहे.

मागच्या काही महिन्यांत फलाट ११ व १२ चे विस्तारीकरण पूर्ण झाले. मात्र 'डेक'चे काम अद्याप अपूर्ण असल्याने प्रवाशांना आणखी किमान दोन वर्ष वाट पाहावी लागणार आहे.

**पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवासी संख्या**
**एकूण फलाट - ६**
**दैनंदिन प्रवासी संख्या - १ लाख ६० हजार**
**प्रवासी गाड्या - १६०**
**लोकलच्या फेऱ्या - ४१**
**पुणे स्थानकावरून सुटणाऱ्या गाड्या - ७२**

"सीएसएमटी स्थानकावरील फलाटांची लांबी वाढविण्यात आली आहे. सध्या सीएसएमटी स्थानकाचे विकासाचे काम सुरू आहे. ते पूर्ण होताच गाड्यांना डबे वाढविले जातील.

**- डॉ. स्वप्नील नीला**, मुख्य जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे, मुंबई

### फलाटांची लांबी वाढविणे गरजेचे

● सिंहगड एक्स्प्रेस (१८ डबे), प्रगती व डेक्कन क्वीन एक्स्प्रेस (१७ डबे) या गाड्यांच्या डब्यांची संख्या कमी असल्याने प्रामुख्याने याला ४ किंवा ५ क्रमांकाच्या फलाटावरून सोडतात. चार आणि पाच फलाटांची लांबीदेखील कमी आहे. या गाड्यांच्या डब्यांची संख्या वाढल्यास फलाटांची लांबीदेखील वाढवावी लागणार आहे. तेव्हा रेल्वे प्रशासनाने या दीड वर्षात पुण्यातील फलाटांची लांबी वाढविणे अपेक्षित आहे.

### तीन डबे वाढविण्याचा प्रस्ताव

● डेक्कन क्वीन, प्रगती व सिंहगड एक्स्प्रेस या तीन रेल्वे गाड्यांना प्रवाशांची नेहमीच मोठी गर्दी असते. दररोज सुमारे दीड ते दोन हजार प्रवासी या प्रत्येक गाडीतून प्रवास करतात. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून डब्यांची संख्या वाढविण्याची मागणी प्रवासी व प्रवासी संघटना करीत आहेत. मात्र रेल्वे प्रशासन नेहमीच कोणते तरी कारण पुढे करीत असमर्थता दर्शविते. एक डबा जरी वाढला तरी किमान दीडशे प्रवाशांची सोय होते. डबे वाढत नसल्याने किमान दीड ते दोन हजार प्रवाशांना फटका बसत आहे.



## राजर्षि शाहू सहकारी बँकेचा ४१वा वर्धापन दिन उत्साहात

**पुणे :** राजर्षि शाहू सहकारी बँकेचा ४१ वा वर्धापन दिन अतिशय उत्साहात व खेळीमेळीमध्ये साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमप्रसंगी बँकेचे अध्यक्ष श्री. शांताराम धनकवडे यांनी ग्राहकाभिमुख सेवा देण्याबद्दल सविस्तर माहिती दिली. बँकेचे ज्येष्ठ संचालक श्री. सुधाकर पन्हाळे यांनी बँकेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत झालेल्या बँकेच्या प्रगतीचा आलेख मांडला व जुन्या आठवणींना उजाळा दिला. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्व. आबासाहेब यांनी सहकार व सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनिय कामकाजाबाबत व कार्याचा या ठिकाणी उजाळा दिला. राजर्षि शाहू सहकारी बँक नेहमीच तळागाळातील आर्थिक दुर्लभघटकांसाठी वेगवेगळ्या योजनांतर्गत आर्थिक स्वरुपात मदत करत असते, तसेच सामाजिक कार्याबाबत नेहमीच अग्रेसर असते, असे संबोधले सदर कार्यक्रमास बँकेचे अध्यक्ष श्री. शांताराम धनकवडे, उपाध्यक्षा सौ. कमल व्यवहारे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बाळासाहेब डोईफोडे, ज्येष्ठ संचालक श्री. सुधाकर पन्हाळे, श्री. पद्माकर पवार, श्रीमती मंगला जाधव, श्रीमती कुसुम अडसुळे, श्री. अभय मोहिते, श्री. सतीश नाईक, श्रीमती श्यामकौर शिंदे, श्री.लक्ष्मण जाधव, श्रीमती आनंदी कुलकर्णी, श्री. सुबीर कोतवाल, श्री. मनन शिंदे, कार्यलक्षी संचालक श्री. सुनिल देसाई, श्री. प्रमोद जाधव व मा. व्यवस्थापन मंडळाचे श्री. किशोर कापसे, श्री. दिगंबर कांगो तसेच बँकेच्या शाखांचे शाखाधिकारी व सेवक वृंद आवर्जुन उपस्थित होते.

## काही भागांचा पाणीपुरवठा गुरुवारी बंद

**पुणे :** गुरुवार, दिनांक ३ जुलै २०२५ रोजी आघम मंदिर पायथा येथे पाईपलाईनवरील आवश्यक



तातडीच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी पुणे महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे काही भागाचा पाणीपुरवठा गुरुवारी (३ जुलै) बंद राहणार आहे; तर शुक्रवारी ४ जुलै रोजी कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.पाणीपुरवठा बंद राहणारे भाग पुढीलप्रमाणे :

दत्तनगर, टेल्को कॉलनी, आमराई, आंबेगाव बुद्रुक परिसर, दत्तवाडी नगर, वाघजाई नगर, आंबील फार्म परिसर, पंचम नगर, बडग बस्ती व परिसर, संतोष नगर, अंजली नगर, महादेव कुंज, वंडर सिटी, सेक्शन सोसायटी परिसर, गुरुहस्त परिसर, आंबेगाव खुर्द गावठाण, जांभुळवाडी रोड इ.महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकुमार जगताप यांनी ही माहिती दिली आहे.

## मिळकत कर सवलतीची मुदत ७ जुलैपर्यंत वाढवली

**पुणे :** पुणे महानगरपालिकेने नागरिकांना मोठा दिलासा देत वर्षभराचा मिळकत कर भरताना मिळणाऱ्या सवलतीची अंतिम मुदत ७ जुलैपर्यंत वाढवली आहे. शेवटच्या दिवशी नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने ऑनलाइन आणि नागरी सुविधा केंद्रांची यंत्रणा ढासळली. परिणामी अनेकांना कर भरता आला नाही. या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाने मुदतवाढीचा निर्णय घेतला आहे. महापालिकेकडून आर्थिक वर्षाचा संपूर्ण मिळकत कर ठराविक वेळेत भरल्यास पाच ते दहा टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाते. ही सवलत पूर्वी ३० जूनपर्यंत लागू होती. मात्र, सवलतीच्या शेवटच्या दिवशी कर भरण्यासाठी हजारो पुणेकरांनी एकाच वेळी ऑनलाइन पोर्टल आणि नागरी सुविधा केंद्रांवर गर्दी केली. यामुळे सर्व्हर डाऊन होणे, तांत्रिक अडथळे, फारकत वेळ लागणे अशा समस्या निर्माण झाल्या. या अडचणी लक्षात घेता 'आपले पुणे' या संस्थेसह अनेक नागरिकांनी महापालिकेकडे सवलतीची मुदतवाढ मागितली होती. नागरिकांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत कर आकारणी व संकलन विभागाने सात दिवसांची मुदत दिली आहे.

## पिस्तूल परवान्यांवर पोलिसांचा 'अंकुश'

**पुणे :** गेल्या काही वर्षांत पुण्यात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ, उद्योगवाढीमुळे निर्माण झालेली असुरक्षा, तसेच 'स्टेटस सिम्बॉल' म्हणून शस्त्र परवाना घेण्याचा कल वाढत होता. मात्र, पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर या प्रवृत्तीला आळा बसला आहे. त्यांनी दीड वर्षांत तब्बल १४० पिस्तूल परवाने रद्द केले असून, ४०० हून अधिक अर्ज फेटाळले आहेत.

शहरात स्वसंरक्षणाच्या नावाखाली पिस्तूल परवाना घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्यात येत होते. आयटी कंपन्यांची वाढ, संपत्ती व व्यवसायातून उद्भवलेली असुरक्षा, आणि सामाजिक प्रतिष्ठेचा भाग म्हणून शस्त्र बाळगण्याकडे काहींचा कल वाढला होता. मात्र, या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने परवाना देण्याच्या प्रक्रियेत काटेकोरता आणली.

जानेवारी २०२४ ते जून २०२५ या कालावधीत पोलिसांकडे आलेल्या ५७२ अर्जांपैकी केवळ २८ अर्जांना परवाना देण्यात आला आहे. यामध्ये १० अर्ज वारसा हक्कातून, तर ९ अर्ज स्पोर्ट्स श्रेणीतून मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरित अर्ज 'स्वसंरक्षण' या कारणावर आधारित होते, मात्र किरकोळ कारणे असल्याने त्यांना नकार देण्यात आला.

गेल्या काही वर्षांत काही जणांनी चुकीच्या पद्धतीने परवाने मिळवल्याचे निदर्शनास आले. यानंतर पोलिसांनी त्यांची पार्श्वभूमी तपासून १४० परवाने रद्द केले. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तसेच केवळ प्रतिष्ठेसाठी परवाना घेणाऱ्यांना यापुढे परवानगी नाकारली जात आहे.

# अवजड वाहनांचा 'मृत्यूचा सापळा'...!

### वर्षभरात ३४५ जणांचा मृत्यू : पोलीस घेणार कठोर निर्णय

शहरातील प्रमुख रस्त्यांवर बंदी असतानाही डंपर, ट्रक, मिक्सरसारखी अवजड वाहने सर्रासपणे वावरत आहेत. परिणामी अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, या घटनांमध्ये अनेक निष्पापांचे बळी जात आहेत. गेल्या वर्षभरात ३३४ प्राणघातक अपघातांमध्ये ३४५ जणांनी जीव गमावला, तर यंदाच्या सहा महिन्यांतच १४० जणांचा मृत्यू झाला आहे. या चिंताजनक पार्श्वभूमीवर पोलिस आणि प्रादेशिक परिवहन विभागाने कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे.शहरात अपघातास कारणीभूत ठरलेल्या अवजड वाहनांच्या परवान्यांना रद्द करण्यात येणार असून, गेल्या पाच वर्षांतील अशा वाहनांची माहिती संकलित करून त्यांच्यावर जप्तीची कारवाई केली जाणार आहे.



"अवजड वाहनांमुळे गंभीर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या वाहनांच्या विरोधात कठोर पावले उचलण्याची वेळ आली आहे. पोलिसांकडून यासाठी वेगवान कारवाई सुरू आहे. त्यासंदर्भात अशा वाहनांवर कारवाई करण्याच्या सूचना सर्व विभागांना देण्यात आल्या असून त्यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

**-मनोज पाटील**, अतिरिक्त पोलीस आयुक्त



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी शहरातील ३१ महत्त्वाच्या रस्त्यांवर अवजड वाहनांना २४ तास बंदी आहे. यात १० चाकी व त्याहून अधिक क्षमतेची वाहने, कंटेनर, ट्रेलर आणि मल्टिऍक्सल ट्रक यांचा समावेश आहे. सहा ते दहा चाकी वाहनांना केवळ रात्री ११ ते सकाळी ६ या वेळेत, रेड झोन वगळता, प्रवेश दिला जातो. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्ग या नियमांतून वगळण्यात आला आहे.

अवजड वाहनांच्या सर्रास हालचालीमुळे वाहतूक कोंडी आणि अपघात वाढले आहेत. बंदी आदेश पायदळी तुडवत शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनचालकांविरोधात गुन्हे नोंदविण्यात येत आहेत. आतापर्यंत ३० ते ३२ वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर दंडात्मक कारवाईही करण्यात आली आहे.

"शहरात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनचालकांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. परवाने रद्द करणे, वाहने जप्त करणे आणि न्यायालयीन कारवाईचा समावेश असलेली मोहीम पोलीस व RTO संयुक्तपणे राबवतील," अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

### गंगाधाम चौकात जड वाहतूकीला बंदी

● गंगाधाम चौकात सातत्याने होत असलेल्या अपघातांना लगाम घालण्यासाठी वाहतूक शाखेने कात्रज-कोंढवा रस्त्यावरील शत्रुंजय मंदिर (कान्हा हॉटेल) ते गंगाधाम चौक तसेच, टिळेकर चौक ते गंगाधाम चौक दरम्यान ट्रक, मिक्सर, डंपर, कंटेनरसह सर्व जड व अवजड वाहनांना वाहतुकीसाठी २४ तास बंदी जाहीर केली आहे. हा आदेश एक जुलैपासून लगेच लागू झाला आहे. वाहतूक शाखेने जड वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. नियम मोडणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.



## मार्किंगमुळे समजणार पूरस्थितीचा धोका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पावसाळ्यात धरणातून विसर्ग होणे किंवा पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस पडल्यामुळे मुठा नदीची पातळी अचानक वाढते. अशा वेळी संभाव्य पूरस्थितीचा अचूक अंदाज घेता यावा, यासाठी पुणे महापालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. खडकवासला धरण ते संगमवाडी दरम्यान मुठा नदीवरील प्रमुख पुलांच्या खांबांवर पाणीपातळीची खुणा (मार्किंग) केली जाणार आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पूरस्थिती नियंत्रणासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत पाणीपातळी खुणांची संकल्पना मांडण्यात आली आणि ती तातडीने राबवण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले.

या उपक्रमामुळे धरणातून किती विसर्ग झाल्यास शहरातील कोणत्या भागांमध्ये पाणी शिरू शकते, याचा तात्काळ अंदाज घेता येईल. विशेषतः पाणलोट क्षेत्रातून अचानक मोठ्या प्रमाणात पाणी येण्याच्या घटनांमध्ये प्रशासनास आवश्यक ती खबरदारी घेणे शक्य होणार आहे.

वारजे येथील बाह्यवळण पूल, सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल, म्हात्रे पूल, एस. एम. जोशी पूल, लकडी पूल, काकासाहेब गाडगीळ पूल, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पूल, टिळक पूल, नवा पूल आणि संगमवाडी पूल या महत्त्वाच्या पुलांचा समावेश आहे.

पूरसदृश परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांना तात्काळ इशारा देता यावा यासाठी काही पूरप्रवण भागांमध्ये ध्वनिक्षेपक (सायरन) यंत्रणा बसवण्याचेही नियोजन आहे. सिंहगड रस्ता परिसरातील एकतानगरी आणि पाटील इस्टेट या भागांमध्ये या यंत्रणा बसवण्यात येणार आहेत.

गेल्या वर्षी केवळ दोन हजार क्युसेक पाणी मुठा नदीत सोडले असताना भिडे पूल परिसरात पाणी साचले होते. त्याच वेळी पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने नदीची पातळी वेगाने वाढली होती. याच अनुभवाच्या पार्श्वभूमीवर यंदा नियोजनपूर्वक उपाययोजना आखण्यावर भर देण्यात येत आहे.

महापालिकेने नागरिकांना पूराच्या धोक्याबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, प्रशासनाच्या सूचनांचे वेळेवर पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

पुलांच्या खांबांवरील पाणीपातळी खुणा आणि ध्वनिक्षेपक व्यवस्था यामुळे संभाव्य पूरस्थितीवर वेळेपूर्वी उपाययोजना करणे शक्य होणार आहे.

## कोल्डचेन तंत्रज्ञानात सरकार नक्कीच मदत करेल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत असून भारत हा आज देखील कृषिप्रधान देश आहे. कोल्ड चेन हे तंत्रज्ञान शेतकरी आणि ग्राहक यांना जोडण्याचे महत्वाचे काम करते. या क्षेत्राच्या विकासासाठी भारत सरकार नक्कीच मदत करेल असे प्रतिपादन संसदरत्न खासदार (राज्यसभा) डॉ. मेधा कुलकर्णी यांनी आज केले.

ईशरे (इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग ,रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स ) पुणे चॅप्टर आयोजित हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल, पुणे येथे "जागतिक रेफ्रिजरेशन दिवस" या निमित्ताने "जागतिक पातळीवर प्रथमच पुण्यात भरलेल्या ग्रीन कोल्ड चेन कॉनक्लेव्हचे उद्घाटन मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी ऑल इंडिया कोल्ड स्टोअरेज फेडरेशन चे अध्यक्ष मुकेश अगरवाल ,नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्डचे माजी डायरेक्टर डॉ.आर.के.शर्मा ,सुहाना समूहाचे आनंद चोरडिया, इशरेचे माजी अध्यक्ष अरविंद सुरंगे, पुणे चॅप्टर अध्यक्ष चेतन ठाकूर, माजी अध्यक्ष नंदकिशोर कोतकर , नियोजित अध्यक्ष सुभाष खानडे, हर्षल सुरंगे वविरेंद्र बोराडे , रोटरी क्लब पुना नार्थचे अध्यक्ष शांथी श्रीधर व या क्षेत्रातील अनेक तज्ञ उपस्थित होते.




पुणे ईशरे (इंडियन सोसायटी ऑफ हिटिंग ,रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स ) पुणे चॅप्टर आयोजित हॉटेल टिपटॉप इंटरनॅशनल, पुणे येथे "जागतिक रेफ्रिजरेशन दिवस" या निमित्ताने "जागतिक पातळीवर प्रथमच पुण्यात भरलेल्या ग्रीन कोल्ड चेन कॉनक्लेव्हचे उद्घाटन मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

# हवेली क्रमांक तीनमध्ये २७ दस्तांचे गैरप्रकार उघडकीस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हवेली क्र. ३ चे तत्कालीन प्रभारी सह दुय्यम निबंधक गणपत पवार यांनी पदाचा गैरवापर करत तुकडाबंदी कायद्याचा भंग केल्याचा गंभीर निष्कर्ष चौकशी अहवालातून समोर आले आहेत. स्वाभिमानी ब्रिगेडचे अध्यक्ष रोहन सुरवसे-पाटील यांच्या तक्रारीनंतर सुरू झालेल्या चौकशीत हा प्रकार उघडकीस आला आहे.




रोहन सुरवसे-पाटील यांनी ४ जून २०२५ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने हवेली तालुक्यातील विविध जमिनींच्या ३५ खरेदी-विक्री दस्तांची चौकशी करण्यात आली होती. यापैकी २७ दस्तांची तपासणी पूर्ण झाली असून, त्यामध्ये तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. चौकशी अहवाल सह जिल्हा निबंधक वर्ग-२ यांनी वर्ग-१ यांच्याकडे सादर केला असून, तो आता नोंदणी व मुद्रांक शुल्क महानिरीक्षकांकडे कारवाईसाठी पाठवला जाणार आहे. तपासणीमध्ये संबंधित दस्तांमध्ये सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी न घेता दस्त नोंदविण्यात आला आहे. तसेच त्यात मंजूर नकाशा जोडलेला नाही. त्यामुळे तुकडाबंदी कायद्याच्या स्पष्ट अटींचा भंग झाला आहे. यामुळे महसूल आणि नोंदणी विभागातील कामकाजातील गंभीर त्रुटी समोर येत आहेत.

शहरालगतच्या हडपसर, लोहगांव, महंमदवाडी, कोलवडी, लोणी काळभोर, मांजरी बु., कोंढवा, सुस, वाघोली, उरुळी देवाची, आंबेगाव बु., आव्हाळवाडी या भागांतील जमिनीच्या साठेखत प्रकरणांची चौकशी करण्यात आली होती. प्लॉटिंग विक्रीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन झाल्याचे यातून दिसून येते. शहरालगतची अनेक दस्त नोंदणी आर्थिक तडजोडीच्या आधारे ४०० ते २ गुंठ्यांपर्यंतच्या प्लॉट्ससाठी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे नोंदणी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाईची मागणी होत आहे.



तुकडाबंदी कायदा अस्तित्वात असतानाही नोंदणी कार्यालयातून मोठ्या प्रमाणात त्याच्या अटींचे उल्लंघन केले जात असल्याचे उघड झाले आहे. तडजोडीच्या आधारे ४५० ते २ गुंठ्यांपर्यंतच्या बेकायदा दस्तांची नोंदणी केली गेल्याचे निदर्शनास आले आहे. हवेली क्र. ३ चे तत्कालीन अधिकारी गणपत पवार यांनी नोंदविलेल्या ३५ दस्तांपैकी २७ दस्तांची तपासणी पूर्ण झाली असून, त्यामध्ये तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

**- रोहन सुरवसे-पाटील,** अध्यक्ष स्वाभिमानी ब्रिगेड, पुणे



## अभ्यास व मैदानी खेळाला महत्त्व द्या : डॉ. कुलकर्णी

**पुणे :** 'सभोवतालच्या प्रलोभनांना बळी न पडता अभ्यास आणि मैदानी खेळाला महत्त्व द्या. कोणत्याही गोष्टींच्या अतिवापराचे रूपांतर व्यसनात होते, त्यामुळे सोशल मीडिया व तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता, त्याचा वापर मर्यादित करा. दैनंदिन दिनचर्येकडे सकारात्मकतेने पाहिल्यास यशस्वी होणे अवघड नाही, असे प्रतिपादन ज्येष्ठ अस्थिशल्य विशारद व धन्वंतरी रुग्णालयाचे संचालक डॉ. मनीष कुलकर्णी यांनी व्यक्त केले. निमित्त होते आबासाहेब अत्रे दिन प्रशालेतील विद्यार्थ्यांनी 'राष्ट्रीय डॉक्टर दिना' निमित्त रास्ता पेठेतील धन्वंतरी रुग्णालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे. 'सुदृढ व निरोगी आयुष्यासाठी लहानपणापासूनच सकस आहार आणि भरपूर व्यायामाला प्राधान्य देण्याचा, सल्लाही डॉ. कुलकर्णी यांनी दिला. याप्रसंगी अत्रे प्रशालेतील मुलांनी ग्रंथ भेट देऊन धन्वंतरी रुग्णालयातील डॉ. मनीष कुलकर्णी, डॉ. कौशिक कुलकर्णी, डॉ. अतुल टाकसाळकर आदी डॉक्टरांचा सन्मान केला. याप्रसंगी अत्रे प्रशालेचे प्राचार्य प्रवीण सुपे, प्रसाद भडसावळे, विजयकुमार कुलकर्णी, उत्तम साळवे उपस्थित होते.



## जॉय एन क्रू तर्फे नॉर्दर्न लाईट्स च्या पर्यटनाची संधी

**पुणे :** प्रकृतीच्या अद्भुत आणि भुरळ घालणाऱ्या चमत्कारांपैकी एक म्हणजे नॉर्दर्न लाईट्स (Aurora Borealis). या अद्वितीय दृश्याचा आनंद घेण्याची संधी आता जॉय एन क्रू या भारतातील प्रीमियम ट्रॅव्हल ब्रँड तर्फे पर्यटकांना उपलब्ध झाली आहे. उबदार ग्लास इग्लू मध्ये झोपण्याचा अनुभव, स्नोमोबाईल आणि रेनडिअर स्लेज वरून ऑरोराचा पाहणे, तसेच बर्फाळ समुद्रात आइसब्रेकर क्रूझ ही प्रवासाची वैशिष्ट्ये आहेत. जॉय एन क्रू सोबत ही स्वप्नवत आर्क्टिक सफरची टूर केवळ पाहण्याचीच नाही, तर जगण्याची एक अविस्मरणीय अनुभूती ठरणार आहे. ही संपूर्ण यात्रा आराम, लक्झरी आणि तज्ज्ञ मार्गदर्शनाने परिपूर्ण असून नॉर्वे, फिनलंड आणि आइसलँड या स्कँडिनेव्हियन देशांमध्ये जॉय एन क्रू कडून गट प्रवास तसेच व्यक्तिगत प्रवास यांचे पर्याय दिले जातात. प्रत्येक टूर ही फक्त पर्यटन न राहता, एक आयुष्यभराची आठवण बनावी असा उद्देश या ब्रँडचा असतो.

## शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली ६० लाखांची फसवणूक

**पुणे :** शेअर मार्केट ट्रेडिंगच्या नावाखाली नागरिकांची लाखो रुपयांनी फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत पुणे सायबर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात नेपाळी नागरिकांसह एकूण सहा जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून फसवणुकीसाठी वापरण्यात आलेला मोठा डिजिटल व आर्थिक पुरावा हस्तगत करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलीसांनी नोरबु शर्पा, व अंगनुरी शर्पा ( दोघेही नेपाळचे रहिवासी);सागर मच्छिंद्र गायकवाड (वय २६, रा. सिंहगड रस्ता),शिवतेज अशोकराव गुंजकर (वय ३३, रा. आंबेगाव) यांना अटक केली आहे.

शहरातील एका नागरिकाशी "ऑनलाइन शेअर ट्रेडिंगद्वारे भरघोस नफा मिळेल" असा खोटा दावा करत सतत फोन व व्हॉट्सअ‍ॅपद्वारे संपर्क ठेवण्यात आला. दिव्या अग्रवाल व अशोक रेड्डी या दोन एजंटांनी त्या व्यक्तीला एक अ‍ॅप डाउनलोड करण्यास सांगितले आणि त्याद्वारे आयपीओ व शेअर्समध्ये गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवले.

या माध्यमातून त्या व्यक्तीकडून ६० लाख २० हजार रुपये उकळले गेले. नंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच संबंधित नागरिकाने त्वरित पुणे सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

## औंधमधील नामांकित शाळेला बॉम्बस्फोटाची धमकी

**पुणे :** औंध येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल या नामांकित शाळेला सोमवारी सकाळी ईमेलद्वारे बॉम्बस्फोटाची धमकी दिल्याची खळबळजनक घटना घडली. 'शाळेच्या परिसरात स्फोटके लपवली असून, इमारत तातडीने रिकामी न केल्यास जीवितहानी होईल,' असा मजकूर या ईमेलमध्ये होता. त्यामुळे काही काळ शाळा परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ही धमकी सोमवारी सकाळी ११.५० वाजता शाळेच्या अधिकृत ईमेलवर आली. "आम्ही 'रोडकिल' आणि 'क्यो' या दहशतवादी संघटनेचे सदस्य असून, हा संदेश तात्काळ माध्यमांपर्यंत पोहोचवा," असा उल्लेखही मेलमध्ये करण्यात आला होता. ईमेलचा स्त्रोत 'roadkillkyo@***.com' असा असून, तो कोणी पाठवला, हे अद्याप अस्पष्ट आहे.

घटनेची माहिती मिळताच शाळेच्या प्राचार्या अपूर्वा पाटील यांनी तत्काळ पोलिस ठाण्याशी संपर्क साधला. काहीच वेळात वरिष्ठ पोलीस निरीक्षक उल्हास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक, अँटी टेररिस्ट सेल, गुप्तचर विभागाचे अधिकारी आणि बॉम्ब शोध व निकामी करणारे पथक घटनास्थळी दाखल झाले. बीडीडीएस पथकप्रमुख डिओ सातपुते यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या संपूर्ण परिसराची बारकाईने तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर कोणतीही स्फोटके अथवा संशयास्पद वस्तू न आढळल्याचे लेखी प्रमाणपत्र शाळा प्रशासनाला देण्यात आले.

# 'गो ग्रीन' मध्ये पर्यावरण स्नेहींची 'हिरवाई'

### महावितरणची मोहिम फत्ते : पाच लाख ग्राहकांना सहा कोटींचा फायदा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सहभागी झालेल्या ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी 'गो-ग्रीन' योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल अ‍ॅप व www.mahadiscom.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी 'गो-ग्रीन' योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे.

महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.






वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत ५ लाख ३ हजार ७९५ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे. यामध्ये (कंसात आर्थिक फायदा रूपयांत) पश्चिम महाराष्ट्रात सर्वाधिक २ लाख १ हजार २३३ (२.४२ कोटी), कोकण- १ लाख १३ हजार २५४ (१.३६ कोटी), उत्तर महाराष्ट्र- ७० हजार २२६ (८४.२७ लाख), विदर्भ- ६३ हजार ७३१ (७६.४७ लाख) तसेच मराठवाड्यामध्ये योजनेत सहभागी ५५ हजार ३५१ वीजग्राहकांना ६६ लाख ४२ हजार रूपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

> गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती. त्यामुळे अधिकाअधिक ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा.
>
> **-राजेंद्र पवार,** संचालक (मानव संसाधन, महावितरण)

### असा मिळतोय ग्राहकांना लाभ

- *महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे.
- *वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलतीचा लाभ
- * *वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते.
- * महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध
- * आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# कोंडीला 'गती'; कामांना 'मती'...!

### कात्रज चौक ते सातारा रस्ता रुंदीकरणाची कामे संथ; नागरिक त्रस्त

कात्रज चौक हा शहराचे दक्षिण भागातील महत्त्वाचे प्रवेशद्वार. कोल्हापूर, सातारा, सांगली आणि कोकणात जात असलेल्या प्रवाशांची याच चौकावर सर्वाधिक मदार असते. त्यातच कर्नाटकातील बेळगावसह अन्य शहरांमध्ये जाण्यासाठी येथूनच महामार्ग आहे; त्यामुळे या महामार्गावरील वाहतूक कोंडी ही वाहनचालकांच्या आणि स्थानिक नागरिकांच्या पाचवीलाच पूजलेली आहे. त्यातच याच चौकातून उरुळी देवाची आणि दिवेघाट मार्गे सासवडकडे जाण्यासाठी येथूनच जावे लागते; त्यामुळे या भागात वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी प्रशासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता होती. मात्र; त्यासाठी प्रशासनाने तसदीच न घेतल्याने त्याचा मोठा ताण सहन करावा लागत असून पोलीसांसाठी तर ही मोठी डोकेदुखीच बनली आहे.

> सातारा रस्त्यावर पावसाळी वाहिनीचे काम सुरू आहे. परंतु, सध्या पावसामुळे कामात अडथळा येतो आहे. पावसाने उघडीप दिल्यानंतर कामाला गती दिली जाईल. त्यानंतर दहा फूट रुंदीकरणाचे काम होणार असून, त्यामुळे वाहतूक कोंडीतून काहीसा दिलासा मिळेल.
>
> **-दिलीप पांडकर,** उप अभियंता पथ विभाग, पुणे मनपा.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कात्रज चौकातून सातारा रस्त्याकडे जाणाऱ्या मार्गावर सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरण आणि पावसाळी वाहिनीच्या कामामुळे नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याच्या कडेला खोदलेले खड्डे, अर्धवट काम, वाहतुकीसाठी अपुरी जागा आणि नियोजनाचा अभाव यामुळे रोजच्या गर्दीच्या वेळात या भागात तीव्र वाहतूक कोंडी होत आहे. कामाच्या संथ गतीमुळे नाराज नागरिकांनी पालिका प्रशासनाकडे तातडीने गती देण्याची मागणी केली आहे.

सातारा रस्त्यावरील रुंदीकरणासाठी महापालिकेने काही दिवसांपूर्वी पावसाळी पाण्याच्या वाहिनीसाठी रस्ता खोदण्याचे काम सुरू केले आहे. मात्र, काम सुरू असतानाही त्याच्या ठिकाणी कोणतीही योग्य सूचना, सुरक्षेची व्यवस्था, किंवा वाहतूक मार्गदर्शन नसल्याने गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. ठिकठिकाणी पडलेले उघडे खड्डे, रस्त्यालगत ठेवलेले सिमेंट ब्लॉक्स, आणि अपूर्ण कामामुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत.

"रोज सकाळी आणि संध्याकाळी कामाच्या वेळेस या रस्त्यावरून जाणे म्हणजे मोठा त्रास आहे. वाहने अडकतात, अपघाताची शक्यता वाढते. महापालिकेने काम वेळीच पूर्ण करायला हवे होते. आता पावसात उघडं काम राहिलंय, त्यामुळे अजूनच अडचण झाली आहे," अशी प्रतिक्रिया स्थानिक रहिवासी राजू कदम यांनी दिली.

या भागातील रस्ते अरुंद झाल्यामुळे चौकातून पुढे गंधर्व लॉन्सकडे जाताना वाहनांची गर्दी बॉटलनेकसारखी अडकते. नियोजनाचा अभाव आणि संथ कामामुळे याचा थेट परिणाम वाहतूक व्यवस्थेवर होत असून, वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. यामुळे वाहतूक पोलिसांवरही अतिरिक्त ताण येत आहे.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांनी कामाचे नियोजन अधिक काटेकोरपणे करावे, सुरक्षेची योग्य व्यवस्था करावी, वाहतूक मार्गदर्शक फलक लावावेत आणि कामाला तातडीने गती द्यावी, अशी जोरदार मागणी केली आहे.

## पालिकेच्या कनिष्ठ अभियंता भरतीला मंजुरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे महानगरपालिकेतील कनिष्ठ अभियंता पदभरती प्रक्रिया अखेर मार्गी लागणार आहे. राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने या रखडलेल्या भरतीस मंजुरी दिली असून, आता एकूण १७१ पदांसाठी सुधारित जाहिरात प्रसिद्ध करण्याचे आदेश महापालिकेला देण्यात आले आहेत. या भरती प्रक्रियेसाठी यापूर्वी अर्ज केलेल्या २७ हजार ८७९ उमेदवारांचे अर्जही वैध मानण्यात येणार आहेत.

महापालिकेने जानेवारी २०२४ मध्ये ११३ कनिष्ठ अभियंता पदांसाठी भरतीची जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यासाठी तब्बल २७ हजार ८७९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. मात्र, त्यानंतर राज्य शासनाने सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गांसाठी नवीन बिंदू नियमावली लागू करत, सरळसेवा भरती प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती दिली होती.

या प्रक्रियेनंतर, महापालिकेच्या जाहिरातीत मागासवर्गीय आरक्षणाचा समावेश नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे सुधारित बिंदू नियमावलीनुसार सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गासाठी आरक्षण लागू करण्याचे निर्देश शासनाने दिले. परिणामी ही भरती प्रक्रिया तब्बल दीड वर्ष रखडली.

दरम्यान, या कालावधीत अर्ज केलेल्या उमेदवारांचे अर्ज वैध राहणार की नाही, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. यावर महापालिकेने नगरविकास विभागाकडे स्पष्टता मागितली. त्यावर आता विभागाने पूर्वी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांचे अर्ज वैध ठरवण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जातीचा प्रवर्ग अद्ययावत करण्याची संधीही उमेदवारांना दिली जाणार आहे.

विशेष म्हणजे, या दीड वर्षांच्या कालावधीत वयोमर्यादा पार केलेल्या अर्जदारांनाही सुधारित जाहिरातीतून अर्ज करता येणार आहे, असा दिलासादायक निर्णय शासनाने घेतला आहे.

महापालिकेकडून लवकरच सुधारित जाहिरात प्रसिद्ध करून, पुढील प्रक्रिया सुरु करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## प्रभागरचना पुन्हा 'त्या' कर्मचाऱ्यांकडेच?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागरचनेसाठी २०१७ मध्ये काम पाहिलेल्याच कर्मचाऱ्यांना पुन्हा नेमल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ने तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. २०१७ मध्ये पक्षपाती प्रभागरचना करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पुन्हा संधी देणे म्हणजे जनतेच्या विश्वासाला तडा देणारी बाब असल्याचा आरोप राष्ट्रवादीचे शहर कार्याध्यक्ष नितीन कदम यांनी केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांची भेट घेऊन आपला लेखी आक्षेप नोंदवला. यावेळी नितीन कदम म्हणाले, "२०१७ मध्ये आमच्या वारंवार आक्षेपानंतरही काही कर्मचाऱ्यांनी एकाच पक्षाला सोयीस्कर ठरेल अशा पद्धतीने प्रभागरचना केली होती. हेच कर्मचारी आता पुन्हा नियुक्त करण्यात आले आहेत, हे अत्यंत धक्कादायक आहे."

या कर्मचाऱ्यांनी तत्कालीन उपायुक्त सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षपातीपणे प्रभागरचना केली होती, असा आरोपही त्यांनी केला. अशा पक्षपाती निर्णयामुळे गेल्या आठ वर्षांत पुण्याची नागरी व्यवस्था ढासळली असून शहर बकाल होण्यास हे कर्मचारी कारणीभूत असल्याचे शिष्टमंडळाचे म्हणणे आहे.

"प्रभागरचना हा निवडणुकीतील अत्यंत महत्त्वाचा आणि मूलभूत टप्पा आहे.



**पुणे** पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागरचनेसाठी २०१७ मध्ये काम पाहिलेल्याच कर्मचाऱ्यांना पुन्हा नेमल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)ने तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. या कर्मचाऱ्यांना बदलण्यात यावे या मागणीसाठी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे शहर कार्याध्यक्ष नितीन कदम यांच्या नेतृत्त्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हा निवडणूक आयोगाला निवेदन दिले.

# पतित पावन संघटनेतर्फे 'शासन आपल्या दारी' उपक्रम




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पतित पावन संघटनेतर्फे कै. बबनराव पांडे आणि कै. सुनील दाभाडे यांच्या स्मरणार्थ 'शासन आपल्या दारी' उपक्रमाचे आयोजन पुण्यातील गुरुवार पेठ परिसरात करण्यात आले. या उपक्रमात आमदार हेमंत रासने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रांताधिकारी सीमा गेजगे, महेश पांडे, दाभाडे आणि स्थानिक ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. या धकाधकीच्या जीवनात शालेय विद्यार्थ्यांना व नागरिकांना शासकीय दाखले मिळवताना होणारा त्रास लक्षात घेऊन 'शासन आपल्या दारी' उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन संघटनेचे अध्यक्ष स्वप्निल नाईक, राजाभाऊ राजपूत, महेश पाटोळे, आदित्य परदेशी, अक्षय अभंग, पराग नाईक यांनी केले. त्यांच्यासोबत संघटनेचे पदाधिकारी दिनेश भिलारे, यादव पुजारी, योगेश वाडेकर आणि इतर सदस्यही उपस्थित होते. या उपक्रमाचा लाभ एकूण १,२४८ कुटुंबांतील सुमारे ८,५०० नागरिकांनी घेतला.

या उपक्रमांतर्गत नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. रेशन कार्डमधील नावांमध्ये बदल, ५ ते १८ वयोगटातील मुलांचे नवीन आधारकार्ड तयार करणे व दुरुस्ती करणे, श्रावण बाळ योजना, शहरी गरीब योजना, संजय गांधी निराधार योजना, उत्पन्नाचा दाखला, ज्येष्ठ नागरिक दाखला, नवीन पॅन कार्ड काढणे व दुरुस्ती करणे, रहिवासी (डोमिसाईल) प्रमाणपत्र, जन्माचा दाखला, सर्व जातीचे दाखले, एसटी महामंडळाच्या विविध योजना तसेच धर्मादाय योजनांची माहिती या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात आली.



> सध्या महाविद्यालयीन प्रवेशाचे दिवस आहेत; त्यामुळे या प्रवेशासाठी विविध शासकीय कागदपत्रांची आवश्यकता असते. ही कागदपत्रे जमा करण्यासाठी विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांची मोठी धावपळ होते; या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राबविण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असाच आहे.
>
> **-हेमंत रासने;** आमदार, कसबा

## माजी आमदार कृष्णराव भेगडे यांचे निधन



**मावळ :** पुणे जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते, मावळचे माजी आमदार आणि शिक्षणमहर्षी म्हणून ओळखले जाणारे कृष्णराव धोंडिबा भेगडे (वय ८९) यांचे सोमवारी (दि.३० जून) रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने मावळ तालुक्याने एक ज्येष्ठ मार्गदर्शक आणि शिक्षण क्षेत्रातील द्रष्टे नेते गमावले आहेत. कृष्णराव भेगडे यांच्यामागे कन्या राजश्री म्हस्के, जावई राजेश म्हस्के व नातवंडे असा परिवार आहे. कृष्णराव भेगडे यांच्यावर अंत्यसंस्कार तळेगावच्या बनेश्वर स्मशानभूमीत करण्यात आले.



## विरोधी पक्षातील पदाधिकाऱ्यांचा कॉंग्रेस पक्षात प्रवेश

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली आज रोजी कॉंग्रेस पक्ष कार्यालय, खराळवाडी पिंपरी येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार गट) महिला शहर उपाध्यक्ष जन्नतबी सय्यद व मनसेच्या महिला पदाधिकारी आशा रमेश बोरकर यांचा समर्थकांसहित कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करण्यात आला. त्यांच्या समवेत सकिना शेख, सानिका सोनवणे, राबिया शेख, कविता चांदवड, वैशाली हिरे, स्वाती गजरे, सोनाली शिंदे, मनाली साळी, तरन्नुम शेख, परविन शेख, आयान शेख, राकेश साठे, राजेंद्र महाजन यांनी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.



## मातोश्री रमाई भीमराव आंबेडकर स्मारकाचे भूमिपूजनची मागणी

**पिंपरी :** पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या मागील जागेत मातोश्री रमाई भीमराव आंबेडकर यांचे यथोचित स्मारक लवकरात लवकर उभारावे, तसेच यासाठीचा आवश्यक ३५ कोटीचा रुपयांचा निधी जाहीर करून या स्मारकाचे भूमिपूजन करावे अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मातोश्री रमाई आंबेडकर स्मारक निर्माण समितीचे अध्यक्ष प्रमोद क्षीरसागर व समन्वयक राहुल डंबाळे यांनी पत्राद्वारे केली आहे. तसे पत्र संस्थेच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांना सोमवारी देण्यात आले.

यावेळी महेंद्र सरवदे, राहुल सोनवणे, बुद्धभूषण अहिरे, गौतम पटेकर, प्रशांत नाटेकर, मंथन गायकवाड, सिद्धार्थ मोरे, विशाल मांजरे, पंकज भेंडे, अक्षय करंडे, सन्मुख हदीमणी, सचिन उदागे, बसवराज नाटेकर, शुभम शिंदे, सुलतान तांबोळी, रमेश शिंदे, राहुल बनसोडे आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नुकताच प्रास्तावित विकास आराखडा जाहीर केला आहे. या आराखड्यामध्ये नियोजित मातोश्री रमाई आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या जागेवर दुसरे आरक्षण दाखविण्यात आले आहे. यामुळे आंबेडकरी चळवळीतील जनतेमध्ये मनपा प्रशासनाविषयी तीव्र रोष निर्माण झाला आहे. या ठिकाणी रमाईंचे यथोचित स्मारक यामध्ये पूर्णा कृती पुतळा, शिल्पसृष्टी, उद्यान विकसित करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी आंबेडकरी चळवळीतील जनतेला यापूर्वी आश्वासन दिले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनातील इतर अधिकाऱ्यांसमवेत या जागेची स्थळ पाहणी देखील केली आहे. परंतु आता या जागेवर दुसरेच आरक्षण दाखवल्यामुळे जनतेमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हा संभ्रम दूर करण्यासाठी या नियोजित स्मारकाचे भूमिपूजन ताबडतोब करावे, अशी मागणी स्मारक निर्माण समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

## दफनभूमी रहिवासी परिसरात नको : आ. उमा खापरे



**पिंपरी :** विकास आराखड्यातील आरक्षणे चुकीची असल्याने शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दोन दिवसापूर्वी तो रद्द करण्याची मागणी केली, आता भाजप विधान परिषदेच्या आमदार उमाताई खापरे यांनी केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने नुकताच प्रारूप विकास आराखडा जाहीर केला आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १९ मध्ये आरक्षण क्रमांक २६०, २६२ व २६४ येथे दफनभूमीचे आरक्षण सुचविण्यात आले आहे. हे आरक्षण शाळा आणि रहिवासी परिसरालगत असल्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना त्यामुळे त्रास होऊ शकतो. तसेच लिंक रोड, भाटनगर येथे असणाऱ्या दफनभूमी पेक्षा चौपट मोठ्या आकाराची जागा आरक्षित करण्याचा घाट पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने घातला आहे. याला चिंचवड, तानाजी नगर, लिंक रोड परिसरातील सर्व सोसायटीतील नागरिकांची तीव्र हरकत असल्याचे पत्र आमदार उमा खापरे यांनी आयुक्त शेखर सिंह यांना दिले आहे. शुक्रवारी ऑटो क्लस्टर येथे झालेल्या बैठकीत आ. उमा खापरे यांच्या समवेत उपस्थित २५० पेक्षा जास्त नागरिकांनी लेखी स्वरूपात हरकती दाखल केल्या.

## आक्रोश मोर्चा




## डीपी विरोधात पालिकेवर आक्रोश मोर्चा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** थेरगाव, वाल्हेकरवाडी, चिंचवडेनगर, बिजलीनगर, रहाटणी परिसरातील संतप्त रहिवाशांनी प्रारूप विकास आराखड्याच्या विरोधात (डीपी) विरोधात पिंपरी-चिंचवड महापालिका भवनावर सोमवारी (दि.30) आक्रोश मोर्चा काढला. दाट लोकवस्तीतील प्रशस्त रस्त्यांचे तसेच, रिंग रोडचे (एचसीएमटीआर) आरक्षण रद्द करण्याची आग्रही मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. घोषणाबाजी करीत महापालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न करण्यात आला.

मोर्चा चिंचवड स्टेशन येथील लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून सुरू झाला. त्यात महिलांची संख्या लक्षणीय होती. आमच्या हक्काचं घर रिंगरोडमध्ये जाणार नाही. डीपी रद्द झाला पाहिजे, असे फलक अनेकांच्या हातात होते. हा मोर्चा मोरवाडी चौक मार्गे महापालिका भवनाच्या प्रवेशद्वाराजवळ आला. तेथे मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. मोर्चात शेकडो नागरिक सहभागी झाले होते. डीपीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवण्याचा घाट महापालिका प्रशासन घातला आहे. आयुष्यभर मेहनतीने उभे केलेले सामान्य नागरिकांची घरे डीपीच्या माध्यमातून पाडण्याचा प्रयत्न प्रशासन करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

# पालिकेच्या विद्यार्थ्यांना 'डीबीटी'चे वरदान

## तब्बल १४ दिवसांमध्ये १५ हजार विद्यार्थ्यांना साहित्य!





शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका 'डीबीटी' उपक्रमातील अनेक आव्हानांवर मात करून विद्यार्थ्यांना मौल्यवान शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध ! ई-रूपी डिजिटल पेमेंट प्रक्रिया वापर करून आम्ही निधीचा कार्यक्षमपणे वापर केला आहे. त्याबरोबरच पालक आणि विद्यार्थ्यांकरिता पेमेंटची संपूर्ण प्रक्रिया सुलभ केली आहे. आमच्या समोरील विक्रेत्यांचे वर्गीकरण, दर्जेदार उत्पादनांची पडताळणी अशा आव्हानांवर मात करून आम्ही विद्यार्थांना मौल्यवान शिक्षण देत आहोत."

**-प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त

"शाळेच्या पहिल्या दिवसापासूनच सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळण्यासाठी विभाग सर्व स्तरावर काम करित आहे. सर्व वितरकांकडून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले असून आता विविध टप्प्यामध्ये सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यासाठी विभाग तत्पर असून एकही विद्यार्थी साहित्यापासून वंचित न राहता सर्वांना साहित्य मिळण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहेत."

**-तानाजी नरळे,** साहाय्यक आयुक्त, शिक्षण विभाग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळा दिनांक नुकत्याच उत्साहात सुरु झाल्या. पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप सुध्दा करण्यात आले. सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्यवाटपासाठी थेट लाभ हस्तांतरण (DBT) उपक्रमातून शालेय व आवश्यक साहित्यांचे वाटप सुरु केले असून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना त्याचा लाभ मिळाला आहे. शाळांकडून साहित्याच्या किटचे यशस्वीपणे वितरण करून एक महत्त्वाचा टप्पा पार केला आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाने बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने, डिजिटल ई-रूपी पेमेंट प्रक्रिया राबविल्यामुळे साहित्य वितरण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता येऊन सदर प्रक्रिया जलदपणे राबविण्यात येत आहे.

### अद्यापही विद्यार्थी व पालकांकडून साहित्य घेण्याची प्रक्रिया सुरु

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने थेट लाभ हस्तांतरण उपक्रमातून साहित्यांचे वाटप करण्यासाठी शहरातील वितरकांची नेमणूक केली असून त्यांच्याकडून डिजिटल ई-रुपी पेमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना साहित्य उपलब्ध होत आहे. शाळा सुरु होऊन आता १४ इतके दिवस झाले असून आत्तापर्यंत सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना साहित्य मिळाले आहे. अद्यापही विद्यार्थी व पालकांकडून साहित्य घेण्याची प्रक्रिया सुरु असून यामध्ये सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध होईल. केल्याचे शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी संगिता बांगर यांनी माहिती देताना स्पष्ट केले.

### जलद आणि कार्यक्षम प्रक्रिया राबविणार !

"चालू शैक्षणिक वर्षामध्येसुध्दा 'डीबीटी'च्या यशस्वी अंमलबजावणीमुळे आमच्या विद्यार्थ्यांना उच्च-गुणवत्तेचे साहित्य पुरवता आले आहे. ई-रूपी सारख्या डिजिटल पेमेंट प्रक्रियेमुळे निधीचा कार्यक्षमतेने वापर करण्यात आला असून याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. गतवर्षी यशस्वी झालेल्या उपक्रमामुळे चालूवर्षीसुध्दा प्रत्येक विद्यार्थ्याला लाभ घेता येत असून यापुढेही एकही विद्यार्थी सदर साहित्यापासून वंचित राहणार नाही याची काळजी आम्ही घेणार आहोत."

## वाहतूकदारांचे स्व-इच्छेने बेमुदत चक्का जाम आंदोलन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** "ई – चलन कार्यप्रणाली" ही माल व प्रवासी वाहतूकदार व्यवसायिकांची गळचेपी करणारी यंत्रणा आहे, याकडे तसेच वाहतूकदारांच्या इतर प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सर्व वाहतूक व्यावसायिक मंगळवारी (दि. १ जुलै) मध्यरात्री १२ पासून स्व – इच्छेने बेमुदत चक्काजाम आंदोलन सुरू करणार आहेत. या आंदोलनात राज्यातील ३० पेक्षा जास्त वाहतूक व्यवसायिकांच्या संघटना स्वयंस्फूर्तीने सहभागी होणार आहेत अशी माहिती पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत असोसिएशन ऑफ ट्रान्सपोर्टर्स, पुणे संस्थेचे अध्यक्ष दिलीप देशमुख यांनी दिली.

यावेळी गौरव कदम यांनी सांगितले, "ई – चलन कार्यप्रणाली" वाहतूक व्यवसायिकांवर अन्याय करणारी आहे. याविषयी वाहतूकदार बचाव कृती समिती आणि महाराष्ट्र राज्यातील तमाम प्रवासी व माल वाहतूकदार व्यवसायिकांच्या वतीने मुख्यमंत्री तसेच राज्य सरकारला अनेकवेळा निवेदन देण्यात आले. तरी देखील राज्य सरकारने या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. या प्रणाली नुसार वाहतूकदारांकडून जबरदस्तीने दंड वसूली केली जाते ती ताबडतोब थांबवावी, विनाकारण लावलेले या अगोदरचे सर्व दंड पूर्णतः माफ करावे, क्लिनर ठेवण्याची सक्ती नसावी, माल वाहतूकदारांना शहर व शहरालगत परिसरात वाहतूक करण्यासाठी अनेक ठिकाणी अन्यायकारकपणे वेळेचे बंधन घालण्यात आले आहे. त्यामुळे वाहतूकदारांचा इंधन खर्च वाढतो व उत्पन्नावर त्याचा विपरीत परिणाम होतो. याविषयी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आमरण उपोषण सुरू आहे.

### निवेदन सादर

- उपोषणास राज्यातील सर्वच वाहतूक व्यावसायिक संघटनांचा पाठिंबा आहे. त्यानुसार मंगळवारी राज्यातील वाहतूक व्यवसायिकाच्या ३० संघटनांसह पुणे शहर, पिंपरी चिंचवड शहर तसेच पुणे जिल्ह्यातील सर्व प्रवासी व मालवाहतूक व्यवसायिकदार स्व – इच्छेने बेमुदत चक्काजाम आंदोलनात करणार आहेत. या विषयाचे निवेदन जिल्हाधिकारी तसेच पुणे आणि पिंपरीचे पोलीस आयुक्त यांना संस्थेच्या वतीने देण्यात आले आहे.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून लाडू व पेढे वाटून आनंदोत्सव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्र शासनाने प्राथमिक शालेय शिक्षणात तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीचा निर्णय अखेर रद्द केल्याचे जाहीर केले आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्रभरातून जनतेतून समाधान व्यक्त होत असून, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत पिंपरीतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे भव्य आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मनसेच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत पिंपरी चौकात फटाक्यांची आतषबाजी केली. तसेच नागरिकांना लाडू व पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. या प्रसंगी परिसरात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी नागरिकांना संबोधित करताना मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले म्हणाले की, "माझ्या मराठीची बोलू कौतुके, अमृतापेक्षा पैज जिंके, या अभंगातून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी भाषेचे महत्त्व पटवून सांगितले होते. आणि आज त्याच मराठी भाषेला पर्याय देण्याचे चुकीचे काम आम्ही कदापी सफल होऊ देणार नाही. हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी ५ जुलै रोजी महामोर्चा काढण्याची घोषणा केली होती. या मोर्चाला मिळणारे प्रचंड जनसमर्थन, वाढता विरोध आणि संभाव्य आंदोलने लक्षात घेता, अखेर महायुती सरकारने याबाबतचा निर्णय मागे घेतला. हे महाराष्ट्रातील भाषिक अस्मितेचे आणि लोकशक्तीचे मोठे यश आहे.भाषा हा सक्तीचा विषय नव्हे. महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांवर लादलेली भाषेची जबरदस्ती अखेर जनशक्तीपुढे झुकली आहे. ही विजयगाथा संपूर्ण महाराष्ट्राची आहे." असे चिखले यांनी आवर्जून सांगितले.

# सराव करायचा कोठे ? ढोल-ताशा पथकांचा सवाल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** गणेशोत्सवाच्या आधी ढोल-ताशा पथकांच्या सरावास सुरुवात होत असते. त्यामुळे शहरातील काही भागांत ढोल-ताशा वादनाचा दणदणाट ऐकू यायला लागला आहे. आवाजाचा त्रास होऊ नये, यासाठी नागरी वस्तीपासून दूर सराव करायला लागतो. मात्र, शहरात सध्या ढोल-ताशा वादनास पुरेशी जागा नसल्याची खंत ढोल-ताशा पथकांकडून व्यक्त केली जात आहे.

गणेशोत्सवाच्या दोन महिने अगोदरच ढोल-ताशा पथकांच्या सरावास सुरुवात होत असते. गणेशोत्सवात वाजविल्या जाणाऱ्या ढोल-ताशांची क्रेझ तरुण आणि शालेय विद्यार्थ्यांमध्येदेखील आढळून येते.



### पथक जागेच्या शोधात

- सध्या शहरात ढोल-ताशा वादनासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. ज्यांची मालकी हक्काची जागा आहे त्यांच्याकडून ज्यादा भाडे आकारले जाते. ते पथकांना परवडत नाही. पथक जागेच्या शोधात आहेत. अद्याप काहींनी सरावास सुरुवात केली नाही, तर काहीं पथकांचा सराव सुरू आहे.

- पथकात नवीन वादकांचा समावेश असतो. त्यांना जास्त सरावाची गरज असते. त्यामुळे पथकांना दोन ते अडीच महिनेअगोदर सराव सुरू करावा लागतो.
- पथकात वादनावेळी एकाग्रता व एकसूत्रीपणा लागतो. त्यामुळे वादनाच्या वेळी पथकातील वादकांमध्ये लयबद्धता दिसते.
- खूप दिवसांचा सराव असतो. ढोल - ताशा पथकांनी महापलिकेकडे जागेची मागणी केली आहे. मात्र, अद्याप ढोल - ताशा पथकांना सरावासाठी जागा उपलब्ध झालेली नाही.
- पथकांना भाडे भरून सराव करावा लागतो. दोन महिन्यांसाठी ५० ते ६० हजार रुपये भाडे आकारले जाते. पण दिवसेंदिवस जागा कमी पडत आहे.
- वादन साहित्य ठेवण्यासाठी गोदाम लागते. तसेच सरावासाठी शेड मारावे लागते. यासाठी खर्च करावा लागतो.

ढोल-ताशा पथकांची सुरुवात सुरुवातीला जागा पाहणे त्यानंतर वादनाला सुरुवात होते. सरावासाठी पुरेशी जागा आणि वादनासाठी वेळेची मर्यादा पाळावी लागते. तसेच ढोल - ताशा पथक यांना मनुष्यवस्तीपासून दूर सराव करावा लागत असल्याने नदीघाट, मोकळे मैदान यावर सराव करावा लागतो. नाहीतर जवळ राहणाऱ्या नागरिकांना वादनाचा त्रास होतो.

संपादकीय विशेष

# ठसा साहित्य अकादमीचा

अलिकडेच जाहीर झालेल्या साहित्य अकादमीच्या पुरस्कारावर डॉ. सुरेश सावंत आणि प्रदीप कोकरे यांनी आपली मोहर उमटवली. कोकरे हे युवा वर्गाचे प्रतिनिधी. कोल्हापुरात राहून ते संशोधन करतात. मुंबईतील संघर्षमय जीवनाचे संवेदनशीलतेने केलेले वर्णन म्हणजे त्यांची 'खोल खोल दुष्काळ डोळे' ही कादंबरी. त्यांना यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक केंद्राची शरद पवार संशोधन फेलोशिप मिळालेली. ना. धों. महानोर पुरस्काराचे ते मानकरी. साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन त्यांचा जसा सन्मान केला, तसाच डॉ. सुरेश सावंत यांचाही केला. कोकरे मुंबईतील वडाळ्यात राहणारे तर डॉ. सावंत नांदेडचे. एक शहरी तर दुसरा ग्रामीण. एकाचा साहित्यप्रकार कादंबरीचा तर दुसरा मुलांसाठी लिहिणारा. त्यातही डॉ. सावंत यांची आवर्जून दखल घेतली पाहिजे. 42 हून अधिक पुस्तके, त्यातही लहान मुलांसाठीची जास्त. डॉ. सावंत यांनी लिहित्या हातांना बळ दिले. नवोदित लेखक, कवींना लिहिण्यासाठी मदत, मार्गदर्शन करून प्रेरित केले. त्यांनी जवळपास शंभरपेक्षा जास्त नवोदित लेखकांच्या पुस्तकांना प्रस्तावना देऊन नवोदित लेखकांच्या लिखाणाची पाठराखण केली. नवोदितांना पुस्तक प्रकाशनासाठी मुद्रणदोष तपासण्यापासून संपादन करण्यापर्यंत त्यांनी हातभार लावला. स्वतः अखंड लिहीत राहताना त्यांनी नवोदित लेखकांना उभे केले. लेखक व्हायचे स्वप्न पाहणाऱ्यांचे ते आधारवड झाले आहेत. त्यांना 'लेखक घडवणारा लेखक' म्हणतात. शिक्षणाच्या, समाजाच्या प्रगतीसाठी, उन्नतीसाठी त्यांनी वैविध्यपूर्ण सर्जनशील कार्य केले आहे. त्यांनी शासनाच्या विविध संस्थांवर, समित्यांवर काम केले आहे.

डॉ. सुरेश सावंत यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ, मराठवाडा साहित्य परिषद, मराठवाडा मुख्याध्यापक संघ, आविष्कार साहित्य मंडळ, शंकरराव चव्हाण व्याख्यानमाला इत्यादी संस्थांच्या माध्यमातून शिक्षण, संपादन, लेखन, समाजप्रबोधन या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या एकूणच अध्यापनसेवेतील, उपक्रमशीलतेचे, लेखनकर्तृत्वाचे, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान अनमोल आहे. एक समृद्ध व्यक्तिमत्त्व, स्वतंत्र विचाराचे चिंतक, ग्रंथ चळवळीचे आधारस्तंभ, लेखक आणि सकारात्मक कार्याचा खजिना जनहितासाठी खुला करणारे द्रष्टे म्हणून त्यांची ओळख आहे. प्रौढांसाठी वेगवेगळ्या प्रकारांतील लेखन करतानाच सावंत यांनी बालवाचकांसाठी लेखनसातत्य कायम राखले. विविध संस्थांच्या बालसाहित्य संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले आहे. बालसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक असा त्यांचा लौकिक आहे. दशकातील उत्कृष्ट बालसाहित्यिक म्हणूनही त्यांचा गौरव झाला आहे. सावंत यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीचा विकास करण्यासाठी अभिनव उपक्रम राबवले. जागतिक शांततेचा पुरस्कार करणारा 'युद्ध नको, बुद्ध हवा हा त्यांचा कवितासंग्रह चर्चेत आहे.

बालसाहित्य लिहिणे ही अगदी सहज सोपी गोष्ट आहे, असे अनेकांना वाटते. मुळात बालसाहित्य लिहिण्यासाठी मुलांच्या भावविश्वात डोकवावे लागते. लिहिणाऱ्यांनी स्वत: बालकांच्या वयाचे व्हावे लागते. स्वत:चे निरागस बालपण नजरेसमोर ठेवून लिखाण करावे लागते. वर वर बघून विचार करणाऱ्यांना अतिशय सोपी वाटणारी ही गोष्ट मुळात खूप कठीण आहे, याची प्रचिती खूप कमीजणांना येते. डॉ. सावंत यांनी बालसाहित्यात दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. एरवी बालसाहित्य म्हणजे लहान मुलांनी लिहिलेले साहित्य की मोठ्या जाणकारांनी, प्रथितयश लेखकांनी मुलांच्या अंतरंगात प्रवेश करून मुलांसाठी लिहिलेले साहित्य अशा चर्चाही बऱ्याच रंगत असतात. या पार्श्वभूमीवर डॉ. सावंत यांनी आपली पूर्ण हयात बालसाहित्य लेखनात घालवली आहे. मुळात सावंत हे एक कृतिशील लेखक. स्वत: केले आणि मग सांगितले, अशी त्यांची वृत्ती आहे. त्या धारणेतून उतरलेले त्यांचे लेखन वास्तवदर्शी तसेच मुलांच्या भावविश्वात समरस होऊन केलेले आहे.

दुसरे साहित्य अकादमी पुरस्कारविजेते साहित्यिक प्रदीप कोकरे यांची कामगिरीही स्पृहणीय आहे. कुठल्याही सतावणाऱ्या विषयावर लिहिताना लेखकाला आतून खूप त्रास होत असला, तरी तो मांडताना त्याला एक जोखीम घ्यावीच लागते. अनेकदा त्याची घुसमटही होते; पण ती पार पाडण्यासाठी या दाहकतेतून पुढे जावेच लागते. जाणवणारी दाहकता मांडून पुढे न गेल्यास आधीचे सगळे प्रश्न लेखकाला सतावत राहणारच. त्यामुळे मनात साचलेले मांडून मी मोकळा होत राहिलो, अशी भावना त्यांनी पुरस्काराविषयी मांडली. 'खोल खोल दुष्काळ डोळे' ही कादंबरी आधुनिक तरुण पिढीच्या भावविश्वाचे आणि जीवनातील संघर्षांचे प्रामाणिक आणि मार्मिक चित्रण करते. मुंबईच्या चाळीतील जीवन, बदलते सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ आणि तरुण मनातील भावनिक हुंदके यांचे प्रभावी चित्रण या कादंबरीत आहे. कादंबरीतील नायकाच्या वर वर निरर्थक वाटणाऱ्या कृती हळूहळू चिंतनशील आणि अस्तित्वाच्या शोधाकडे वळतात. त्यामुळे ही कादंबरी नव्या पिढीचा सशक्त आवाज मानली जाते. कोकरे यांचे लेखन ग्रामीण आणि शहरी जीवनातील बारकावे तसेच आधुनिक तरुणांच्या भावनांचे गहन चित्रण करते. त्यांची साधी पण प्रभावी लेखनशैली वाचकांना अंतर्मुख करते. कोकरे हे वास्तवदर्शी लेखक असून समाजातील गरीबी, बेरोजगारी, दुर्बल, उपेक्षित घटकांचे जीवनदर्शन त्यांच्या साहित्यात घडते. त्यांचे लेखन हे सामाजिक प्रश्नांना थेट भिडणारे, त्यावर परखड भाष्य करणारे असते.

मुंबई विद्यापीठातून मराठी साहित्यात पदव्युत्तर पदवी मिळवल्यानंतर कोकरे यांची शब्दांची आवड आणखी वाढत गेली. 'मुंबई शहरावर लिहिलेल्या मराठी कवितांचा अभ्यास' या विषयावर ते कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठामध्ये पीएच. डी करत आहेत. 'खोल खोल दुष्काळ डोळे' या कादंबरीला 2022 -23 ची 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन लिटरेचर' देण्यात आली होती. 'माझा साहित्यिक प्रवास वृद्धिंगत राहण्यासाठी ही फेलोशीप माझ्यासाठी खूप महत्वाची आहे' असे मत प्रदीप यांनी वेळोवेळी व्यक्त केले आहे. जीवन आणि संस्कृती यांची सांगड घालत साहित्यविश्व जगणारे नव्या दमाचे अभ्यासक, लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. कोकरे यांना 'कादंबरी' या साहित्य प्रकारासाठी पहिला यशवंतराव चव्हाण सेंटरचा 'ना.धो. महानोर पुरस्कार' देण्यात आला होता.

# वर्षा सहलीचा आनंद लुटा पण...

**राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. काही ठिकाणी संततधार तर काही ठिकाणी मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे वातावरण प्रफुल्लित झाले असून परिसर हिरवाईने नटला आहे. नद्या दुथडी भरून वाहत आहेत. तलाव विहिरीही भरल्या आहेत. धबधबे कोसळत आहेत. शेतशिवाराने हिरवा शालू नेसल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगर दऱ्यातून फेसळणारे धबधबे अनेकांना आकर्षित करत आहेत.**



विशेषतः तरुणांना या निसर्ग सौंदर्याचे आकर्षण जास्त आहे. त्यातही शहरात राहणाऱ्या वर्गाला निसर्गाचे जास्त कौतुक असते कारण त्यांना निसर्गाचा जास्त सहवास लाभत नसतो. अशी मंडळी निसर्गाची नवलाई अनुभवायला पावसाळ्यात आवर्जून घराबाहेर पडतात. वर्षा सहलीचे आयोजन करतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही पर्यटकांना उत्साहाचे भान राहत नाही. विशेषतः तरुण वर्ग अतिउत्साहाच्या भरात नको ते धाडस करतात आणि त्यातून एखादी मोठी दुर्घटना घडते. अशीच एक मोठी दुर्घटना मागील वर्षी लोणावळ्यात घडली होती. या दुर्घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. लोणावळ्यात वर्षा सहलीसाठी आलेल्या अन्सारी कुटुंबातील नऊ सदस्य लोणावळा धरणाच्या पाठीमागे असणाऱ्या बुशी धरणावर वर्षा विहाराचा आनंद घेण्यासाठी गेले होते मात्र पाण्याचा प्रवाह अचानक वाढल्याने अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेले त्यात लहान मुले व महिलांचा देखील समावेश आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळत असतानाच ताम्हिणी घाटातील प्लस व्हॅलीतील नदीत एका तरुणाने रील बनवण्यासाठी उडी मारली त्यात तो तरुण वाहून गेला अर्थात अशी दुर्घटना घडल्याची ती पहिली वेळ नव्हती मागीलवर्षीच खालापूरच्या साई बंधाऱ्यात पोहण्यासाठी गेलेल्या चार विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला होता. दोन वर्षापूर्वीतर अशा अनेक दुर्घटना घडल्या होत्या. २०२३ साली चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घोडझरी सिंचन तलावात बुडून चार तरुण मरण पावले होते. त्यातला एक तरुण सेल्फी काढण्याच्या नादात तलावात घसरला त्याला वाचवण्याच्या नादात पाण्यात उतरलेल्या इतर तीन तरुणांना देखील जलसमाधी मिळाली.

पावसाळ्यात अशाप्रकारच्या दुर्घटना सातत्याने घडतात. याआधीही अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत आणि यापुढेही घडणार आहेत कारण वर्षा सहलीसाठी आलेले पर्यटक शिस्तीचे पालन न करता नको ते धाडस करतात



विशेषतः तरुण वर्ग सेल्फी काढताना, रिल बनवताना स्वतःचा जीव धोक्यात घालतात. वर्षा सहलीचा आणि पावसाळ्यातील निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत असताना काही गोष्टींची खबरदारी घेण्याची गरज आहे. सध्या कुठेही गेल्यावर सेल्फी घेणे, व्हिडीओ बनवले, रील बनवणे, फेसबूक लाईव्ह करणे हा ट्रेंड झाला आहे. या ट्रेंडच्या नावाखाली अनेकदा उंच डोंगरावरुन, घाट माथ्यावरून, धबधब्याच्या टोकावरून, चारचाकी गाडीच्या टफावरून किंवा खिडकीतून तोंड बाहेर काढून, दुचाकी वरून स्टंट करुन व्हिडीओ बनवले जातात. सेल्फी काढले जातात, रिल बनवले जातात मात्र पावसाळ्याच्या दिवसात हे प्रकार जीवावर बेतू शकतात. लाईक, शेअर आणि कमेंटच्या नादात तरुणवर्ग हे धाडस करतात मात्र हेच धाडस मोठ्या दुर्घटनेस निमंत्रण देणारे ठरते. पावसाळ्यात रस्ते अधिक घसरट झालेले असतात. खड्डयांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डा किती मोठा आहे याचा नेमका अंदाज येत नाही. काहीतरी थ्रिलिंग करण्याच्या नादात शरीराला इजा करून घेणे योग्य नाही.

नदी, तलाव, धरणे, धबधबे याठिकाणी सहलीस गेल्यावर तर अधिक दक्ष राहावे लागतात कारण तिथे एखादी छोटी चूकही जीवघेणी ठरु शकते. नदी, तलाव, धरण, समुद्र या ठिकाणी पोहण्यास गेलेले तरुण बुडून मरण पावल्याच्या घटना याआधी अनेकदा घडल्या आहेत. खरंतर याबाबतीत पर्यटकांनी स्वतःच काळजी घेतली पाहिजे पण उत्साहाच्या भरात अनेकांना त्याचे भान राहत नाही म्हणून पर्यटनस्थळांच्या व्यवस्थापनाने याबाबतीत काळजी घेतली पाहिजे. सावधानतेच्या सूचना ठळकपणे लिहिल्या पाहिजेत. पाण्याची पातळी किती असल्यास कोणत्या मर्यादेच्या पुढे जाणे धोक्याचे आहे, याबाबत संबंधितांना इशारा दिला पाहिजे.

पर्यटन

श्याम ठाणेदार
पुणे



धबधबे पाहण्यास गेलेल्या पर्यटकांना तर तशा सूचना देण्याची सक्त गरज असते. अशा ठिकाणी मुसळधार पावसात जाणे तर चुकीचेच असते. त्याचप्रमाणे गड, किल्ले, डोंगरमाथ्यावर भटकताना देखील भान ठेवणे तितकेच गरजेचे असते. अशा ठिकाणी जोराचा पाऊस आला तर कोणती खबरदारी घ्यावी तसेच अशावेळी कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये याची कोणतीही तजवीज केलेली नसते. त्यात काही महाभाग अशा ठिकाणी मद्यपान करून पर्यटनाला जातात. तरुणांनी हे कटाक्षाने टाळले पाहिजे. पर्यटकांनी स्वतःची व स्वतः बरोबर आलेल्यांचीही काळजी घेतली पाहिजे. वर्षा सहलीचा मनमुराद आनंद लुटा, मजा करा पण ही मजा जीवावर बेतणार नाही याचीही काळजी घ्या.

# इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनानिमीत्त राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीही तो कृषी दीन म्हणून संपूर्ण राज्यात उत्साहात साजरा केला गेला. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यामुळेच देशात हरितक्रांती होऊ शकली. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच योगदानाची आठवण म्हणून महाराष्ट्र सरकारने १ जुलै हा दिवस कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.


राज्यभर हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा केला गेला. शेती ही फार पुरातन काळापासून चालत आली आहे. शेती हाच आपला मुख्य व्यवसाय आहे. देशातील सत्तर टक्के लोक शेतीच करतात. राज्यात शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्याला खूप महत्वाचे स्थान होते. दिवाळीच्या सणाला प्रत्येक घरात शेतकऱ्यांसाठी प्रार्थना केली जायची. ईडा पीडा टळो आणि बळीचे राज्य येवो असा आवाज घराघरांतून ऐकू यायचा. हा आवाज आता कुठे तरी लुप्त होऊ लागला आहे. अनेक सामस्यांनी ग्रासलेल्या शेती आणि शेतकऱ्यांसाठीचा हा आवाज पुन्हा कसा घुमेल यासाठी आजच्या कृषिदिनापासूनच प्रयत्न करायला हवेत. आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे.



आस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे.

शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोप्पा आहे तेवढा सोप्पा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटाला शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो - लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी आस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो.

महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत.




## राशीभविष्य

- **मेष** : आजचा दिवस अडचणींचा राहील. ठरलेल्या भेटी लांबणीवर पडतील. व्यवहारात नुकसान संभवतं.
- **वृषभ** : व्यवहारात अपेक्षित लाभ होईल. नोकरीत सहकाऱ्यांशी जमवून घ्यावं. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील.
- **कर्क** : मोठी खरेदी तुर्तास नको. व्यवसायात अपेक्षित उलाढाल होईल. धार्मिक कार्याचं समाधान मिळेल.
- **सिंह** : जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. आर्थिक फसवणूक संभवते. प्रगतीचे नवनवे पर्याय समोर येतील.
- **कन्या** : इतरांचा सल्ला विचारपूर्वक घ्यावा. व्यवहारात मध्यस्थी टाळावी. नव्या ओळखीतून लाभ होईल.
- **तूळ** : .कामाची बरीच धावपळ राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **वृश्चिक** : व्यवसायाचा व्याप वाढेल. घरगुती उद्योगात उत्कर्षाच्या संधी लाभतील. प्रवास लाभदायक ठरेल.
- **धनु** : मनावरचा ताण हलका होईल. अपेक्षित ध्येय साध्य करू शकाल. प्रकृतीच्या तक्रारी उद्भवतील.
- **मकर** : रखडलेली कामं मार्गी लागतील. प्रियजनांच्या भेटीने समाधानी व्हाल. बाकी स्थिती उत्तम राहील.
- **कुंभ** : चैनीवर अधिक खर्च होईल. नव्या भेटीने उत्साह वाढेल. उपजत कला–गुणांचा विकास होईल.
- **मीन** : खरेदीचा उत्साह राहील. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत. कौटुंबिक मतभेद टाळायला हवे.

ब्युटी मंत्रा

## मोठ्या प्रवासाला निघताय?

मोठ्या अंतरावरील किंवा परदेश प्रवासासाठी विमानप्रवासाला प्राधान्य दिलं जातं. पण जास्त कालावधीचा विमानप्रवास शारीरिकदृष्ट्या थकवणारा असतोच याशिवाय त्वचेवरही परिणाम करत असतो. त्यामुळे अधिक कालावधीच्या विमानप्रवासातही त्वचा टवटवीत कशी ठेवावी याविषयी...

✻ मेक अप उतरवा– प्रवासाला निघताना मेक अप केला असला तरी कालांतराने उतरवावा. चेहऱ्यावर मेक अप ठेवून विमानात विश्रांती घेणं जवळपास अशक्य असतं. जास्त काळ मेक अप चेहऱ्यावर राहिल्याने त्वचेचं नुकसान व्हायची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हायड्रेटिंग क्लिंजिंग मिल्कने मेक अप उतरवावा.

✻ त्वचा रिफ्रेश करा– विमानासारख्या बंद ठिकाणी त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतोच असं नाही. त्यामुळे हायड्रेटिंग मिस्टचा स्प्रे चेहऱ्यावर करावा. यामुळे त्वचा रिफ्रेश होईल. **क्रमशः**

## २ जुलै

दिनविशेष

- **१९७६:** व्हिएतनाम युद्धानंतर उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनामचे पुन्हा एकत्रीकरण.
- **१९९६ :** प्रसिद्ध अभिनेता राजकुमार यांचं निधन.
- **२००२ :** स्टीव्ह फॉसेट हा उष्ण हवेच्या फुग्याद्वारे पृथ्वी प्रदक्षिणा करणारा पहिला माणूस ठरला.
- **२०१७ :** कृषीमूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी पाशा पटेल यांची नियुक्ती.
- **२०१८ :** पीडीपी नेत्या मेहबूबा मुफ्ती काँग्रेसच्या संपर्कात असल्याची माहिती.

हेल्थ वेल्थ

## हाड मोडलं तर...

शाळेत किंवा घरी कोणी नसताना हाड मोडलं तर घाबरून जाऊ नका. पडल्यानंतर काडकन् काही तरी मोडल्यासारखा आवाज आला, लागलेला भाग सुजला, संवेदना हरवल्यासारखं वाटत असेल तर हाड मोडलं असण्याची शक्यता असते. हाड मोडलं तर सर्वात आधी त्या भागावर कापडात गुंडाळलेला बर्फ लावता येईल. दुखापत झालेला अवयव हलवू नका किंवा हाड पुन्हा बसवण्याचा प्रयत्न करू नका. हाड स्थिर रहावं यासाठी त्या भागावर आधार ठेवा. यामुळे डॉक्टरांकडे जाईपर्यंत तुम्हाला आराम मिळेल. त्यासाठी तुम्ही लाकूड, पुठ्ठा किंवा दुमडलेल्या वर्तमानपत्राचा वापर करू शकता. तातडीने डॉक्टरांकडे जा. शस्त्रक्रियेच्या आधी काहीही खाऊ किंवा पिऊ नका. हाड मोडलेल्या व्यक्तीने झोपायला हवं. जखम धुवू नका. फ्रॅक्चर डोऊ नये क्हणून रस्त्यावरून चालताना खड्ड्यांकडे नीट लक्ष द्या. खेळताना योग्य ती आयुधं वापरा. क्रिकेट खेळताना हेल्मेट, पॅड्सचा वापर करा. बाईकवरून जाताना किंवा सायकल चालवताना हेल्मेट घाला.

पंचांग

**बुधवार, २ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ शु. ७, नक्षत्र : उ. फाल्गुनी
चंद्राशी : कन्या, योग : वरियान
सूर्योदय: ६.०७, सूर्यास्त: ७.१८

फॉरवर्डस

**वक़्त तक़ हीं देतें हैं हम तहज़ीब रिश्तों क़ो ज़नाब...**

**वरना ठुकरा देनें क़ा हुनर भी ज़मानें सें हीं सीखा हैं हमनें....!**

आरोग्यमंत्र

## शरीराच्या अंतर्गत स्वच्छतेसाठी...

आहार हाच उपचार असं एक मत मांडलं जातं. या धर्तीवर बघता सध्या डिटॉक्स डाएटचा बोलबाला बघायला मिळत आहे. डिटॉक्स डाएट म्हणजे आहाराच्या माध्यमातून शरीराची अंतर्गत स्वच्छता करणं. तुम्हीही या आहारतंत्राचा अवलंब करण्याच्या विचारात असाल तर त्याबाबतचे समज–गैरसमज जाणून घ्यायला हवे. शरीराची अंतर्गत स्वच्छता करायची तर अँटिऑक्सिडंट्सयुक्त फळं आणि भाज्या खायला हव्यात. याविषयी अधिक विस्ताराने जाणून घेऊ या.



✻ शरीराची अंतर्गत स्वच्छता ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्वचा, फुफ्फुस, किडनी, आतडं आणि यकृत हे अवयव विषारी घटक बाहेर टाकण्याचं काम करतात. या कामाची गती शरीराच्या चयापचय क्रियेवर अवलंबून असते. अँटिऑक्सिडंट्सयुक्त फळं आणि भाज्या खाऊन शरीराच्या स्वच्छतेची ही प्रक्रिया विनाव्यत्यय सुरू ठेवता येते. ✻ शरीराच्या अंतर्गत स्वच्छतेसाठी साखर, जंक फूड तसंच बार्बेक्यू केलेले पदार्थ टाळायला हवेत. अशा पदार्थांमुळे शरीराच्या विविध अवयवांच्या डिटॉक्सिफिकेशन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. ✻ वनस्पतीजन्य पर्यायी पदार्थ तसंच ग्रीन टीमुळे शरीर शुद्धिकरणाची प्रक्रिया वेगवान होऊ शकते. ✻ फळांचे रस, सुप्स यासारख्या पदार्थांमुळे शरीर शुद्धिकरण अधिक चांगल्या प्रकारचे होतं हा गैरसमज आहे. म्हणूनच केवळ त्यावर अवलंबून राहणं योग्य ठरणार नाही. यामुळे उपासमार होऊ शकते.

फॅशन पॅशन

✻ जास्त ट्रेंडी दिसायचं असेल तर तुम्ही चेक्सवाला शर्ट घालू शकता. ✻ डेनिमऐवजी शॉर्टस ट्राय करता येईल. ✻ व्हाईट शर्ट, डेनिम शॉर्टसवरही तुम्ही व्हाईट स्नीकर्स कॅरी करू शकता. ✻ शॉर्टसोबत प्रिंटेड शर्टचा फॅशनेबल ऑप्शनही तुमच्याकडे आहे. ✻ जीन्ससोबत किंवा कॅज्युअल पँट्ससोबत पोलो नेक टी शर्टसनी तुम्ही आपला लूक खुलवू शकता. ब्लॅक पँट आणि टी शर्टसोबतही व्हाईट स्नीकर्स कॅरी करता येतील. ✻ बेज रंगाची चिनो, गडद रंगाचा शर्ट किंवा ब्लेझर आणि व्हाईट स्नीकर हा लूकही क्लासी आहे.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## सिलिंडरच्या दरात कपात

**नवी दिल्ली :** तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत ६० रुपयांची कपात केली आहे. हे नवीन दर मंगळवार (१ जुलै) पासून लागू झाले आहेत. त्याचवेळी, घरगुती गॅस सिलिंडरच्या म्हणजेच १४ किलोच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत कपात केल्याने व्यावसायिक ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या किमतीत झालेली कपात ही दैनंदिन कामकाजासाठी गॅसवर अवलंबून असलेल्या सर्व व्यावसायिकांसाठी आनंदाची बातमी आहे.

## नवीन क्रीडा धोरणाला केंद्राची मंजुरी

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळाने मंगळवारी नवीन राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ ला मंजुरी दिली आहे. हे धोरण २००१ च्या जुन्या राष्ट्रीय क्रीडा धोरणाची जागा घेईल आणि भारताला जागतिक क्रीडा क्षेत्रात अग्रेसर बनवण्याच्या उद्देशाने रचनात्मक बदल घडवण्याचे काम करेल. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, हे धोरण राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शी संरेखित असून, २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या तयारीवर विशेष लक्ष केंद्रित करेल. नवीन राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ ची रचना खेळाडूंना जागतिक स्तरावर उत्कृष्टता मिळवण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी आणि क्रीडा क्षेत्राला आर्थिक व सामाजिक विकासाचे इंजिन बनवण्यासाठी करण्यात आली आहे.

# रोजगार निर्मितीला चालना देणारी योजना

## केंद्र सरकारची मोठी घोषणा : ६ महिन्याचे वेतनही मिळणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत रोजगार निर्मितीला प्रोत्साहन् देण्यासाठी तसेच रोजगारक्षमता वाढीसाठी व उत्पादन क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करण्यासाठी रोजगाराशी संबंधित प्रोत्साहनपर ईएलआय योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत प्रथमच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एका महिन्याचे वेतन (सुमारे १५,०००) मिळणार असून, त्याची नियुक्ती करणाऱ्यांना अतिरिक्त रोजगार निर्मितीसाठी दोन वर्षांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कम दिली जाणार आहे. रोजगार निर्मिती करणारे उत्पादन क्षेत्रातील असतील तर आणखी दोन वर्षांसाठी वाढीव लाभ दिला जाणार आहे.

४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य व इतर संधी मिळाव्यात यासाठी पंतप्रधानांच्या पाच योजनांच्या भाग म्हणून ही २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ही योजना जाहीर करण्यात आली होती. या अर्थसंकल्पामध्ये या योजनेसाठी सुमारे २ लाख कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आली आहे. एका वर्षासाठी सुमारे ९९,४४६ एवढा खर्च या योजनेसाठी केंद्र सरकार करणार आहे. आगामी २ वर्षांच्या कालावधीत देशात ३.५ कोटींपेक्षा अधिक नोकऱ्या निर्माण करणे हे या योजनेचे उद्दीष्ट्य आहे. या योजनेद्वारे १.९२ कोटी लाभार्थी कामगार प्रथमच या क्षेत्रात प्रवेश करतील. या योजनेचा लाभ हा १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ या कालावधीमध्ये निर्माण झालेल्या नोकऱ्यकंना लागू होणार आहे.



या योजनेचे दोन भाग आहेत. भाग अ पहिल्यांदाच काम करणाऱ्यांवर लक्ष केंद्रित करतो तर भाग ब नियोक्त्यांवर लक्ष केंद्रित करतो : भाग अ : पहिल्यांदाच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर वेतन. ईपीएफओमध्ये नोंदणी असलेल्या पहिल्यांदाच काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची दखल घेत, या भागात १५ हजार रुपयांपर्यंतचे एक महिन्याचे ईपीएफ वेतन दोन हप्त्यांमध्ये दिले जाईल. १ लाख रुपयांपर्यंत पगार असलेले कर्मचारी यासाठी पात्र असतील.

पहिला हप्ता ६ महिन्यांच्या सेवेनंतर तर दुसरा हप्ता १२ महिन्यांच्या सेवेनंतर आणि कर्मचाऱ्याने आर्थिक साक्षरता कार्यक्रम पूर्ण केल्यानंतरच देय असेल. बचतीची सवय लावण्यासाठी प्रोत्साहनपर वेतनाचा एक भाग एका निश्चित कालावधीसाठी ठेव खात्याच्या बचत साधनात ठेवला जाईल आणि नंतरच्या तारखेला कर्मचारी ही रक्कम काढू शकेल.

भाग अ चा फायदा पहिल्यांदाच काम करणाऱ्या सुमारे १.९२ कोटी कर्मचाऱ्यांना होईल.

भाग ब : नियोक्त्यांना पाठिंबा : या भागात उत्पादन क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित करून सर्व क्षेत्रांमध्ये अतिरिक्त रोजगार निर्मितीचा समावेश असेल. १ लाख रुपयांपर्यंत पगार असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी नियोक्त्यांना प्रोत्साहन रक्कम मिळेल. किमान सहा महिने सलग नोकरी करणाऱ्या प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यापोटी सरकार नियोक्त्यांना दोन वर्षांसाठी दरमहा ३ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन रक्कम देईल. उत्पादन क्षेत्रासाठी, प्रोत्साहनपर रक्कम तिसऱ्या आणि चौथ्या वर्षासाठी देखील विस्तारित केली जाईल.

# आय लव्ह यू म्हणणे म्हणजे लैंगिक छळ नव्हे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एखाद्या तरुणीला किंवा स्त्रीला फक्त 'आय लव्ह यू' म्हणणं म्हणजे लैंगिक छळ नाही, जोपर्यंत या शब्दांसोबत पुरुषाचा लैंगिक हेतू स्पष्टपणे प्रतिबिंबित करणारे वर्तन नसते. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नुकताच हा निर्णय दिला आहे. २०१५ मध्ये एका मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका ३५ वर्षीय व्यक्तीची निर्दोष मुक्तता करताना खंडपीठाने स्पष्टपणे म्हटले की, 'आय लव्ह यू' म्हणणे ही केवळ भावनांची अभिव्यक्ती आहे, लैंगिक हेतूचे प्रकटीकरण नाही.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी फाळके यांनी एका खटल्याची सुनावणी करताना 'आय लव्ह यू' सारख्या वाक्यांतून लैंगिक हेतू प्रकट होत नाही, असे निरीक्षण नोंदवले. अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा (पॉक्सो कायदा) आणि भारतीय दंड संहितेतील तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आलेल्या व्यक्तीची शिक्षा रद्द करताना खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले.

३० जून रोजी दिलेल्या निकालात खंडपीठाने म्हटले आहे की, 'आय लव्ह यू' सारखे शब्द स्वतःहून लैंगिक हेतू दर्शवित नाहीत, जसे विधिमंडळानेही मान्य केले आहे. पुरुषाचा खरा हेतू लैंगिक कृत्याशी संबंधित होता हे सिद्ध करण्यासाठी आणखी काही तरी असावे लागेल. जर बोलल्या गेलेल्या शब्दांचा अर्थ लैंगिक हेतू म्हणून घेतला जात असेल तर त्याचे प्रतिबिंब तिच्या काही कृतीतही उमटले पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायमूर्ती उर्मिला जोशी-फाळके यांच्या खंडपीठाने सोमवारी दिलेल्या आदेशात म्हटले आहे की, कोणत्याही लैंगिक कृत्यात अयोग्य स्पर्श करणे, बळजबरीने कपडे काढणे, अश्लिल हावभाव करणे किंवा एखाद्या महिलेच्या शीलाचा अपमान करण्याच्या हेतूने कोणतेही वक्तव्य करणे समाविष्ट असावे. तक्रारीनुसार, नागपुरात १७ वर्षीय पीडित`चा छळ करून तिचा हात पकडून 'आय लव्ह यू' असे म्हटले होते.

## दिल्लीहून निघालेल्या विमानाचा अपघात थोडक्यात टळला

**मुंबई :** एअर इंडियाचे लंडनला झेपावलेले एआय १७१ विमान अहमदाबादमध्येच क्रॅश झाल्यानंतर फक्त ३८ तासांतच एअर इंडियाच्या आणखी एका विमानाला धोकादायक अनुभव आला. मिळालेल्या माहितीनुसार, १४ जून रोजी पहाटे दिल्लीहून व्हिएन्नाला जाणाऱ्या एआय १८७ या विमानाने उड्डाण केल्यानंतर तांत्रिक बिघाड झाल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे विमान सुमारे ९०० फूट खाली आले. मात्र, सुदैवाने विमान अपघातातून थोडक्यात बचावले.

या प्रकरणाबाबत मिळालेल्या माहितीनुसार, दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून एअर इंडियाचे बोईंग ७७७ विमान उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांतच धोकादायक पद्धतीने खाली येऊ लागले. पायलटना कॉकपिटमध्ये 'स्टॉल वॉर्निंग' आणि 'ग्राऊंड प्रॉक्सिमिटी वॉर्निंग सिस्टम'ची 'डोन्ट सिंक' वॉर्निंग मिळू लागली, त्यानंतर त्यांना तांत्रिक बिघाडाची जाणीव झाली. या विमानानं पहाटे २.५६ वाजता उड्डाण केले. त्यावेळी दिल्लीत जोरदार वादळ आणि खराब हवामान होते. उड्डाणानंतर काही मिनिटांतच विमान सुमारे ९०० फूट खाली आले. याच दरम्यान 'स्टिक शेकर' अलार्मही सक्रिय झाला – म्हणजे कॉकपिटचे कंट्रोल कॉलम हलू लागले आणि पायलटना त्वरित धोक्याची जाणीव झाली. पायलटने तात्काळ परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि विमान योग्य उंचीवर आणून उड्डाण सुरू ठेवले. सुदैवानं या घटनेत कोणतेही नुकसान झाले नाही आणि विमानाने ९ तास ८ मिनिटांच्या उड्डाणानंतर व्हिएन्नामध्ये सुरक्षित लँडिंग केले.

## तोट्यातील मार्गांवर 'लालपरी'...

**(पान १ वरुन)** सेवांसाठी विविध आगारांमध्ये दाखल झाल्या असून, वर्षाअखेरपर्यंत आणखी ८० बस येणार आहेत. बसस्थानकांची देखभाल, चालक-वाहकांचा वेळ व वेतन, सुट्टयांच्या काळातील प्रवासी वाढ याचा विचार करून अतिरिक्त फेऱ्यांचे नियोजन करण्यात येणार आहे. या फेरनियोजनामुळे प्रवाशांना वेळेवर सेवा मिळण्याची शक्यता वाढेल, तर एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थैर्याला चालना मिळेल. मात्र, दुर्गम भागांतील काही सेवा बंद झाल्यास स्थानिक प्रवाशांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या स्वारगेट व शिवाजीनगर येथून सुरू असलेल्या बससेवांमधून पुणे विभागाला दरमहा सुमारे ५५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. हे उत्पन्न मासिक ६५ कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठीच सेवा काटछाट व फेरनियोजन सुरू आहे.

## हिमाचलमध्ये पावसाचा हाहाकार

**(पान १ वरुन)** सध्या मान्सून आपत्तीचे केंद्र बनला आहे. पावसाने मंडी जिल्ह्यातील हाहाकार माजवला आहे. यामुळे लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावं लागत आहे. मुसळधार पावसामुळे झालेल्या भूस्खलनामुळे अनेक रस्ते बंद झाले आहेत. यासोबतच अनेक घरांचेही नुकसान झाले आहे. हवामान खात्याने मंगळवारी हिमाचल प्रदेशातील काही भागांसाठी पुन्हा रेड अलर्ट जारी केला आहे. प्रशासन लोकांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आणि नद्या आणि नाल्यांपासून दूर राहण्याचे आवाहन केलं आहे.

पान १ वरून

## नद्यांच्या पूररेषा तपासण्यासाठी समिती

आणि लाल पूररेषांची आखणी करण्यासाठी किती पूर गृहीत धरण्यात यावा याची आकडेवारी जानेवारी २०२५ मध्ये सादर केली. ही आकडेवारी अत्यंत धक्कादायक होती असा दावा पर्यावरण तज्ञ कडून करण्यात आला होता.त्यानुसार याचिका दाखल करण्यात आली.याचिका कर्त्याकडून याबाबत नव्याने पूर रेषा तपासण्याचा दावा करण्यात आला होता.

तर पुणे महानगरपालिकेचे नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी म्हटले आहे की,पर्यावरण वादी संघटनांकडून करण्यात आलेला दावा हा उच्च न्यायालयाने फेटाळला आहे.तरी सुध्दा न्यायालयाकडून करण्यात आलेल्या सूचनांचे पालन आम्ही करणार आहोत.तर याचिका कर्ते विजय कुंभार म्हणाले,जलसंपदा विभागाने पूररेषा शास्त्रीय पध्दतीने तयार केल्याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केल्यानंतर पुणे महानगरपालिकेकडून चुकीचा दावा केला जात आहे.न्यायालयाने यचिका निकाली काढून पूररेषा तपासण्यासाठी समिती स्थापन केली आहे.मुठा नदीची जुनी निळी पूररेषा ६०,०० क्युसेक्सला आहे ती १,०७,७३९ क्युसेक्सला असावी आणि लाल पूररेषा १०,००,०० क्युसेक्सला आहे ती २,५४,७५५ क्युसेक्सला असावी.अशी आम्ही मागणी केली होती.

तसेच मुळा-मुठा नदीची निळी पूररेषा १,१८,००० क्युसेक्सला आहे ती २,३५,००० क्युसेक्सला असावी आणि लाल पूररेषा १,६८,००० क्युसेक्सला आहे ती ४,५४,४३३ क्युसेक्सला असावी.असे मेरीच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.यावर न्यायालयाने लक्ष वेधले आहे. उच्चस्तरीय समितीने त्यांचा अहवाल २ महिन्यांच्या मुदतीत सादर करावा. राज्यशासनाने हा अहवाल मिळाल्यानंतर २ महिन्यात त्यातील शिफारसींवर योग्य ती कृती करावी. आणि याचिकाकर्ते राज्य शासनाला या संदर्भात सूचना देऊ शकतात.असे आदेशात म्हटले आहे.

## श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे यांचा...

मुरलीधर मोहोळ, सिटी ग्रुपचे संचालक अनिरुद्ध देशपांडे, थोरले बाजीराव पेशवे यांचे वंशज पुष्करसिंह पेशवा, एनडीएचे कमांडंट ॲडमिरल गुरचरण सिंह यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

अजेय योद्धा श्रीमंत बाजीराव पेशवे यांच्या स्मृती कायम स्मरणात रहाव्यात या भावनेने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले असून कुंदनकुमार साठे सचिव आहेत. थोरले बाजीराव पेशवे यांचा भव्य अश्वारूढ पुतळा राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथे उभारण्यासाठी माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांच्या मदतीने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सहकार्य केल्याने पुतळा उभा करण्याची परवानगी मिळाली. सिटी ग्रुपचे संचालक अनिरुद्ध देशपांडे यांचेही पुतळा उभारण्यात सहकार्य लाभले आहे.

थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानच्यावतीने साडेतेरा फुट उंचीचा भव्य असा पुतळा उभारण्यात आला आहे. चार हजार किलो ब्राँझचा वापर करून विपुल खटावकर यांनी या पुतळ्याची निर्मिती केली आहे.

श्रीमंत बाजीराव पेशवे यांना दीर्घ आयुष्य लाभले नाही. ४० वर्षांच्या आयुष्यात श्रीमंत बाजीराव पेशवे यांनी लढलेल्या प्रत्येक युद्धात विजय मिळविला होता. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी येथे उभारण्यात आलेल्या थोरले बाजीराव पेशवे यांच्या भव्य पुतळ्यामुळे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीतील प्रशिक्षणार्थींना अजेय योद्धा पेशवे यांचा भव्य पुतळा कायम प्रेरणादायी ठरेल, अशी भावना थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानचे अध्यक्ष एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, सचिव कुंदनकुमार साठे यांनी व्यक्त केली.

## शक्तिपीठ विरोधात शेतकरी...

येथे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांशी तहसीलदार मृणाल जाधव यांनीही चर्चा केली. पण शेतकरी आंदोलनावर ठाम आहेत. जिल्हाधिकारी आंदोलनस्थळी येत नाही तोपर्यंत आंदोलन सुरु राहील, अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली.

शक्तिपीठ महामार्गबाधित शेती बचाव कृती समिती, सांगली यांच्या वतीने सांगली–कोल्हापूर मार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात अपक्ष खासदार विशाल पाटील सहभागी झाले. त्यांनी यावेळी सरकारच्या भूमी अधिग्रहणाच्या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला. हे आंदोलन फक्त रास्त मागण्यांसाठी नाही, तर शेतीच्या अस्तित्वासाठीचा लढा आहे. महामार्गाचे नियोजन करताना शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने घेतल्या जात आहेत. त्यांचे उपजीविकेचे साधन हिरावले जात आहे. ज्यांच्या कष्टावर देश उभा राहतो, त्यांचं भविष्य मात्र सरकारच्या बेजबाबदार धोरणामुळे अंधारात जात आहे. विकासाच्या नावाखाली जर शेतकरीच उघड्यावर पडत असेल, तर असा विकास स्वीकारणं अशक्य आहे. शासनाने विकासाची दिशा ठरवताना शेतकऱ्यांचा आवाज ऐकणं गरजेचं आहे. जमीन जात असेल, तर न्याय्य भरपाई हवी. पुनर्वसनाची स्पष्ट हमी हवी आणि शक्य असल्यास, जमीन पर्यायदेखील द्यावा. अन्यथा, ही असंतोषाची ठिणगी पेटून मोठं आंदोलन होईल, याची सरकारने नोंद घ्यावी, असा इशारा विशाल पाटील यांनी दिला आहे.

## राज्यात वाहनांवरील नवीन...

महसूल मिळणार आहे.

समजा एखाद्याने महाराष्ट्रात १० लाख रुपयांची सीएनजी कार घेतली तर त्याला आधी ७० हजार रुपये करापोटी द्यावे लागत होते. ते आता ८०००० रुपये द्यावे लागणार आहेत. तसेच जर २० लाखांची सीएनजी कार घेतली तर १.४ लाख रुपयांऐवजी १.६ लाख रुपये कर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात सीएनजी वाहनांना मोठी मागणी आहे. तसेच पेट्रोल, डिझेल कारसाठी किंमतीनुसार कर भरावा लागणार आहे. १० लाख रुपयांपेक्षा कमी किमतीच्या पेट्रोल कारवर ११% कर आकारला जाईल.

१० ते २० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कारवर १२% कर आणि २० लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या कारवर १३% कर भरावा लागेल. तर, डिझेल कारवर अनुक्रमे १३%, १४% आणि १५% कर आकारला जाईल. तसेच मालवाहू वाहनांसाठी यापूर्वी त्यांच्या वजनावर कर आकारला जात होता, ते आता बदलून किंमतीच्या ७ टक्के एवढा आकारला जाणार आहे.

## वारीदरम्यान मृत्यू झाल्यास...

वारीदरम्यान जर एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणामुळे मृत्यू झाला, तर त्यांच्या कुटुंबीयांना ही रक्कम मिळणार आहे. मात्र आत्महत्येच्या घटनांमध्ये ही मदत लागू होणार नाही. याशिवाय, वारीदरम्यान अपघातामुळे अपंगत्व आल्यास देखील आर्थिक मदतीची तरतूद आहे.

## अहमदाबाद विमान अपघाताबद्दल मोठा दावा

सॉफ्टवेअरमधील बिघाडामुळेच हा अपघात झाला असावा, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. मेरी शियावो यांनी एक मुलाखत दिली, या मुलाखतीमध्येच त्यांनी यावर भाष्य केले. सुरूवातीच्या तपासात पायलटने इमर्जन्सी पॉवर सिस्टम ॲक्टिव्हेट केल्याचे संकेत मिळाले आहेत. हैराण करणारे म्हणजे टेकऑफच्या काही सेकंदातच मेडे कॉलही पायलटने दिला होता.

शियावो यांच्या म्हणण्यानुसार, सॉफ्टवेअरमध्ये बिघाड झाल्यामुळे विमानात इंजिन थ्रस्ट रोलबॅक झाला असण्याची शक्यता आहे. यापूर्वीही बोईंग ७८७ मध्ये अशा प्रकारची समस्या आढळून आली होती आणि तिची चौकशीही करण्यात आली होती. अथॉरिटी डिजिटल इंजिन कंट्रोलद्वारे इंजिनच्या कार्यक्षमतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी डिझाइन केलेले आहे. हवेत असताना अशा चुकीच्या पद्धतीने थ्रस्ट कमी झाल्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो आणि एआय १७१ च्या बाबतीतही तेच घडले असावे, असा संशय आहे.

## कर्नाटकातील नेतृत्व बदलाच्या चर्चांना पूर्णविराम

नवे मुख्यमंत्री मिळणार का? सरकारमध्ये फूट पडलीये का? किंवा सरकारमध्ये काही फेरबदल होणार आहेत का? असे सवाल उपस्थित करण्यात आले येत आहेत. पण या सर्व प्रश्नांवर आता काँग्रेसने खुलासा करत या चर्चा फेटाळून लावल्या आहेत. तसेच सिद्धरामय्या हेच मुख्यमंत्री म्हणून कायम राहतील, असे त्यांनी म्हटले आहे. रणदीप सुरजेवाला यांनी या चर्चांवर पत्रकार परिषद घेत अशा प्रकारचं काही घडणार नसल्याचं सांगत चर्चा फेटाळून लावल्या आहेत. तसेच आपला कर्नाटक दौरा हा फक्त संघटनात्मक आढाव्याचा एक भाग असून संभाव्य नेतृत्व बदल किंवा मंत्रिमंडळ फेरबदलाची अशी कोणतीही प्रक्रिया सुरू नसल्याचं स्पष्टीकरण त्यांनी दिलं आहे.

## विधानभवनात राडा

अध्यक्षांनी माझं रोज निलंबन केलं तरी मी शेतकऱ्यांचा मुद्दा सोडणार नाही, अशी भूमिका पटोले यांनी मांडली. "नाना पटोले हे स्वत: विधानसभेचे अध्यक्ष राहिलेले आहेत. त्यांना विधानसभेचं कामकाज माहिती आहे. सभागृहाची प्रतिष्ठा राखली पाहिजे हे त्यांनाही माहिती आहे. पण ते आज का इतके आक्रमक झाले ते कळलं नाही. ते थेट अध्यक्षांच्या दिशेला गेले आणि त्यांनी राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याकडून अशा कृतीची अपेक्षा नव्हती. त्यांनी दिल्लीत देखील काही दिवसांपासून चर्चा दिसत नव्हती. नावाची चर्चा झाली पाहिजे, पुन्हा चर्चेत आणि प्रकाशझोतात यायला पाहिजे म्हणून त्यांचे हे प्रयत्न आहेत का? म्हणून पुन्हा मोदींचच नाव घेतलं पाहिजे. कारण बाप बापच असतो.

## रविंद्र चव्हाण भाजपाचे...

प्रदेशाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली आहे. आगामी महापालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर रविंद्र चव्हाण यांची निवड महत्वाची मानली जात आहे. रविंद्र चव्हाण हे डोंबिवली विधानसभा मतदारसंघातून चारवेळा निवडून आलेले आहेत. तसेच रविंद्र चव्हाण हे प्रभावी नेते असून त्यांचा तळागाळातील भाजपा कार्यकर्त्यांबरोबर दांडगा जनसंपर्क असल्याचं बोललं जातं.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही स्नेहा सुनील थोपटे राहणार शिवाजी नगर पुणे ४११००५ यांनी त्यांची खालील परिशिष्टातील मिळकत आमचे अशिल श्री. अमीर नुरूददीन शेख रा. हडपसर पुणे यांना खरेदीखताने देण्याविषयी बोलणी केलेली असुन तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी तो खालील पत्त्यावर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत संबंधीत कागदपत्र व पुराव्यासह आमचेकडे लेखी हरकत कळवुन पोहच घ्यावी अन्यथा सदरचे मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे आणि ज्या कोणाचा काही हक्क, अधिकार हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक सोडून दिला आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखत ठरलेल्या मुदतीत करून घेतील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट :-** गाव मौजे औताडे हांडेवाडी येथिल सर्व्हे नं १ हिस्सा नं ३ / १ या मिळकतीचा एकुण क्षेत्र ५००० चौ.मी वरील बांधलेल्या "गोल्डन नेस्ट" बींग ए या नामक इमारती मधील नवव्या फ्लैट नं ९०४ यांसी कारपेट क्षेत्र ५४२.९४ चौ.फुट म्हणजेच ५०.४४ चौ.मी + बाल्कनी यांसी क्षेत्र ५२.९६ चौ फुट म्हणजेच ४.९२ चौ.मी + टेरेस यांसी क्षेत्र १२०.६६ चौ. फुट म्हणजेच ११.२१ चौ. मी + ड्राय बाल्कनी यांसी क्षेत्र २६.४४ चौ. फुट म्हणजेच २.४३ चौ. मी अशा मिळकतीचे एकूण क्षेत्रफळ ७४२.७२ चौ. फुट म्हणजेच ६९ चौ. मी अशी फ्लॅट मिळकत

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे

पुणे

दिनाक :- ०१/०७/२०२५

**MADHURI VASANTRAO PAWAR**
Sr. No. 40/2, 1.1.
Niwas, Keshavnagar,
Mundhwa, Pune-411036
Mob.: 9764292996

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलाबरोबर ठरलेला असून त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही, असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाईहुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी. **ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ३०/०६/२०२५.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन** – जिल्हा पुणे, पोटतुकडी व तालुका जुन्नर पैकी, जिल्हा परिषद हद्दीतील, मौजे आळे येथील खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत – गट नंबर २९६५ चे क्षेत्र १ हे. ६९ आर + पो.ख. ० हे. ०२ आर असे एकुण क्षेत्र १ हे. ७१ आर याचा आकार २ रु.३७ पैसे. यापैकी दोन विहिरींची ३ आर जागा सोडून दक्षिण बाजूच्या १/३ हिश्यातील पूर्व बाजूने १० आर ऐवढे क्षेत्र सोडून पश्चिम बाजूने उरलेल्या ० हे. ४६ आर क्षेत्रापैकी विद्यमान मालकाच्या मालकीचे दक्षिण बाजूकडील क्षेत्र ० हे. २३ आर व सदर गटामध्ये असलेल्या दोन विहिरीत विहिर–भांडे व पाणी यात १/३ हिश्यातील १/३ हिस्सा यापैकी पूर्व बाजूकडील क्षेत्र ० हे. १२ आर व सदर गटामध्ये असलेल्या दोन विहिरीत विहिर–भांडे व पाणी यात हिश्याप्रमाणे पाणी घेण्याच्या मालकीहक्कासह संपूर्ण शेतजमिन मिळकत त्यामधील सर्व तदंगभूत वस्तूसह काही एक राखून न ठेविता दरोबस्त संपुर्ण मिळकत. **यांसी चतु:सीमा** – पूर्वेस– गट नं. २९६५ पैकी, दक्षिणेस– गट नं. २९५५, पश्चिमेस– गट नं. २९६५ पैकी लिहून देणार यांचे मालकीचे उर्वरित ० हे. ११ आर क्षेत्र, उत्तरेस– गट नं. २९६५ पैकी समाईकातील दक्षिण–उत्तर १०.०० फुट रुंदीचा व पुर्व–पश्चिम लांबी रस्ता व महेश प्रभाकर ढोके यांची ० हे. २३आर जमिन

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक – गणेश प्रभाकर ढोके, रा. मु.पो. आळे, ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४११.**

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९

### औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था
### एटीएसएस कॉलेज ऑफ बिझनेस स्टडीज अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन

सी २, एमआयडीसी, मुंबई-पुणे रोड, चिंचवड स्टेशन, चिंचवड, पुणे ४११०१९.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६** करिता खालील अभ्यासक्रमाच्या भाषिक अल्पसंख्यांक कोट्यातील जागा भरण्याकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | शाखा/अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | अल्पसंख्यांक कोट्यातील जागा ५२% | बिगर अल्पसंख्यांक कोट्यातील जागा |
|---|---|---|---|---|
| १ | बी.कॉम.(बी.एम.) | ८० | ४१ | ३९ |
| २ | बी. कॉम.(सी.ए.) | ८० | ४१ | ३९ |
| ३ | बी. एस्सी.(सी.एस.) | १६० | ८३ | ७७ |
| ४ | एम.एस्सी.(सी.एस.) | ६० | ३१ | २९ |
| ५ | बी.एस्सी.(ए.आय.अँण्ड एम.एल.) | १२० | ६२ | ५८ |
| ६ | बी.एस्सी.(डेटा सायन्स) | ८० | ४१ | ३९ |

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेचे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक : १. अर्ज करण्याचा अंतिम दि. ०५/०७/२०२५ २. गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्याचा दि. १४/०७/२०२५ ३. प्रवेशाचा अंतिम दि. २१/०७/२०२५

: प्रवेश अर्ज :

एटीएसएस कॉलेज ऑफ बिझनेस स्टडीज अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन
सी–२, एम.आय.डी.सी, पुर्व पोस्ट ऑफिस समोर, चिंचवड–पुणे–४११०१९.

अल्पसंख्याक कोट्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाचा अंतिम दि. २१/०७/२०२५ पर्यंत प्रवेश घ्यावा अन्यथा त्या जागेवर बिगर अल्पसंख्याक कोट्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल, याची नोंद घ्यावी.

संस्थेचे ईमेल : admin@atsscollege.edu.in | संकेतस्थळ : atsscollege.edu.in
फोन : ०२०–२७४७२०७९ मो.: ९८५०८८६८००

प्राचार्य, औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था
एटीएसएस कॉलेज ऑफ बिझनेस स्टडीज अँड कॉम्पुटर ॲप्लिकेशन, चिंचवड, पुणे ४११०१९

### PUBLIC NOTICE

Know all men by this notice that the property described in the schedule written hereunder is owned and possessed by **MR. ARUN BALAJI KULKARNI.** That the owner is in negotiation with my client in respect of said Property. The owner has represented and assured to my client that the Owner is in possession of the said Property and have full and absolute right to sell & convey the said Property to my client and has further represented and assured my client that, said Property is free from all encumbrances and their title to the said Property is Legal, Clear and Marketable. This notice is issued for verification of the owners' title to the said Property.

Any person/s or corporate body having any interest, claim, lien, mortgage, attachment, charge, maintenance right, easementary right, or any other right, title, etc. of whatsoever nature, in the said Property or any part thereof are hereby required to inform the undersigned, in writing with full details of their claim, right, title or interest in the said along with documentary evidence in support within **15 days** from publication of this public notice. In the event no such objection/communication is received, it shall be presumed that no person has/have any objection for the proposed transfer to be executed in favour of my Client, my Client shall proceed as if, there are no claims. Any right there after claimed shall be deemed to be knowingly waived.

**SCHEDULE OF PROPERTY**

All that piece and parcel of **Flat No. 5** admeasuring 500 Sq. Ft. i.e., 46.46 Sq. Mtrs. situated on stilt ground floor in the building/society known as **"LATE SHAMATAI BHARASKAR CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD."** which is constructed on land bearing City Survey No. 15, Hissa No. 1+2+3, having its corresponding Plot No. F/1 admeasuring area about 1519.88 sq. mtrs i.e., 16360 sq. ft situated at village Erandwane, Taluka Haveli, District Pune, within the jurisdiction of Sub Registrar Haveli, Pune and within the local limits Pune Municipal Corporation, Pune,
Together with all the rights, title and/or interest attached thereto.

Pune
Date :30/06/2025

**Advocate Abhijit Bharat Borole**
Office No 3, Yojana Complex, Ramanbaug Chowk, 502 Narayan Peth, Pune 41 030. **M.: 8007799699 E-Mail: Adv.borole@gmail.com**

### ग्रामपंचायत कापुरव्होळ
**ता. भोर जि. पुणे बी निविदा सूचना**
**खुली निविदा सूचना सन २०२४-२५**

ग्रामपंचायत कापुरव्होळ, ता. भोर जि.पुणे खालील कामांचे सीलबंद निविदा जिल्हा परिषद पुणे ग्रामपंचायत कापुरव्होळ १५ वित्त आयोग व ग्रामनिधी खालील बंदिस्त गटार काम करण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून पाकीट पद्धतीने मागवीत आहे.
कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत कापुरव्होळ ता. भोर जि. पुणे यांच्याकडून दिनांक २-७-२०२५ ते ७-७-२०२५ पर्यंत सार्वजनिक कामाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत देण्यात येतील. भरून पाठवलेल्या मोहोर निविदा दिनांक २/७/२०२५ ते ७-७-२०२५ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कापुरव्होळ, ता. भोर, जि. पुणे येथे स्वीकारण्यात येतील. निविदा दिनांक ८-७-२०२५ रोजी सकाळी ११ वाजता उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | कोरी निविदा रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १) | अक्षय सिताराम गाडे ते दत्तात्रय रघुनाथ गाडे | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |
| २) | दत्तात्रय रघुनाथ गाडे ते रामदास सोनाबा गाडे | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |
| ३) | रामदास सोनाबा गाडे ते ओढापर्यंत | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |
| ४) | गणेश गाडे ते शाळापर्यंत | ३ लक्ष | रु.०१% | १०० | ३ महिने |

**टीप :** १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा नमुन्यांची फी (टेंडर फॉर्म फी) ग्रामपंचायत कापुरव्होळ ता. भोर जि. पुणे येथे भरून निविदा उपलब्ध होतील.३) इसारा रक्कम कोणत्याही बँकेच्या धनादेशाद्वारे (एफ.डी.आर ) ग्रामपंचायत कापुरव्होळ ता. भोर जि. पुणे नावाने काढून तो रेखांकित करून सदर डी. डी/ लिफाफा नं. १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्रं 2 उघडला जाणार नाही.

शिक्का

सही
**(सरपंच)**
ग्रामपंचायत कापुरव्होळ
**ता. भोर जि. पुणे**

### जाहीर जाणीव

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिनेश वसंतराव व्यवहारे, रा. सी ३० रुणवाल पॅराडाईज उजवी भुसारी कॉलनी कोथरुड पुणे ३० हे असुन त्यांनी सदरील मिळकत में. मुथा असोसिएटस यांजकडून खरेदी केलेली आहे. त्याप्रमाणे करारनामा दस्त नोंदणीकृत केलेला आहे. सदरील करारनामा मा. दुय्यम निबंधक हवेली क्र. २ यांचेसमोर दि. २७/०१/१९८८ रोजी दस्त नं. १९३/१९८८ प्रमाणे नांदविलेला आहे. सदरील दस्ताची मुळ पत्र गहाळ झालेली असल्याबाबत नुकतेच मला समजलेले असुन त्याप्रमाणे मी पुणे शहर पोलिस, कोथरुड पोलिस ठाणे यांच्या संप्रेषण नेटवर्क द्वारे (इंटरनेट) च्या माध्यमातुन पुणे पोलिस या संकेतस्थळावरुन सदरील फिर्याद नोंदविलेली आहे. सदरील फिर्याद दि. ३१/०५/२०२५ रोजी ९६४७५/२०२५ प्रमाणे नोंदविलेली आहे. सदरील करारनामा दस्ताचा कोणीही गैरउपयोग करून फसवणुक होऊ नये म्हणुन मी या लोकांना जाणीव होण्याच्या उद्देशाने जाहिर जाणीव करून देत आहे.

मिळकतीचे वर्णन : तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली, में दुयाम निबंधक हवेली यांच्या कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे कोथरुड मधील स. नं. १३० भाग मधील आनंदनगर येथील बिल्डींग न. २१ फ्लॅट नं. १२ पहिला मजला यांसी क्षेत्र ६९० चौ. फुट येणेप्रमाणे मिळकत येणेप्रमाणे नोटीस असे.

पुणे
दि. १५/०६/२०२३

श्री. दिनेश वसंतराव व्यवहारे
सी ३० रुणवाल पॅराडाईज
उजवी भुसारी कॉलनी कोथरुड
पुणे ४११०३०
मो. नं. ९८२२०७०३१५

# पीएम मोदी यांचा पाच देशांचा ऐतिहासिक दौरा

## २ जुलै ते ९ जुलै दरम्यान सर्वात मोठ्या राजनैतिक दौऱ्याचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आठ दिवसांच्या राजनैतिक दौऱ्यावर रवाना होत आहेत. या दरम्यान ते पाच देशांचा दौरा करणार आहेत. पंतप्रधान मोदींचा हा दौरा २ जुलै ते ९ जुलै दरम्यान चालणार आहे. गेल्या दहा वर्षांतील पंतप्रधान मोदींचा हा सर्वात मोठा राजनैतिक दौरा ठरणार आहे. याची सुरुवात घानापासून होणार असून दक्षिण अमेरिका, कॅरेबियन आणि आफ्रिकन देशांवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. घानापाठोपाठ पंतप्रधान मोदी कॅरेबियन देश त्रिनिदाद आणि टोबॅगो आणि तेथून अर्जेंटिनाला जातील, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. अर्जेंटिनापाठोपाठ मोदी १७ व्या ब्रिक्स शिखर परिषदेसाठी ब्राझीलला जाणार आहेत. या दौऱ्याचा शेवटचा टप्पा नामिबिया असेल.



घानाचे पंतप्रधान झाल्यानंतर गेल्या दहा वर्षांत पहिल्यांदाच नरेंद्र मोदी घानाच्या दौऱ्यावर येत आहेत. विशेष म्हणजे गेल्या ३० वर्षांत कोणत्याही भारतीय पंतप्रधानांचा घानाचा हा पहिलाच दौरा असेल. येथे पंतप्रधान मोदी व्हॅक्सिन हबमध्ये जातील. त्यानंतर ते घानाच्या संसदेला संबोधित करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी विशेष निमंत्रणावर त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या दौऱ्यावर आहेत. गेल्या २५ वर्षांत पहिल्यांदाच भारतीय पंतप्रधान येथे येणार आहेत. संसदेच्या संयुक्त अधिवेशनालाही ते संबोधित करतील, अशी अपेक्षा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या राजनैतिक दौऱ्यातील तिसरा देश म्हणून अर्जेंटिनाला भेट देणार आहेत. अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष जेवियर मिलेई यांच्या निमंत्रणावरूनही ते येथे जात आहेत. यावेळी दोन्ही नेते द्विपक्षीय चर्चेत सहभागी होतील. संरक्षण, कृषी, खाणकाम, तेल व वायू, व्यापार आणि गुंतवणुकीवर चर्चा होणार आहे. ब्राझील, अर्जेंटिनापाठोपाठ पंतप्रधान मोदी ब्रिक्स २०२५ शिखर परिषदेसाठी ब्राझीलला जाणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा चौथा ब्राझील दौरा आहे. यावेळी पंतप्रधान मोदी दहशतवादाबाबत चिंता व्यक्त करणार आहेत. पाकिस्तान पुरस्कृत पहलगाम हल्ल्यावरही ते बोलणार आहेत. या दौऱ्याचा शेवटचा टप्पा नामिबियाचा असेल आणि गेल्या २७ वर्षांतील कोणत्याही भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच दौरा असेल. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी राष्ट्रपतींची भेट घेतील आणि नामिबियाच्या संसदेला संबोधित करतील. नामिबियात भारताची यूपीआय राबविण्याचा करार हा या भेटीचा मुख्य केंद्रबिंदू असेल. हा निर्णय भारताच्या डिजिटल पेमेंट उपक्रमाचा एक भाग आहे. भूतान, मॉरिशस, नेपाळ, सिंगापूर, श्रीलंका, फ्रान्स आणि संयुक्त अरब अमिरातीमध्ये यूपीआय सक्रिय आहे.

## शिवकाशी येथे फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट, पाच ठार




**विरुधुनगर (तामिळनाडू) :** जिल्ह्यातील शिवकाशी येथील फटाके निर्मिती कारखान्यात मंगळवारी अचानक झालेल्या स्फोटात दोन महिलांसह पाच कामगारांचा मृत्यू झाला. या भीषण आगीत युनिट जळून खाक झाले असून अनेक जण जखमी झाले आहेत. फटाके फुटताच कारखान्यातून निघणारा धूर दूरवरून दिसत होता. घटनास्थळी पोहोचलेले पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले.

## भारतीय नौदलाच्या जहाजाला आग



**नवी दिल्ली :** उत्तर अरबी समुद्रात पलाऊ झेंडा असलेल्या टँकरला लागलेली आग भारतीय नौदलाने आटोक्यात आणली असून नौकेतील १४ भारतीय क्रू मेंबर्सची सुरक्षा सुनिश्चित केली आहे. रविवारी या जहाजातून आपत्कालीन कॉल आल्यानंतर नौदलाने तत्परता दाखवत आग विझवण्याचे काम सुरू केले. संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील फुजैराच्या पूर्वेला सुमारे ८० सागरी मैलांवर कार्यरत असताना जहाजाच्या इंजिन रूमला मोठी आग लागली.

## प्रतिकूल हवामानामुळे चंद्राबाबू यांचा प्रवास अर्धवट



**अमरावती :** आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू मंगळवारी उंडवल्ली येथील आपल्या घरातून हेलिकॉप्टरने पूर्व गोदावरी जिल्ह्यातील मलकापल्ली गावाकडे निघाले होते, परंतु प्रतिकूल हवामानामुळे त्यांनी सुरुवातीचा प्रवास थांबवून विशेष विमानाने प्रवास केला. खराब हवामानामुळे मुख्यमंत्र्यांचे हेलिकॉप्टर गन्नावरम विमानतळावर उतरले आणि त्यांनी राजमुंद्रीला विशेष विमानाने जाण्याचा बेत बदलला. ते कोववुरूला जात होता. गन्नावरम ओलांडल्यानंतर पुढील भागातील हवामान अनुकूल नसल्याने हेलिकॉप्टरचा प्रवास रद्द करावा लागला. त्यानंतर ते विशेष विमानाने रवाना झाले आणि राजमुंद्री येथे पोहोचले आहेत, असे सूत्रांनी सांगितले.

## वायनाडसाठी केरळची साडेचार कोटींची देणगी



**तिरुवनंतपुरम :** केरळमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) युनिट्सने वायनाडमधील भूस्खलनग्रस्त मुंडक्कई आणि चूरलमाला या पाड्यांमधील पुनर्बांधणीच्या प्रयत्नांना राज्य सरकारच्या पुनर्बांधणीसाठी साडेचार कोटी रुपयांहून अधिक योगदान दिले आहे. पुनर्वसनाचा एक भाग म्हणून सरकारकडून तेथे उभारण्यात येत असलेल्या प्रस्तावित टाऊनशिपमध्ये घरे बांधण्यासाठी ही रक्कम राखून ठेवण्यात आली आहे, असे सीएमओने मंगळवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. राज्यातील सर्व एनएसएस युनिटतर्फे आयोजित वेस्ट पेपर चॅलेंज, बिर्याणी चॅलेंज, आर्ट एक्झिबिशन, फूड फेस्टिव्हल आणि ओणम फेस्ट अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून हा निधी गोळा करण्यात आला.


## तेलंगण भाजपच्या अध्यक्षपदी रामचंद्र राव



**हैदराबाद :** केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांच्या जागी अभाविपचे ज्येष्ठ नेते आणि ज्येष्ठ वकील एन. रामचंद्र राव यांची तेलंगणातील भाजपचे नवे अध्यक्ष म्हणून मंगळवारी घोषणा करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या केंद्रीय मंत्री शोभा करंदलाजे यांनी राव यांच्याकडे नियुक्तीपत्र सुपूर्द केले. तेलंगण भाजप अध्यक्षपदी रामचंद्रराव यांची एकमताने निवड झाल्याचे मी जाहीर करतो, असे करंदलाजे यांनी येथे आयोजित कार्यक्रमात सांगितले.

# भारतासोबतचा सीमावाद गुंतागुंतीचा

भारत आणि चीनमधील सीमावाद अत्यंत जुना आहे. अनेकदा दोन्ही देशांमध्ये सीमेवर तणावाची परिस्थितीही निर्माण झाली आहे. आता या प्रश्नी चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने मोठे विधान केले आहे. त्यांनी म्हटलं आहे की, भारतासोबतचा सीमावाद गुंतागुंतीचा असून तो सोडवण्यासाठी वेळ लागेल.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी २६ जून रोजी किंगदाओ येथे त्यांचे चिनी समकक्ष डोंग जून यांच्यासोबत झालेल्या बैठकीत प्रस्ताव दिला होता की, भारत आणि चीनने एका संरचित आराखड्यानुसार हे गुंतागुंतीचे मुद्दे सोडवावेत. संरक्षणमंत्री राजनाथसिंह आणि चीनचे संरक्षण मंत्री डोंग जून यांनी चीनच्या किंगदाओ या बंदर शहरात शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) परिषदेच्या निमित्ताने द्विपक्षीय चर्चा केली.

यावेळी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शांतता आणि सौहार्द राखण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांच्या वक्तव्यावर चीनची प्रतिक्रिया विचारली असता, परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग म्हणाल्या की, "चीन आणि भारताने सीमा प्रश्नावर विशेष प्रतिनिधी यंत्रणा स्थापन केली आहे आणि चीन-भारत सीमा प्रश्नाच्या निराकरणासाठी राजकीय मापदंड व मार्गदर्शक तत्त्वांवर सहमती दर्शवली आहे."




चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग म्हणाल्या की, चीन भारतासोबत सीमांकन चर्चा आणि सीमा व्यवस्थापनासह विविध मुद्द्यांवर संवाद कायम ठेवण्यास, सीमावर्ती भागांमध्ये शांततापूर्ण वातावरण राखण्यास आणि सीमापार देवाणघेवाण व सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी तयार आहे. याशिवाय, विशेष प्रतिनिधी स्तरावरील चर्चेच्या २३ फेऱ्या होऊनही सीमाप्रश्न सोडवण्यास होणाऱ्या विलंबाबद्दल विचारले असता, माओ म्हणाल्या, "सीमेचा प्रश्न गुंतागुंतीचा आहे आणि तो सोडवण्यासाठी वेळ लागतो."

### भारत-चीन विश्वासाचे नवे पर्व

● गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि चिनी परराष्ट्र मंत्री वांग यी यांच्यात चर्चेची २३ वी फेरी पार पडली होती. २०२० मध्ये भारत-चीन सीमा भागातील पश्चिम क्षेत्रात झालेल्या संघर्षानंतर विशेष प्रतिनिधी स्तरावरील ही पहिलीच बैठक होती.

# एका महिन्यात १८ जणांना हृदयविकाराचा झटका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बेंगळुरू :** कर्नाटकातील हासन जिल्ह्यात हृदयविकाराच्या वाढत्या घटनांमुळे चिंता वाढली आहे. राज्याचे आरोग्यमंत्री दिनेश गुंडू राव यांनी वाढत्या रुग्णसंख्येला आळा घालण्यासाठी तज्ज्ञांकडून अभ्यास करण्याचे आदेश दिले आहेत. एक्सवरील पोस्टमध्ये मंत्री म्हणाले की, हसन जिल्ह्यात एका महिन्यात हृदयविकाराच्या झटक्याच्या १८ प्रकरणांना आरोग्य विभागाने गांभीर्याने घेतले आहे. जयदेव इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओव्हॅस्क्युलर सायन्सेस अँड रिसर्चच्या संचालकांच्या नेतृत्वाखाली हृदयविकाराच्या वाढत्या घटनांची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

दिनेश गुंडू राव यांनी दिलेल्या माहितीनुसार, हृदयविकाराच्या घटना रोखण्यासाठी राज्य सरकारने पुनीत राजकुमार हृदय ज्योती योजना सुरू केली आहे. मात्र, अलीकडे तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका वाढत आहे, यावर सखोल संशोधन करण्याची गरज आहे.

बदलती जीवनशैली, आहाराच्या सवयी आणि असंसर्गजन्य आजारांमुळे हृदयाच्या समस्या निर्माण होत असल्या तरी हसनमध्ये समोर आलेल्या घटनांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. यावर तोडगा काढण्यासाठी तज्ज्ञांच्या पथकाला संशोधन करून १० दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हृदयविकाराचा झटका तेव्हा येतो जेव्हा हृदयाच्या स्नायूंमध्ये रक्त प्रवाह थांबतो, विशेषत: कोरोनरी रक्तवाहिन्यांमधील अडथळ्यामुळे. हा अडथळा सामान्यत: कोलेस्ट्रॉल, चरबी किंवा प्लेगच्या संचयामुळे होतो, ज्यास एथेरोस्क्लेरोसिस म्हणतात. उच्च रक्तदाब, मधुमेह, धूम्रपान आणि लठ्ठपणामुळे धोका वाढतो. तणाव, अनियमित जीवनशैली आणि अनुवांशिक घटक देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. हानिकारक आहार (जसे की जास्त तेलकट किंवा प्रक्रिया केलेले अन्न) याची शक्यता वाढवते.

# जुलै महिन्यात पाऊस सरासरीपेक्षा जास्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** यंदाचा जुलै महिन्यात देशाच्या बहुतांश भागांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची नोंद होण्याची शक्यता आहे. मात्र ईशान्य व पूर्व भारतातील बहुतांश भाग, तसेच दक्षिणेकडील काही टोकाचे परिसर आणि वायव्य भारतातील काही भागांत पर्जन्यवृष्टी सरासरीपेक्षा कमी राहण्याचा इशारा देखील देण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाने जुलै महिन्यासाठी दिलासादायक अंदाज वर्तवला आहे. देशवासीयांना या महिन्यात उष्णतेपासून आराम मिळण्याची शक्यता असून, बहुतांश भागांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस आणि सामान्यपेक्षा कमी तापमान राहण्याचा अंदाज आहे. मात्र, हा पाऊस सर्वत्र सारखा नसेल, कारण ईशान्य आणि पूर्व भारतासह काही भागांना कमी पावसावरच समाधान मानावे लागण्याची चिन्हे आहेत. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, जुलै २०२५ मध्ये देशभरातील एकूण मासिक पर्जन्यमान दीर्घकालीन सरासरीच्या १०६ टक्क्यांपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. सामान्यतः जुलै महिन्यात देशभरात सुमारे २८० मिमी पावसाची नोंद होते. हा अतिरिक्त पाऊस शेती आणि देशातील जलस्रोतांसाठी अत्यंत फायदेशीर ठरू शकतो.



**कीव, युक्रेन** युक्रेनमधील कीव येथे रशियाने केलेल्या हल्ल्यादरम्यान, त्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी स्थानिकांनी मेट्रो स्टेशनमध्ये आश्रय घेतल्याचे दिसून आले.

# पहलगाम दहशतवादी हल्ला हे आर्थिक युद्ध

## परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांचे प्रतिपादन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचे वर्णन 'आर्थिक युद्ध' असे केले आहे. आर्थिक समृद्धी आणणाऱ्या काश्मीरमधील पर्यटन उद्योगाचे नुकसान करण्यासाठी पाकिस्तानने हा हल्ला केला असून परिस्थिती वेगाने पूर्वपदावर येत आहे. याशिवाय आम्ही कोणत्याही देशाचे आण्विक ब्लॅकमेलिंग स्वीकारणार नाही, असेही ते म्हणाले. काश्मीरमध्ये लोकांकडे आर्थिक समृद्धीचे एकच साधन आहे आणि ते म्हणजे पर्यटन. अशा तऱ्हेने पाकिस्तानी दहशतवाद्यांनी त्यांना लक्ष्य केले. याशिवाय देशातील जातीय सलोखा बिघडू नये म्हणून धर्माच्या आधारे लोकांची हत्या करण्यात आली. हे आर्थिक युद्धही आपल्याला लढावे लागेल आणि आता या गोष्टींना आव्हान देण्याची वेळ आली आहे, असे ते म्हणाले.

आर्थिक युद्ध म्हणजे एखाद्या देशाला किंवा समूहाला आर्थिकदृष्ट्या कमकुवत, अस्थिर किंवा शिक्षा करण्यासाठी आर्थिक साधनांचा वापर करणे. ही एक नॉन मिलिटरी स्ट्रॅटेजी आहे, ज्यात शत्रूवर बंदुका किंवा बॉम्बने हल्ला केला जात नाही, तर टार्गेट करून त्याची आर्थिक व्यवस्था कमकुवत केली जाते. रशिया, इराण, क्युबा, व्हेनेझुएला यांसारख्या देशांवर आर्थिक निर्बंध लादण्यासारखे डावपेच अमेरिकेने अनेकदा अवलंबले आहेत.याचा सर्वात प्रमुख मार्ग म्हणजे एखाद्या देशाच्या व्यापार, गुंतवणूक किंवा आर्थिक व्यवहारांवर बंदी घालणे. जसे अमेरिका आणि युरोपने रशियावर लादलेले निर्बंध. याशिवाय कोणत्याही देशातून आयात-निर्यातीवर पूर्ण किंवा अंशत: बंदी. इतकंच नाही तर मुद्दाम आपलं चलन स्वस्त करून दुसऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेचं नुकसान करणंही यात समाविष्ट आहे. एखाद्या देशाची किंवा तेथील नेत्यांची परकीय संपत्ती गोठवण्याचाही या धोरणात समावेश आहे. काही वेळा बँका, शेअर बाजार आणि वित्तीय नेटवर्कवर हल्ले करण्याचे प्रयत्नही यात गुंतलेले असतात.

याशिवाय तेल, वायू किंवा इतर महत्त्वाच्या संसाधनांचा पुरवठा विस्कळीत होण्यासारख्या पुरवठा साखळी तोडण्याच्या प्रयत्नांचाही यात समावेश आहे. आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे, ती म्हणजे आर्थिक प्रचार. म्हणजे एखाद्या देशाची अर्थव्यवस्था कमकुवत असल्याचे वर्णन करणे किंवा शेअर बाजाराविषयी अफवा पसरवणे जेणेकरून गुंतवणूकदारांमध्ये भीती निर्माण होईल. पर्यटकांचे हॉटस्पॉट असलेल्या पहलगाममध्येही पाकिस्तानने जवळपास अशीच रणनीती अवलंबली होती.

## सायबर सेफ योगा डे उत्साहात साजरा



**बारामती :** तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय क्रीडांगणावर आंतरराष्ट्रीय योग दिवस सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा या अंतर्गत "सायबर सेफ योगा डे"साजरा करण्यात आला. बी.बी.ए (सी.ए.) विभाग व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात बी.बी.ए (सी.ए.) विभागातील प्रा.सौ.सलमा शेख यानी सायबर शिक्षा फोर सायबर सुरक्षा या विषयीची संकल्पना स्पष्ट केली. या विषयावर विविध घोषवाक्ये, प्रेरणादायी विचार सेल्फी पॉईंट, आणि छोटेखानी साइबर सुरक्षा मार्गदर्शन देण्यात आले. यामध्ये सायबर सेफ योगा या अंतर्गत सायबर सुरक्षा पालन करण्याचे आवाहन करण्यात आले, ज्याचा उद्देश उपस्थित सर्वांना साइबर हल्ल्यांपासून सुरक्षित राहण्याविषयी जागरूक करणे होता. सर्व सहभागी उत्साहाने या उपक्रमात सहभागी झाले व चांगला प्रतिसाद दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य, रजिस्ट्रार, सर्व अधिष्ठाता, क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ.अनुपमा काटकर, सहयोगी संचालक अजय शिर्के, कार्यसंघ सदस्य साक्षी लवंगारे, गायत्री केसकर, दिपू सिंग या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. सहभागी विद्यार्थ्यांमध्ये क्लबचे अध्यक्ष, अभय साहू, सचिव संदीप माने, गतिविधी संचालक ज्योती गुरव, मीडिया संचालक सायली ढगे, सायबर वॉरियर वरद साळवे, रोहन लोखंडे, वृषाली जांभोरे, बाळकृष्ण शिंदे, यश झिंगाडे, विवेक रसाळ, रेणुका पानसरे यांनी काम पाहिले. सदर उपक्रमासाठी माधुरी सस्ते, रेशमा बाबर, अश्विनी भोसले, दत्तात्रय आरडे, तृप्ती भोसले, स्मिता कचरे यांनी विशेष मेहनत घेतली

## कीर्तनातून पर्यावरण रक्षणाचा संदेश



**वाल्हे :** कीर्तन हे केवळ अध्यात्मिक प्रबोधनाचे माध्यम न राहता, सामाजिक आणि पर्यावरणीय संदेश देणारे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. याचे जिवंत उदाहरण म्हणजे हरिभक्त परायण डॉक्टर पूनम महाराज जाचक यांनी हाती घेतलेला "प्रत्येक कीर्तनात पाच वृक्षांची रोपे वाटप" हा अभिनव उपक्रम. गुरोळी (ता पुरंदर) येथे स्वर्गीय भगवान खेडेकर यांच्या पुण्यस्मरणा दिनानिमित्त पुनम महाराज जाचक यांच्या कीर्तनाच्या आयोजन करण्यात आले होते यावेळी त्या बोलत होत्या. या उपक्रमामध्ये एक भावनिक पैलूही आहे. पूनम महाराज म्हणतात, "या झाडांच्या माध्यमातून आई-वडिलांचे स्मरण जपले जाते." विशेषतः मृत व्यक्तींच्या अस्थी नदीमध्ये विसर्जित न करता, त्या झाडांच्या खड्ड्यात ठेवून त्यावर वृक्षारोपण करण्याची संकल्पना त्यांनी समाजासमोर मांडली असून ती लक्षणीय प्रतिसाद मिळवत आहे. या संपूर्ण उपक्रमासाठी आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्रप्रेमी व सांप्रदायिक विभागाचे अध्यक्ष देवा तांबे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे, असे पूनम महाराजांनी सांगितले. यावेळी पुरंदर पंचायत समितीचे माजी शिक्षणाधकारी पांडुरंग मेमाणे, शिक्षक नेते अरुण महाडिक सरपंच रेणुका खेडेकर, रामचंद्र खेडेकर, भैय्या गोते, वसंत खेडेकर, अंकुश खेडेकर, संध्या खेडेकर, उपस्थित होते.

## ॲड पोपटराव तांबे सन्मानित



**खेड :** राजगुरुनगर जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील ज्येष्ठ वकील ॲड पोपटराव तांबे पाटील यांना सन २०२५ या वर्षीचा सिनियर लॉयर्सने सन्मानित करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अभय ओक आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश रेवती मोहिते यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.कोथरूड, पुणे येथील एमआयटी कॉलेज मध्ये रविवारी (दि. २९) हा समारंभ पार पडला. महाराष्ट्र आणि गोवा परिषदेने महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील एक लाख दहा हजार वकिलांमधून १४ ज्येष्ठ वकिलांची या पुरस्कारासाठी निवड केली. वकिली व्यवसाया बरोबरच सामाजिक न्यायदानाच्या पार्श्वभूमीवर हे पुरस्कार देण्यात आले. ॲड पोपटराव तांबे पाटील यांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# वृक्ष संवर्धनाची दिंडी



**जेजुरी** पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर "विठ्ठल वृक्ष दिंडी" हा नाविन्यपूर्ण उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज इंग्लिश मीडियम स्कूल, जेजुरी या शाळेच्या मार्फत राबवण्यात आला. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे)

## विद्यार्थ्यांनी केली वृक्षांची लागवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** विठ्ठल वृक्षाची लागवड करत अनोखी वृक्ष संवर्धनाची दिंडी काढत, तसेच सामाजिक आणि धार्मिक सलोखा वृद्धिंगत करण्यासाठी मोहम्मद शाद या विद्यार्थ्याने आणि त्याच्या पालकाने विठ्ठल भूमिका स्वीकारून एक अनोखा संदेश पंचक्रोशीमधील ग्रामस्थांना दिला.

पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी, पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल वृक्ष दिंडी हा नाविन्यपूर्ण उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज इंग्लिश मीडियम स्कूल, जेजुरी या शाळेमार्फत राबवला. पालखीच्या पारंपरिक स्वरूपात विद्यार्थ्यांनी विठ्ठलाच्या नामस्मरणात "हरी विठ्ठल, श्री विठ्ठल!" चा गजर करत दिंडी मार्गक्रमण केली. या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने झाड लावून त्याची काळजी घेण्याची प्रतिज्ञा केली. "विठ्ठल माझ्या अंगणात" ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवताना विद्यार्थ्यांनी नुसते रोपे लावली नाहीत तर त्याच्या संवर्धनाची जबाबदारीही अंगीकारली.

हा उपक्रम होण्यासाठी सहशिक्षिका पूजा राजपुरे, वैशाली जगताप, रचना पवार, रोहिणी करडे, निशांत शिंदे, प्रदीप खेडेकर, आकाश कदम, सेविका पल्लवी वडारी यांचे सहकार्य लाभले.

# चंदूकाकांच्या जयंतीनिमित्त ६०० विद्यार्थ्यांना भेट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड येथे विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले! रोटरी क्लब ऑफ पुरंदरने श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या गुरूकुल प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील तब्बल ६०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. रोटरी क्लबचे संस्थापक, दिवंगत चंदूकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्याने शिक्षणाप्रती त्यांच्या दूरदृष्टीला आदरांजली वाहिली.

हा हृदयस्पर्शी कार्यक्रम रोटरी क्लब ऑफ पुरंदरच्या पहिल्या अध्यक्षा आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या शुभहस्ते, तसेच रोटरी क्लब ऑफ पुरंदरचे अध्यक्ष अभिजीत बारवकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी रोटरी क्लबचे सचिव ॲड. आनंद जगताप, खजिनदार प्रमोद धनावडे, संचालक जीवन कड, विश्वनाथ गायकवाड आणि संस्थेचे व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे यांसारखे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवन, स्वागतगीत, विद्येची देवता सरस्वती आणि संस्थेचे संस्थापक चंदूकाका जगताप यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. मुख्याध्यापक विजयकुमार हाके यांनी आपल्या प्रास्ताविकातून चंदूकाका जगताप यांच्या शैक्षणिक कार्याची आणि त्यांच्या योगदानाची माहिती दिली. अभिजीत बारवकर, ॲड. आनंद जगताप आणि प्रमोद धनावडे यांनी आपल्या मनोगतात काकांच्या शैक्षणिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, त्यांच्या कार्याचा वसा पुढे नेण्याचे आवाहन केले.

सहशिक्षिका विद्या कारंडे यांनी कार्यक्रमाचे अतिशय सुंदर सूत्रसंचालन केले, तर सहशिक्षक श्रीकांत सस्ते यांनी उपस्थितांचे आभार मानले. मुख्याध्यापिका प्रिया गायकवाड, रूपाली फडतरे, अश्विनी म्हेत्रे, सुलोचना राणे, ऋषाली भूजबळ यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी अथक परिश्रम घेतले.

पसायदानाने या प्रेरणादायी कार्यक्रमाची सांगता झाली.



**सासवड (ता. पुरंदर) येथील गुरूकुल प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात रोटरी क्लब ऑफ पुरंदरच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना आनंदीकाकी जगताप, अभिजीत बारवकर व इतर मान्यवर**

## उबाठाचे तालुकाप्रमुख दत्ता गांजाळे यांचा शिवसेनेत प्रवेश



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** उबाठाचे तालुकाप्रमुख दत्ता गांजाळे यांनी विविध राजकीय पक्षांतील लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भगवा ध्वज हातात देऊन त्यांचा पक्ष प्रवेश केला.

मंचर नगरपंचायत कार्यक्षेत्रातील विविध विकास कामांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वी आपल्या नगरविकास खात्याच्या माध्यमातून १०० कोटी रुपयांपेक्षा अधिकचा निधी उपलब्ध करून दिल्याने त्यांचा मंचरकरांच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. मंचर शहर आणि आंबेगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नसल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली.

यावेळी आमदार शरद सोनवणे, शिवसेना सचिव रामभाऊ रेपाळे, युवासेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, सुलभा उबाळे, देविदास दरेकर, अजित चव्हाण, प्रविण थोरात पाटील, बापुसाहेब शिंदे, वैभव पोखरकर, सुरेखा निघोट, रविंद्र वळसे पाटील, श्रीकांत लोखंडे, कल्याणराव हिंगे, वासुदेव भालेराव, प्रविण कोकणे, किरण ढोबळे,उपस्थित होते. कैलास गांजाळे, जागृती महाजन, संगिता बाणखेले, सुप्रिया राजगुरव, ज्योती बाणखेले, अरुणनाना बाणखेले, विलास गांजाळे, विकास जाधव, सुवर्णा डोंगरे आदींनी यावेळी शिवसेनेत प्रवेश केला.

## जिल्हा परिषदेकडून वारीच्या वाटेवर स्वच्छता मोहिम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** श्री संत तुकाराममहाराज पालखी सोहळा पुढे निघून गेल्यानंतर प्लास्टिक कोणतीही घाण व कचरा वारीच्या वाटेवर राहू नये, यासाठी जिल्हा परिषदेकडून स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. या स्वच्छता मोहिमेमुळे वारीची वाट पुन्हा चकाचक होत आहे.

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने यंदा जी.आय.एस वर्ल्ड हॉस्पिलिटी सर्व्हिसेस प्रा लि या संस्थेला वारीच्या वाटेवरील स्वच्छता करण्याचे काम देण्यात आले आहे. या संस्थेचे सर्वेसर्वा रविराज लायगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीचे व्यवस्थापक विश्राम कुलकर्णी यांच्यासह रेखा जाधव व बंडू काशिद यांचे सव्वाशेहून अधिक स्वयंमसेवक देहूपासून पालखीच्या मागे स्वच्छता मोहिम राबवित आहेत. पालखी सोहळा मुक्कामी असलेल्या ठिकाणी ओला कचरा, सुका कचरा तसेच घाण व प्लास्टिक मोठ्या प्रमाणावर साचत असते. यामुळे विविध आजार पसरु नयेत. यासाठी तातडीने स्वच्छता मोहिमेत महत्वपूर्ण ठरत आहे.

उंडवडी सुपे येथील पालखी सोहळा पुढे मार्गस्थ झाल्यानंतर पालखी तळ व वारीच्या वाटेवरील कचरा व घाण मोठ्या प्रमाणावर साचली होती. दोन - तीन तासात जी.आय.एस वर्ल्ड हॉस्पिलिटी सर्व्हिसेस प्रा लि या कंपनीच्या वतीने सव्वाहून अधिक लोकांनी कचरा व प्लास्टिक तसेच घाणीची विलेवाट लावून साफसफाई केली. त्यामुळे वारीची वाट चकाचक झाली आहे.



# शहरात गटारे उघड्यावर, नगरपरिषदेचे सोंग



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** राजगुरूनगर शहरात गेल्या कित्येक दिवसांपासून काही भागातील गटारे उघड्यावर दिसत असून, नागरिकांना त्याचा त्रास होत आहे. त्या परिसरातील नागरिक आता वेगवेगळ्या आजारांना सामोरे जाऊ लागले आहेत. शहरातील जैन स्थानक व आझाद चौक परिसरातील नागरिकांनी याच्या अनेक तक्रारी केल्यानंतरही या उघड्या गटारांचे काम पूर्णत्वास येत नसल्याने नागरिकांचा नगरपरिषदेवरील रोष वाढत आहे.

या संदर्भात स्थानकांनी नगरिषदेशी संपर्क साधला असता, त्यांना ह्या कामाची परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून येणे बाकी असल्याचे सांगितले जात आहे. तसेच या उघड्या गटारांमध्ये येणारे जाणारे अनेक दुचाकीचालक सुद्धा पडल्याचे दिसून आले आहे. मात्र जर या उघड्या गटारांमुळे अनेक जण आजारी पडत असतील तर आम्ही जो कर भरत आहोत तो कर जातो कुठे? अशा प्रश्नांची विचारणा आता स्थानिक नागरिक करू लागले आहेत. दुसऱ्या बाजूला कोणाला गंभीर दुखापत झाली, तर त्याची जबाबदारी घेणार कोण, असा सुद्धा प्रश्न उभा राहत आहे. त्यामुळे ह्या उघड्या गटारांची कामे जिल्हाधिकारी कार्यालयातून होणार असतील, तर स्थानिक नगरपरिषद नेमके काय काम करत आहे, यावर सुद्धा आता प्रश्नचिन्ह उभे राहत आहे.

काही नागरिकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, शहरात आलेले मुख्याधिकारी कितीही चांगले काम करण्याचा प्रयत्न करीत असले तरी नगरपरिषदेच्या काही अधिकाऱ्यांची चौकशी मात्र झाली पाहिजे अन्यथा ही गटारे उघडी राहिलीच नसती.

## बावडा येथे श्री तुकाराम महाराज पालखीच्या दर्शनासाठी गर्दी



**बावडा :** संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा बावडा येथे दुपारच्या विसाव्यासाठी आलेला असता, ग्रामस्थांनी सोमवारी जोरदार स्वागत केले. त्यानंतर बाजारतळ येथे विसाव्याच्या ठिकाणी पालखीचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर दुपारचा विसावा संपवून पालखी सोहळ्यास बावडा ग्रामस्थांनी सराटीकडे जाणेसाठी निरोप दिला. बावडा गावच्या वेशीवर पालखी सोहळा दुपारी पोहचला. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांनी पालखीचे जोरदार व उत्साही वातावरणात स्वागत केले. यावेळी ग्रा. पं. च्या वतीने सरपंच पल्लवी घोगरे, उपसरपंच रणजीत घोगरे यांनी स्वागत केले. बावडा गावाला पूर्वी ज्या ठिकाणी गावची वेस होती त्या ठिकाणी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व निरा भिमा कारखान्याच्या अध्यक्षा भाग्यश्री पाटील यांचे प्रयत्नातून वेस बांधण्यात आली आहे. या वेशीतून बावडा ग्रामस्थांनी पालखी खांद्यावर घेऊन बाजारतळावरती उभारण्यात आलेल्या भव्य शामियान्यामध्ये आणली. गावामध्ये पालखी सोहळ्यानिमित्त माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे रत्नाई निवासस्थानी हजारो वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले. याठिकाणी पालखी सोहळा प्रमुखांचा व विश्वस्तांचा निरा भीमा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक उदयसिंह पाटील, विकास पाटील, माजी सरपंच किरण पाटील आदींनी सत्कार केला. बावडा येथील दुपारचा विसावा संपवून सायंकाळी पालखी सोहळ्याने सराटीकडे प्रस्थान ठेवले. यावेळी ग्रामस्थांनी वाजत-गाजत गावच्या वेशीपर्यंत जात बावडेकरांनी पालखीस निरोप दिला. त्यानंतर पालखी सोहळा सायंकाळी ७ वा. नीरा नदीकाठी वसलेल्या सराटी ता. इंदापूर येथे पुणे जिल्ह्यातील शेवटच्या मुक्कामासाठी दाखल झाला.

## आजपासून नोंदणी होणाऱ्या वाहनांसाठी बदल

**बारामती :** महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) अधिनियम २०२५ तील तरतूदीनुसार आजपासून नव्याने नोंदणी होणाऱ्या वाहनांच्या मोटार वाहन करात सुधारणा करण्यात आली असून नागरिकांनी नवीन बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी केले आहे. यामध्ये सीएनजी, एलपीजीवर चालणारी दुचाकी व चारचाकी वाहनाच्या गटात १० लाख रुपयापर्यंतच्या वाहनाच्या किंमतीवर ८ टक्के, १० ते २० लाखापर्यंतच्या वाहनांच्या किंमतीवर ९ टक्के, २० लाखाच्यावरील वाहनांच्या किंमतीवर १० टक्के कर आकारण्यात येणार आहे. खोदणारी, बांधकाम उपकरण वाहने (क्रेन, क्रॉम्प्रे सर, प्राजेक्टर्स, एक्सकेव्हेटर्स आदी) तसेच ७ हजार ५०० कि.ग्रॅ. वजनापर्यंतच्या हलक्या मालवाहू वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के वाहन कर नोंदणीवेळी एकरकमी भरावा लागणार आहे, अशी माहितीदेखील निकम यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

## वारकऱ्यांसाठी शिबीर



**इंदापूर :** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद संचलित पुणे जिल्हा व इंदापूर तालुका मराठी पत्रकार संघ, आरोग्य संदेश बहुद्देशीय समाजसेवी प्रतिष्ठान, समाजभूषण शरदकुमार माणिकचंद शहा ट्रस्ट तसेच सकल जैन समाजाच्या वतीने इंदापूर येथील सुश्रुत हॉस्पिटल मध्ये आयोजित मोफत होमिओपॅथिक शिबीराचा लाभ १२१ वारकरी रुग्णांनी घेतला. उपक्रमाचे हे बत्तीसावे वर्ष आहे. मोफत होमिओपॅथिक औषधोपचार शिबीराचे उद्घाटन कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांनी केले. यावेळी बाळासाहेब मोरे, पोपटराव पवार, शकील सय्यद, प्रमोद राऊत, आरशाद सय्यद, सुनील तळेकर, अशोक चव्हाण, माने हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. संदेश शहा, डॉ. राधिका शहा, डॉ. श्राविका शहा यांनी ताप, सर्दी, दमा, मणक्याचे विकार, गुडघेदुखी, थायरॉईड, सोरायसिस, मूतखडे, पित्ताशयाचे खडे, मासिक पाळीतील तक्रारी, विविध जखमा आदी आजारावर वारकऱ्यांची तपासणी करून त्यांना एक महिन्यांच्या गोळ्या दिल्या. यावेळी जालना, नांदेड, पुणे, सोलापूर जिल्ह्यातील वारकऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राचार्य तुषार रंजनकर, डॉ. भास्कर गटकुळ, जमीर शेख, सुभाष पानसरे, आदिक इंगळे, धरमचंद लोढा, पत्रकार संघाचे जिल्हा निरीक्षक शौकत तांबोळी, जिल्हा संघटक शैलेश काटे, काकासाहेब मांढरे, राजेंद्र कवडे देशमुख, सुरेश जकाते, कैलास पवार, जिल्हा प्रतिनिधी बाळासाहेब जामदार तालुकाध्यक्ष संतोष आटोळे, सोशल मिडिया तालुकाध्यक्ष धनंजय कळमकर पाटील, तालुका सचिव संदीप बल्लाळ, रामवर्मा आसबे, नाशेरा मुलाणी यांनी प्रयत्न केले.

## वारकऱ्यांसाठी विविध सेवा उपक्रमांचे आयोजन

**इंदापूर :** पवित्र आणि भक्तिमय वातावरणात, शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टने वारकऱ्यांसाठी विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन केले. संस्थेच्या अध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव डॉ. गिरीश देसाई, खजिनदार तुषार रंजनकर आणि विश्वस्त अरविंद गारटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम ट्रस्टच्या प्रांगणात पार पडले. यामध्ये मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार, मोफत अल्पोपहार व चहा, चरणसेवा आणि मोफत रेनकोट वाटप या सेवांचा समावेश होता. या उपक्रमांचा शेकडो वारकऱ्यांनी लाभ घेतला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे खजिनदार तुषार रंजनकर, विश्वस्त अरविंद गारटकर, शुभांगी रामटेके, किशोर मालोकार, भारत बोराटे, हमीदभाई अत्तार, डॉ. सारंगी कुंभार, दिपक जगताप, सागर कांबळे, अमोल राउत, भारत माने हे उपस्थित होते.

# वंदे भारतला जयाद्री अथवा मल्हार एक्स्प्रेस नाव द्या

## अमृत प्रकल्पात जेजुरीचाही समावेश करा अन्यथा रेल रोको

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** तीर्थक्षेत्र जेजुरी हे महाराष्ट्रातील लोकदैवत श्री खंडोबाचे पवित्र स्थान असून, येथे ब्रिटिश काळात वसलेले आणि सध्या आधुनिकतेच्या दिशेने विकसित होत असलेले रेल्वे स्थानक आहे. जेजुरी रेल्वे स्थानकाची ऐतिहासिक आणि आध्यात्मिक प्रतिष्ठा असूनही, मुंबई–कोल्हापूर मार्गावरील वंदे भारतसारख्या प्रमुख गाड्यांना येथे थांबा नाही. इतकेच नव्हे, तर अमृत भारत रेल्वे स्थानक विकास योजनेतही या स्थानकाची दखल घेण्यात आलेली नाही. यामुळे भाविक, व्यापारी, स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जेजुरी रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष विजय खोमणे आणि उपाध्यक्ष अमोल शेवाळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, लवकरात लवकर मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर 'रेल्वे रोको' आंदोलन करण्यात येईल.

जेजुरी स्थानकावर सर्व लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा द्यावा, विशेषतः वंदे भारत एक्सप्रेससारख्या अत्याधुनिक गाड्यांना, मुंबई–कोल्हापूर गाडीचे नामकरण 'जयाद्री एक्सप्रेस' किंवा 'मल्हार एक्सप्रेस' असे करावे, अमृत भारत रेल्वे स्थानक योजनेत जेजुरीचा समावेश करावा अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. या मागण्यांना केवळ प्रवासी संघटनांचे नव्हे, तर जेजुरी गावकरी, खान्देकरी, मानकरी, गुरव, कोळी घडशी, वीर मंदिर उपासक तसेच श्री मार्तंड देवस्थान ट्रस्ट, क्षत्रिय धनगर समाज इंदूर, भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे, आरपीआय यांसारख्या राजकीय संघटनांनीही पाठिंबा दिला आहे. या विषयावर भाजपा शहराध्यक्ष सचिन पेशवे, माजी नगरसेवक जयदीप बारभाई, शिवसेना शहरप्रमुख विठ्ठल सोनवणे, संभाजी ब्रिगेडचे संजय सावंत, इत्यादी अनेक स्थानिक नेत्यांनी एकमुखी मागणी केली आहे.

रेल्वे प्रशासनाने जेजुरीस तातडीने अमृत भारत योजनेत समाविष्ट केले आणि महत्त्वाच्या गाड्यांना थांबा दिला, तर राज्यभरातील आणि देशभरातील खंडोबा भक्तांना मोठा दिलासा मिळेल. स्थानीय व्यापार, शेती, पर्यटन आणि रोजगाराला चालना मिळेल. अर्धशतकांपासून मागे पडलेली रेल्वे सुविधा अखेर न्याय मिळेल.






### जेजुरी स्थानकाचे महत्त्व

- खंडोबा हे अठरा पगड जाती-धर्मांचे कुलदैवत असून, जेजुरी हे भाविकांचे श्रद्धास्थान आहे.
- वर्षभरात सहा प्रमुख यात्रा व अनेक सण-उत्सव येथे होतात.
- विजयादशमीला ४२ किलो वजनाच्या तलवारीची स्पर्धा भाविकांना आकर्षित करते.
- देश-विदेशातून लाखो भाविक, पर्यटक, उद्योजक आणि कामगार येथे येत असतात.
- आंतरराष्ट्रीय विमानतळाची योजना जेजुरी पंचक्रोशीत आहे.
- अंजीर, सीताफळ यांसारख्या फळांचे विदेशात मोठे निर्यात मूल्य आहे.

# पुरंदर तालुक्यातील गुणवंतांचा गौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड (ता. पुरंदर) येथील स्व. चंद्रकांत टिळेकर शैक्षणिक व सामाजिक प्रतिष्ठान आणि पुरंदर तालुका मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २९) येथे इयत्ता १० वी, १२ वी आणि सीईटी मधील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ तसेच चंद्रकांत टिळेकर आदर्श शाळा चषक-२०२५ समारंभ व मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय गौरव समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

जेष्ठ समाजवादी नेते रावसाहेब पवार अध्यक्षतेखाली आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणेच्या बालशिक्षण व मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गितांजली बोरुडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय कोलते, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदामराव इंगळे, सासवडचे माजी नगराध्यक्ष दत्तानाना जगताप, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव प्राचार्य नंदकुमार सागर, सुधाकर गिरमे, कुंडलिक मेमाणे, आदर्श सेवानिवृत्त मुख्याध्यापिका रतन टिळेकर, प्राचार्य ईस्माईल सय्यद, अॅड आशपाक बागवान, प्रा. उषा संदीप टिळेकर, मुख्याध्यापक हनुमंत पवार, तानाजी झेंडे, हरीभाऊ टापरे, रामप्रभू पेटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी शिक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचेही कौतुक करण्यात आले. पालक आणि विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. वसंतराव ताकवले यांनी प्रास्ताविक, प्राचार्य संदीप टिळेकर यांनी स्वागत, दत्तात्रय रोकडे यांनी सुत्रसंचलन केले.



"गुरूकुल करीयर अॅकेडमीमध्ये संस्कार, समुपदेशन करतात. विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान मिळविता येते. त्यामुळे विद्यार्थी संस्कारक्षम आणि चांगले नागरीक घडत आहेत."

— **डॉ. गितांजली बोरुडे,** विभाग प्रमुख, एससीइआरटी.

"जपान देशात एका मुलीच्या शिक्षणासाठी रेल्वे सुरू ठेवतो. महाराष्ट्रात मात्र शिक्षक सेवक निश्चितीमध्ये पटसंख्या कमी झाली म्हणून शिक्षक कमी केले. अशी शैक्षणिक अवस्था झाली तर ग्रामीण भागातील मुल शिकणार कशी."

- **प्रा. नंदकुमार सागर,** सचिव मुख्याध्यापक महामंडळ महाराष्ट्र राज्य

## शिवस्नेह फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** पुरंदर तालुक्यात कोथळे येथे शिवस्नेह फाउंडेशन या संस्थाच्या वतीने मागील ३ वर्षांपासून पाणी नियोजन व बचत, महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण व रोजगार निर्मिती या विविध विषयांवर काम केले आहे. या कामाचा मागोवा व फलश्रुती याची माहिती घेण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सन २०२४-२५ या वर्षात संस्थेने पाणी नियोजन, परसबाग लागवड, शोषखड्डे, आरोग्य शिबीर, महिला व मुली यांच्या साठी सॅनिटरी पॅड वाटप, कौशल्य विकास प्रशिक्षण व शैक्षणिक उपक्रम राबविले होते. तसेच शिवस्नेह फाउंडेशन व कोरो इंडिया संस्थेच्या माध्यमातून जल दिंडी, मतदान जनजागृती, पाणी कार्यशाळा व महिलांसाठी खेळ पैठणीचा अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष संदीप जगताप यांनी दिली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष कोथळे सरपंच जयश्री भोईटे, माऊली बाल संस्कार केंद्राचे संस्थापक ह. भ. प. स्वप्नील महाराज काळाने,कोरो इंडिया पश्चिम महाराष्ट्र समन्वयक राधा कांबळे,उपसरपंच नेत्राली काकडे,नेहा झगडे, मुख्याध्यापिका हेमलता जमदाडे, तंटामुक्तीचे सूर्यकांत जगताप, सतिश जगताप, उल्का भोईटे, विजया जगताप व संजय जमदाडे यांच्यासह महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवस्नेह फाउंडेशनचे उपाध्यक्ष आकाश शिळीमकर यांनी केले.

कार्यक्रमाचे नियोजन संस्थेचे सदस्य हर्षाली जगताप, हर्षदा शिळीमकर, ओंकार भोईटे, आकाश शिळीमकर,क्षितिजा जगताप, चेतन कुंभारकर अनिता भोईटे, रुपाली थोरात, अभिजित भोईटे, अक्षय जगताप, सुरज काकडे आदींनी केले. सूत्रसंचालन संस्थेचे अध्यक्ष संदिप जगताप यांनी केले तर आभार मनीषा भोईटे यांनी मानले.

## राजगुरूनगर बँकेचे अध्यक्ष पाटोळे

### उपाध्यक्षपदी आश्विनी पाचारणे यांची निवड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** काही दिवसापूर्वी अध्यक्ष म्हणून दिनेश ओसवाल व उपाध्यक्ष अविनाश कहाणे यांनी राजीनामा दिल्यानंतर राजगुरूनगर सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी आज सागर पाटोळे यांची तर उपाध्यक्षपदि अश्विनी राजेंद्र पाचारणे यांची निवड करण्यात आली.

मंगळवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत अध्यक्ष व उपाध्यक्ष निवड होणार आहे, हे आधीच जाहीर झाले होते. मात्र, ओसवाल व कहाणे यांच्यानंतर आता अध्यक्ष व उपाध्यक्ष कोण होते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते.

अध्यक्ष निवडीसाठी सागर पाटोळे यांच्यासोबत विजया शिंदे अर्ज आलेला होता. मात्र, नंतर एकमताने शिंदे यांनी आपला अर्ज मागे घेत ही निवडणूक खेळीमेळीने पार पडू दिली. तर उपाध्यक्षपदासाठी आश्विनी पाचारणे यांचा अर्ज आल्यानंतर संचालक रामदास धनवटे यांनी आपली इच्छा व्यक्त केली होती.

मात्र धनवटे यांनी सुद्धा निवडणूक खेळीमेळीने पार पडण्यास मदत केली. यावेळी सर्व उपस्थित संचालकांनी मावळत्या अध्यक्ष, उपाध्यक्षांचे आभार मानत नूतन अध्यक्ष उपाध्यक्षांचे अभिनंदन केले.

या निवडीनंतर पाटोळे व पाचारणे यांच्या कार्यकर्त्यांनी भंडारा, गुलाल उधळत तसेच फटाके फोडत आपला आनंद व्यक्त केला.



# जेजुरी शहराला दररोज पिण्याचे पाणी उपलब्ध करावे




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** जेजुरी शहराला पाणी पुरवठा करणारे मल्हार सागर धरण १०० टक्के भरले आहे, परंतु जेजुरी शहरात चार दिवसातून एकदाच पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला तोंड द्यावे लागत आहे. ही समस्या लक्षात घेऊन माजी आमदार अशोक टेकवडे, भारतीय जनता पार्टी जेजुरी शहर मंडल अध्यक्ष सचिन पेशवे व पदाधिकारी यांनी जेजुरी शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा व्हावा, अशी मागणी करणारे पत्र जेजुरी नगर परिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले दिले यांना दिले.

यावेळी जेजुरी शहर मंडल अध्यक्ष सचिन पेशवे यांनी दोन दिवसात पाणी सोडण्यामध्ये जर काही अडचणी येत असतील तर माजी आमदार अशोक टेकवडे यांच्या पुढाकारातून पालिकेला सहकार्य करण्यात येईल, असे सांगितले. ३० तारखेला जेजुरी भारतीय जनता पार्टी जेजुरी शहर भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांची भेट घेवून पाणी प्रश्नाबाबत चर्चा करून दररोज पाणी पुरवठा व्हावा याबाबत मागणी केली होती.

तसेच श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त जेजुरी शहरात लाखो वारकरी बांधव मुक्कामी होते. जेजुरी पालिकेचे मुख्याधिकारी व सर्व कर्मचारी वृंद यांनी या पालखी सोहळ्यात आलेल्या सर्व वारकरी बांधवांची राहण्याची व्यवस्था चांगली केली,

तसेच पालखी मार्गस्थ होताच जेजुरी शहर दोन दिवसात पूर्वीसारखे स्वच्छ केले. या उत्कृष्ट कामाबद्दल भारतीय जनता पार्टीच्या वतीने मुख्याधिकारी यांचे पत्र देवून आभार मानण्यात आले.

यावेळी प्रदेश कार्यकर्त्या अलका शिंदे, पुरंदर तालुका युवा मोर्चा सरचिटणीस स्वानंद अत्रे,जेजुरी शहर महिला मोर्चा अध्यक्षा मंगल पवार, सरचिटणीस निकिता धुमाळ, जेजुरी शहर सरचिटणीस रविंद्र कोशे व सचिन मोरे, चिटणीस पंकज घोणे, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रसाद अत्रे, उपाध्यक्ष हरिश्चंद्र भापकर, शिवाजी बारसुडे, तुकाराम यादव, ओबीसी मोर्चा अध्यक्ष विजय जाधव, अध्यात्मिक आघाडी अध्यक्ष सदानंद बारभाई, उपाध्यक्ष सुनील धुमाळ व कार्यकर्ते उपस्थित होते.



# अर्थ 'नीट'चा

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी, तंदुरुस्तीसाठी जीमची महागडी मेंबरशीप घेण्याची गरज नाही. जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. मात्र दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी मुळात आळस सोडायला हवा. बाईकचा वापरही टाळायला हवा. व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना 'नीट' म्हणजेच 'नॉन एक्सरसाइज थरमोजेनेसिस' असं म्हटलं जातं. 'नीट' म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

**फिटनेस फंडा**

खाणं, व्यायाम आणि झोप या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरली जाणारी शारीरिक ऊर्जा म्हणजे 'नीट' असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दुकानापर्यंत चालत किंवा सायकलवरून जाणं, जिने चढणं, बागकाम, पाळीव प्राण्याला फिरायला नेणं, घरची कामं करणं अशा ॲक्टिव्हिटींचा यात समावेश होतो. बाईकऐवजी चालत जाणं, लिफ्टऐवजी जिने चढणं अशा जीवनशैलीतील छोट्या छोट्या बदलांमुळे दिवसभरात्या खर्च होणाऱ्या कॅलरींचं प्रमाण वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. हे छोटे छोटे बदल अगदी सहज करता येतात. आपल्या आरोग्यरक्षणासाठी कंटाळा बाजूला ठेवायला हवा. प्रत्येकवेळी कॉलेज किंवा ऑफिसला चालत जाणं शक्य नसतं. त्याऐवजी तुम्ही सायकल वापरू शकता. ऑफिसमधले सहकारी किंवा कॉलेजमधल्या मित्रमैत्रिणींसोबत चालत गप्पा मारा. शक्य तितका वेळ उभे राहण्याचा प्रयत्न करा. घरात झाडं असतील तर त्यांना पाणी घाला. अशा शारीरिक हालचालींमुळे तुम्ही तंदुरुस्त व्हाल.



# संसदेतील तरुण चेहरा

मित्रांनो, १८ व्या लोकसभेत २५ ते २६ च्या वयोगटातील चार सदस्य आहेत. त्यात २५ वर्षे वयाच्या शांभवी चौधरीचा समावेश होतो. नरेंद्र मोदींनी बिहारच्या दरभंगा येथील रॅलीमध्ये तिला 'सर्वात तरुण उमेदवार' म्हणून संबोधले होते. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून समाजशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेतलेली आणि लेडी श्री राम कॉलेजमधून ग्रॅज्युएशन पूर्ण केलेली शांभवी आज संसदेत युवावर्गाचे प्रतिनिधित्व करण्यास सिद्ध आहे. त्यामुळेच या सर्वात तरुण दलित महिलेविषयी जाणून घ्यायलाच हवं.



**युवापिढीची राजकारणाकडे बघण्याची दृष्टी संमिश्र दिसते. काही जण याला आपला प्रांत नसल्याचे समजतात तर काहींना यात कारकिर्द घडवण्याची संधी दिसते. अशांसाठी वयाच्या अवघ्या २५ वर्षे मोदी सरकारमध्ये सामील झालेल्या शांभवी चौधरीचा आदर्श प्रेरणादायी ठरेल. आज या सर्वात तरुण उमेदवाराविषयी जाणून घेऊ या.**

१८ व्या लोकसभेतील एक स्पर्धक म्हणून समस्तीपूरमधून जिंकण्यासाठी शांभवीने मतदानाच्या ४५ दिवस प्रचाराला सुरुवात केली. ती टीमसह रोज जवळपास १५-१६ तास मेहनत करायची. एनडीएचा एक भाग म्हणून लढत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासूनच्या दोन कार्यकाळात केलेल्या कामाबद्दल बोलण्यास तिने प्राधान्य देणे स्वाभाविक होते. यंदाही प्रत्येक मतदारसंघात मोदी फॅक्टर होता आणि एनडीएचे उमेदवार लोकांना मोदींना तिसऱ्यांदा मतदान करायला सांगत होते. हे लक्षात घेऊनच मतांचे आवाहन करताना शांभवीने मोदींबरोबर मुख्यमंत्री नितीश कुमार आणि लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास पासवान) प्रमुख चिराग पासवान यांनी केलेल्या चांगल्या कामाकडेही लोकांचे लक्ष वेधले. एनडीएचा राष्ट्रीय जाहीरनामा, एलजेपी (आरपी) च्या जाहीरनाम्याव्यतिरिक्त तिने समस्तीपूरसाठी स्थानिक जाहीरनामाही प्रसिद्ध केला. समस्तीपूरचा खासदार म्हणून आपण काय करणार हे या जाहीरनाम्यात स्पष्टपणे नमूद केले होते. तिचा

**अचिव्हर**

मतदारसंघ म्हणजे शेतकरीबहुल पट्टा आहे. सहाजिकच जाहीरनाम्यामध्ये शेतकऱ्यांसाठीच्या कल्याणकारी योजना, ॲग्रोटेक आणि सॉफ्टवेअर क्षेत्राचा विकास याबद्दलचा मॅप देण्यात आला होता. प्रचाराच्या त्या ४५ दिवसांमध्ये घेतलेल्या प्रत्येक सभेत आणि या विकास कार्यक्रमांप्रती विश्वास वाटल्यामुळेच समस्तीपूरच्या जनतेने आपल्याला मोठ्या मताधिक्याने निवडून दिल्याचे शांभवीचे म्हणणे आहे.

भारतातील सर्वात तरुण खासदार म्हणून नव्हे तर आधी मला तुमची मुलगी म्हणून स्वीकारा, नंतरच तुम्हाला माझ्यात एक खासदार दिसेल, असे ती आज लोकांना सांगते. राजकारणातील लोकांनी स्वतःला जनतेशी जोडले जाण्याचे मूल्य गमावले आहे, असे ती म्हणते. म्हणूनच मतदारांशी निखळ आणि हृद्य संबंध जोडण्याचा प्रयत्न करण्याचा तिचा मानस आहे. तरुण असल्यामुळे संपूर्ण निवडणूक प्रचारात ती शारीरिक, मानसिक, भावनिकरित्या सक्रियपणे सामील होऊ शकली. आता जनतेचे प्रश्न सोडवतानाही हीच सक्रियता कामी येईल, असे तिचे म्हणणे आहे. एकूणच इतक्या तरुण वयात बिहारमधील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वोच्च फरकाने (१,८७,२५१ मतांनी) झालेला तिचा विजय तरुणाईसाठी प्रेरणादायी आणि आश्वासक आहे, असे म्हणावे लागेल.

## शेर की जुबानी

बडा अजीब सा सफर है,
जिसके लिए लिखूं वही बेखबर है।

आंखे कितनी भी छोटी क्यूं न हो,
ताकत तो उनमें सारे आसमान
देखने की होती है।

मीठी यादों से गिर रहा था ये
आंसू,
फिर भी न जाने ये क्यूं खारा था।

## टेक गाईड

### परदेशप्रवास होणार सुकर

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाने प्रवासी प्रक्रिया क्षमतांमध्ये लक्षणीय सुधारणा जाहीर केल्या आहेत. यामध्ये प्रति तास अंदाजे ८,००० प्रवाशांना हाताळण्याची क्षमता वाढवणे आणि त्यांची विमानतळावर थांबण्याची वेळ कमी करणे समाविष्ट आहे. या बदलाचा एक महत्त्वाचा भाग डिजीयात्रा, बायोमेट्रिक-आधारित प्रणालीचा विस्तार हा आहे. हे प्रवाशांना बोर्डिंग पास किंवा आयडी पडताळणीशिवाय चेकपॉईंटमधून सहजपणे जाण्याची परवानगी देते. विमानतळ ऑपरेटर एमआयएएलने दोन्ही टर्मिनलमध्ये अशा डिजीयात्रा प्रवेशाचा लक्षणीय विस्तार केला आहे. या अंतर्गत एकूण एंट्री लेन (ई-गेट्स) ची संख्या २४ वरून ६८ पर्यंत वाढली आहे. यामध्ये केवळ डिजीयात्रा वापरकर्त्यांसाठी ३४ लेन राखून ठेवल्या आहेत.

## नवे काही

### आयफोनधारकांच्या सुविधा वाढल्या


आता तुम्ही एका टॅपने आयफोनवरून दुसऱ्या फोनवर रक्कम ट्रान्सफर करू शकाल. याशिवाय प्रथमच कॉल रेकॉर्डिंग आणि कस्टमाइज्ड होम स्क्रीन यासारख्या वैशिष्ट्यांचा वापर करण्यासही तुम्ही सक्षम असाल. टेक कंपनी ॲपलने अलिकडेच अनेक कृत्रिम बुद्धिमत्ता साधने सादर केली. कंपनी आपल्या आय फीचर्सला 'ॲपल इंटेलिजन्स' असे म्हणत आहे. ही नवीन वैशिष्ट्ये आयफोन आणि मॅकमध्ये सिलिकॉन चिपसह वापरता येऊ शकतात.



## बी अलर्ट

### हाईड युवर टायपिंग स्टेटस

ऑडियो-व्हिडिओ कॉल्स आणि इंस्टंट मेसेजिंगसाठी मायक्रोसॉफ्टचं स्काईप हे सर्वोत्तम ॲप आहे. या ॲपमध्ये नुकतीच काही उपयुक्त फीचर्स जोडली गेली आहेत. यामुळे तुम्ही तुमचं टायपिंग स्टेटस लपवू शकता. यासाठी स्काईपच्या टूल्स ऑप्शनमध्ये जा. यावर क्लिक केल्यावर स्काईपचं सेटिंग पेज ओपन होईल. यानंतर 'शो ॲडव्हान्स ऑप्शन्स'वर क्लिक करा. इथे 'शो व्हेन आय ॲम टायपिंग' हा पर्याय ऑफ करा. यानंतर तुमचं टायपिंग स्टेटस हाईड होईल.



## उपयुक्त

### घरीच क्लिनिंग करावे लागते?



घरातील स्वच्छतेचे काम सोपे करणारी इंट्रिंट स्मार्ट मॅपिंग टेक्नॉलॉजी आता व्हॅक्यूम क्लीनरला नवे रुपडे देत आहे. अलिकडेच बाजारात १३ जीएचझेड क्वाड कोर प्रोसेसर व प्रीमियम थ्री स्टेज क्लीनिंग सिस्टमसह आय रोबो व्हॅक्यूम क्लीनर दाखल झाला आहे. तो एअर पॉवरसह काम करतो. त्यामध्ये बसवलेले ब्रश मळकट फरशीवरील तसेच कार्पेटवरील धूळ सहज काढते. यात डर्ट डिटेक्शन सेन्सर असल्यामुळे घरातील सर्वात अस्वच्छ भाग ओळखला जातो आणि तिथे जाण्यासाठी तसेच संबंधित जागा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी रोबोला आज्ञा दिली जाते. वाय-फाय कनेक्टेड रोबोट व्हॅक्यूम क्लिनर वेगवेगळ्या क्लीनिंग मोडसह येतात. वर उल्लेख केलेल्या आयरोबो व्हॅक्यूम क्लीनरची किंमत २९,५०० रुपये इतकी आहे.

# समुद्रांचा अभ्यास


पृथ्वीचा बराच मोठा भूभाग समुद्राने व्यापला आहे. या समुद्राच्या तळाशी अनेक रहस्य दडली आहेत. समुद्र, महासागरांमधली बरीचशी गुपितं आपल्याला माहीतच नाहीत. म्हणूनच विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन इंजिनिअरिंग, मेडिकलपेक्षा वेगळी वाट निवडणारे विद्यार्थी ओशनोग्राफीचा विचार करू शकतात. ओशनोग्राफी ही अर्थ सायन्सची एक शाखा आहे. यात अर्थातच समुद्राचा अभ्यास केला जातो. समुद्रकिनाऱ्यावरचे बदल टिपले जातात. समुद्राशी संबंधित विविध विषयांचा समावेश ओशनोग्राफीमध्ये होतो.

**वेगळ्या वाटा**

मरीन बायोलॉजीमध्ये समुद्री जीवनाचा अभ्यास होतो. इथल्या जीवसृष्टीची उत्पत्ती कशी झाली असावी, याबाबत सतत संशोधन केलं जातं. केमिकल ओशनोग्राफीमध्ये समुद्रातल्या केमिस्ट्रीचा अभ्यास होतो. जिओलॉजिकल ओशनोग्राफीत समुद्र तळ अभ्यासला जातो. फिजिकल ओशनोग्राफीमध्ये लाटा, भरती-ओहोटी तसंच अन्य काही बाबींचा अभ्यास होतो.

या विषयात पदवी मिळवल्यानंतर सरकारी तसंच खाजगी क्षेत्रांमध्ये संधींची कवाडं खुली होतात. पर्यावरण रक्षणासोबतच पाणी व्यवस्थापन, जल प्रदूषण, खनिज तेल उद्योग अशा क्षेत्रांमध्ये काम करता येतं. अंगात धडाडी असेल तर तुम्ही ओशनोग्राफीचा अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तम करीअर घडवू शकता.





# 'भावनिक प्राणी' आहात?

आपण कॉर्पोरेट शिडीवर चढत जातो, तसतसे वाढीच्या संधी कमी आणि आव्हानात्मक होतात हे गुपित नाही. म्हणून कारकिर्द नेहमीच ऊर्ध्वगामी असणार नाही हे समजून घ्यायला हवं. कारकिर्दीत अनेक ठिकाणी तुम्हाला अडकल्यासारखे वाटते. आवडीच्या किंवा समाधानकारक आणि आव्हानात्मक भूमिका मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. यामुळे काही 'भावनिक प्राणी' अस्वस्थ होतात. निराश होतात. त्यांना स्वतःचा राग्ही येतो. पण ही अवस्थाही संयमाने हाताळणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वप्रथम आपल्या भावना मान्य करा पण त्याकडे फार लक्ष देऊ नका. भावना नियंत्रणात केल्याने तुमच्या पुढे जाण्याच्या क्षमतेला गती मिळू शकते. त्यामुळेच भावनांचा निचरा होण्यासाठी एखादा विश्वासू मित्र, कुटुंबातील सदस्य, भागीदार, मार्गदर्शक किंवा थेरपिस्ट यांच्याशी बोला आणि लवकरात लवकर या फेजमधून स्वतःला बाहेर काढा. महत्त्वाचे म्हणजे भावनिक रोलरकोस्टरची कालमर्यादा सेट करा. कारकिर्दीमध्ये अपयश

**जाणून घ्या**

आल्यास कोणालाही दोष देऊ नका तर पुढील तार्किक वाटचाल करण्यासाठी कशावर काम करणे आवश्यक आहे हे बघा आणि त्यावर जवळच्या लोकांचे अभिप्राय विचारा. तुम्ही आपल्या वरिष्ठांनाही विश्वासात घेऊ शकता. यावेळी त्यांना काही प्रश्न विचारा. जसे की, 'या भूमिकेसाठी कोणती कौशल्ये सर्वात महत्त्वाची होती?' किंवा 'मी स्थान मजबूत करू शकलो असतो अशी काही विशिष्ट क्षेत्रे आपल्या संस्थेत होती का?' हे प्रश्न तुमची समजूत आणि परिस्थितीचा सामना करत पुढे जाण्याची तयारी दाखवून देतील.

कदाचित एखाद्या कार्यक्षेत्रात तुमच्याकडे वेगळ्या कौशल्याची किंवा नेतृत्व शैलीची आवश्यकता असल्याचे जाणवत असेल तर ते पूर्णपणे प्राप्त करण्याच्या मागे लागा. यातूनच परिस्थिती आणखी चांगल्या संधीकडे नेईल, यावर विश्वास ठेवा. वैयक्तिक विकास योजना तयार करण्यासाठी गुरु आणि प्रायोजकांशी चर्चा करा. यातून तुम्हाला सुधारित करिअरचा मार्ग सापडू शकतो.

# ...तर बिनधास्त पुढे जा

डेटिंगमध्ये भावी पार्टनर शोधण्याच्या प्रयत्नात असाल तर काही आनंददायक, आश्वासक संकेतांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. ते मिळत असल्यास तुम्ही योग्य मार्गावर असल्याचे समजण्यास हरकत नाही. उदाहरणार्थ; पैसा, श्रीमंती, चांगले दिसणे या बाबी एकीकडे असतात. मात्र सहानुभूती आणि दयाळू व्यक्तिमत्त्व या सध्या महाग झालेल्या गोष्टी आहेत. म्हणूनच दुसऱ्या माणसाच्या भावना समजू शकत असेल आणि दुसरी व्यक्ती आपल्या भावना मोकळेपणाने शेअर करू शकत असेल तर अशा व्यक्तीशी सुरू असणारे डेटिंग तुम्हाला चांगल्या वळणावर नेणारे ठरेल. तुमच्या सुख-दुःखात सहानुभूती दाखवू शकतो, गरजेच्या वेळी सांत्वन देतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे खडतर दिवसांतही सोबत असतो तोच माणूस आयुष्यभर धरून ठेवण्यासारखा असतो.



प्रत्येक नात्यामध्ये थोडा का होईना, संघर्ष असतोच. परंतु जोडपी त्याचे निराकरण कसे करतात यावरुन त्यांच्यातील नातेसंबंधाचा टोन सेट होतो.

**मॅच मेकिंग**

एखादी चूक झाल्यावर माफी मागायला न घाबरणारी व्यक्ती एखाद्या दुर्मीळ रत्नासारखी असते. अहंकार बाजूला ठेवणे आणि माफी मागणे हे वाटते त्यापेक्षा कठीण आहे. म्हणूनच अशा व्यक्तीला डेट करत असाल तर नाते फुलवण्याचा अवश्य प्रयत्न करा. संभाव्य जोडीदार वाईट परिस्थितीत कसा वागतो हे बघा. भागीदार आपल्या कृतींवर विचार करण्यास वेळ घेतो आणि जबाबदारी स्वीकारतो तेव्हा ते परस्पर आदराचे लक्षण आहे, हे समजून घ्या. परस्परांशी असणारे नाते तुमच्यासाठी सुरक्षित स्थान असले पाहिजे. जोडीदार असे वातावरण तयार करत असेल तर कोणत्याही भीतीशिवाय तुम्ही मोकळेपणाने व्यक्त होऊ शकता. आपला खरा चेहरा घेऊन त्याच्यासमोर वावरू शकता. पार्टनर तुम्हाला यादृष्टीने आश्वस्थ करत असेल, तर डेटिंग बिनधास्त सुरू ठेवा.



# मनोहारी ठोसेघर धबधबा

दोस्तांनो, मान्सून पिकनिकची मजा काही वेगळीच असते. या दिवसात जिकडेतिकडे धबधबे कोसळत असतात. म्हणूनच मित्रमंडळींसोबत एखाद्या धबधब्याच्या ठिकाणीच भटकंती करायला हवी. डोंगरातून अंगावर कोसळणारी पाण्याची धार अलगद झेलायला हवी. असंच एक ठिकाण म्हणजे ठोसेघर धबधबा. साताऱ्यातला हा धबधबा मान्सून वीकेंड पिकनिकसाठी बेस्ट ठिकाण आहे.

पश्चिम घाटाच्या कुशीत वसलेला हा धबधबा आपलं मन मोहवून टाकतो. निसर्गरम्य असं हे ठिकाण आपल्याला आकर्षित करतं. इथे निवांत क्षण घालवता येतात. साताऱ्याच्या जवळपास अनेक धबधबे आहेत. त्यापैकी एक म्हणजे ठोसेघर धबधबा. सज्जनगड आणि पवनचक्क्यांचं मनोहारी दृश्य बघत आपण ठोसेघरला पोहोचतो. पावसाळ्यात या भागावर धुक्याची चादर पसरलेली असते. मस्त

**भटकंती**

थंडगार वातावरणात धबधब्याखाली भिजताना एकदम भारी वाटतं. मोठा ग्रुप असेल तर तुम्ही खूप धमाल करू शकता. इथली भातशेतं आपल्याला खुणावतात. धुक्याची चादर पसरल्यानंतर समोरचं काहीच दिसत नाही. साताऱ्यापासून २० किलोमीटर अंतरावर हे ठिकाण आहे. सातारा रेल्वेस्थानकावर उतरून तुम्ही पुढे जाऊ शकता. स्वतःच्या वाहनानेही प्रवास करता येईल. कोल्हापूरपासून १५० किलोमीटरवर हा धबधबा आहे. त्यामुळे यंदाच्या मान्सूनमध्ये ठोसेघरला नक्की जा.



# चविष्ट बटाटा पुलाव

दोस्तांनो, तुम्ही टोमॅटो राईस, कोबी भात, पुलाव असे प्रकार खाल्ले असतील.आता बटाटा पुलाव करून बघा. हॉस्टेल असो किंवा घर, आपल्याकडे बटाटे असतातच. अडचणीला उपयोगी पडणारा हा बटाटा घालून तुम्ही खमंग पुलाव बनवू शकता. पटकन होणारी ही रेसिपी जाणून घेऊ.



**सामग्री:** एक वाटी तांदूळ, दोन ते तीन बटाटे, पुदिन्याची पानं, कोथिंबिर, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, एक तुकडा दालचिनी, जीरं,मीठ, तेल

**कृती:** तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजवून ठेवा. पाणी काढून टाकून एका भांड्यात भात शिजवून घ्या. भात शिजवताना थोडं मीठ आणि तेल घाला. तेलामुळे भात मोकळा होईल. पाणी काढून भात एका ताटात पसरवून घ्या. गार होऊ द्या. आता पुदिन्याची पानं, थोडी कोथिंबिर आणि मिरच्या एकत्र वाटून घ्या. यात चमचाभर लिंबाचा रस आणि थोडं मीठ

**झटपट रेसिपी**

घाला. बटाटे उकडून सोलून घ्या. त्याचे छोटे चौकोनी तुकडे करा. आता कढईत थोडं तेल गरम करा. जीरं आणि दालचिनीचा तुकडा घाला. मिनिटभर परता. मग यात पुदिना- कोथिंबिरीची वाटलेली पेस्ट आणि बटाटे घालून नीट परतून घ्या. यात शिजवलेला भात घाला. हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. दह्यासोबत हा पुलाव खाता येईल.



## गतविजेत्या अल्काराझची विजयाने सुरुवात...

दोन वेळा विजेता राहिलेला कार्लोस अल्काराझने विम्बल्डनच्या पहिल्या फेरीत इटलीच्या फॅबियो फोग्निनीचा पराभव केला आहे. ब्रिटिश खेळाडू ऑलिव्हर टार्वेटनेही पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. या स्पर्धेत अल्काराझला दुसरे मानांकन मिळाले आहे. इटलीचा जॅनिक सिनर पहिल्या क्रमांकावर आहे. ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, गवतावर खेळल्या गेलेल्या सेंटर कोर्टवर चार तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या सामन्यात २२ वर्षीय स्पेनच्या अल्काराझने ७-५, ६-७ (५-७), ७-५, २-६, ६-१ असा विजय मिळवला. अल्काराझचा हा सलग १९ वा विजय आहे. या महिन्याच्या सुरुवातीला त्याने फ्रेंच ओपनमध्ये जॅनिक सिनरला हरवून त्याचे पाचवे ग्रँड स्लॅम जेतेपद जिंकले आणि त्यानंतर ब्रिटिश ग्रासवर क्वीन्स जेतेपदही जिंकले. आता त्याचा सामना २१ वर्षीय टेरव्हेटशी होईल, ज्याने विम्बल्डनमधील त्याच्या पहिल्या सामन्यात स्वित्झर्लंडच्या लिआंड्रो रिडीला हरवले. सामन्याच्या निर्णायक सेटमध्ये १५ मिनिटांचा ब्रेक होता, त्यादरम्यान उन्हात बसलेल्या एका प्रेक्षकाला अस्वस्थ वाटले.

# भारत दोन हुकूमी एक्के काढणार

## भारत-इग्लंड दुसरी कसोटी : जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव खेळणार नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघाला इंग्लंड दौऱ्यावर पहिल्या कसोटीत पराभवाचा सामना करावा लागला. इंग्लंडने ५ विकेट्स राखून ३७१ धावांच्या विक्रमी लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या कसोटीत जसप्रीत बुमराहच्या खेळण्यावरून बरीच चर्चा सुरू आहे. त्याच्यावरील कामाचा ताण लक्षात घेता, या दौऱ्यावर तीन कसोटीतच त्याला खेळवण्यात येणार आहे. पण, काल सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोएचेट यांनी जसप्रीत उद्याच्या सामन्यासाठी उपलब्ध असल्याचे विधान करून इंग्लंडला बुचकळ्यात टाकले.

भारतीय संघ एडबस्टन कसोटीत दोन बदल करणार हे निश्चित झाले आहे. सहाय्यक प्रशिक्षकांनी जसप्रीत उपलब्ध असल्याचे सांगितले असले तरी त्याचे या कसोटीत खेळणे अवघडच आहे. शार्दूल ठाकूर याला बाकावर बसवले जाऊ शकते. रायन यांनी काल दोन फिरकीपटूंसह खेळणार असल्याचे संकेत दिले आहे. त्यामुळे कुलदीप यादवचं नाव पुढे आलं आहे. पण, इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार तो दुसरा फिरकीपटू कुलदीप नाही.

काल दोन सत्रांच्या सरावानंतर टीम इंडियाची प्लेइंग इलेव्हनही जवळपास निश्चित झाली आहे. रायन यांनी दिलेल्या संकेतानुसार नितीश कुमार रेड्डी व वॉशिंग्टन सुंदर यांचे कसोटी संघात पुनरागमन पक्के समजले जात आहे. अशा परिस्थिती जसप्रीत व कुलदीप हे खेळणार नसल्याचे स्पष्ट होतेय. पहिल्या कसोटीत टीम इंडियाच्या शेपटाने निराश केले होते. पहिल्या डावात ४१ धावांत ७, तर दुसऱ्या डावात ३१ धावांत ६ विकेट्स धडधड पडल्या होत्या. त्यामुळे रेड्डी व सुंदर यांच्या समावेशामुळे टीम इंडियाची फलंदाजाची फळी अधिक मजबूत होण्यास मदत होईल.

लीड्सवर यशस्वी जैस्वालने भरपूर झेल टाकले आणि त्याचा खूप मोठा फटका संघाला बसला. त्यामुळे यशस्वीला स्लीपमधून हटवण्यात येणार असल्याचे सराव सत्रात स्पष्ट झाले. काल स्लीपमध्ये लोकेश राहुल, साई सुदर्शन, शुभमन गिल, करुण नायर व लोकेश राहुल दिसले. यशस्वी सिली पॉइंट व सिली पॉइंटवर सराव करताना दिसला.

**भारताची संभाव्य प्लेइंग इलेव्हन -** लोकेश राहुल, यशस्वी जैस्वाल, साई सुदर्शन, शुभमन गिल, करुण नायर, रिषभ पंत, वॉशिंग्टन सुंदर, रवींद्र जडेजा, नितीश कुमार रेड्डी, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा.

**इंग्लंडची प्लेइंग इलेव्हन -** झॅक क्रॉली, बेन डकेट, ऑली पोप, जो रुट, हॅरी ब्रुक, बेन स्टोक्स (कर्णधार), जॅमी स्मिथ (यष्टीरक्षक), ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्स, जोश टंग, शोएब बशीर.

## स्मृती मानधनाची टी२० क्रमवारीतही मोठी झेप



**नवी दिल्ली :** भारतीय महिला क्रिकेट संघाने शनिवारी इंग्लंडविरुद्ध पहिल्या कसोटी सामन्यात दणदणीत विजय मिळवला होता. त्यानंतर आता आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने महिला टी२० क्रिकेट क्रमवारी जाहीर केली आहे. या क्रमवारीत भारताची सलामीवीर स्मृती मानधनाने मोठी झेप घेतली आहे. मानधनाने भारताकडून पहिल्या टी२० सामन्यात इंग्लंडविरुद्ध खणखणीत शतक ठोकत इतिहास घडवला होता. त्याचा तिला आता फायदा झाला आहे. मानधनाने नॉटिंगघमला झालेल्या पहिल्या कसोटीत ६२ चेंडूत १५ चौकार आणि ३ षटकारांसह ११२ धावांची खेळी केली होती. त्यामुळे ती आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तिन्ही प्रकारात शतके करणारी भारताची पहिली महिला क्रिकेटपटू ठरली होती. त्यानंतर आता स्मृती महिला टी२० क्रमवारीत फलंदाजांच्या यादीत एक स्थानाची प्रगती करत तिसऱ्या क्रमांकावर आली आहे. तिने सर्वोत्तम ७७१ रेटिंग पॉइंट्सही मिळवले आहेत. ती आता अव्वल क्रमांकावर असलेल्या बेथ मुनीपेक्षा फक्त २३ पॉइंट्सने मागे आहे. स्मृती वनडेमध्येही अव्वल क्रमांकावर आहे. ऑस्ट्रेलियाची बेथ मुनी ७९४ पॉइंट्ससह अव्वल क्रमांकावर आहे. दुसऱ्या क्रमांकावर वेस्ट इंडिजची हेली मॅथ्यूज आहे. तिचे ७७४ पॉइंट्स आहे. आता स्मृतीला इंग्लंडविरुद्धच्या टी२० मालिकेदरम्यान आणखी प्रगती करण्याची संधी असणार आहे.

## यशस्वी जैस्वॉलचा यू-टर्न! संघ सोडण्याचा विचार मागे घेतला



**नवी दिल्ली :** यशस्वी जैस्वालने देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबई संघासोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे. २३ वर्षीय यशस्वीने काही महिन्यांपूर्वी गोवा संघाकडून खेळण्याची परवानगी मिळावी, यासाठी मुंबई क्रिकेट संघटनेकडे ना हरकत प्रमाणपत्र मागितले होते. पण, त्यानंतर त्याने यू टर्न मारला आणि MCA ला त्याची विनंती मान्य करू नका, असे म्हटले. सोमवारी MCA ने ही मागणी मान्य केली आणि आता यशस्वी मुंबईकडूनच खेळणार असल्याचे स्पष्ट झाले. "अपेक्स कौन्सिलने यशस्वी जैस्वाल याने दुसऱ्या राज्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मागितलेले ना हरकत प्रमाणपत्र (NOC) मागे घेण्यास मान्यता दिली आहे. तो मुंबईसाठी उपलब्ध राहणार आहे," असे एमसीएने एका निवेदनात म्हटले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक यांनी सांगितले की, "यशस्वी हा नेहमीच मुंबई क्रिकेटचा अभिमानास्पद खेळाडू आहे. आम्ही त्याचा एनओसी मागे घेण्याचा अर्ज स्वीकारला आहे आणि तो आगामी स्थानिक हंगामात मुंबईसाठी उपलब्ध असेल."

## वैभव सूर्यवंशीची खेळी व्यर्थ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारताच्या १९ वर्षांखालील संघाला इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या वन डे सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. वैभव सूर्यवंशी व विहान मल्होत्रा यांच्यासह राहुल कुमार व कनिष्क चौहान यांच्या दमदार खेळीच्या जोरावर भारताने मोठे आव्हान उभे केले. पण, इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाकडून कर्णधार थॉमस रेव याने खणखणीत शतक झळकावले आणि ३ चेंडू राखून संघाला विजय मिळवून दिला. या विजयासह इंग्लंडने मालिका १-१ अशी बरोबरीत आणली.

कर्णधार आयुष म्हात्रे १२ चेंडूंत शून्य धाव करून माघारी परतल्यानंतर वैभव व विहान यांनी भारताचा डाव सावरला. दोघांनी ६७ धावांची भागीदारी केली. पहिल्या सामन्यात वादळी खेळी करणारा वैभव अर्धशतकापासून आज वंचित राहिला. त्याने ३४ चेंडूंत ५ चौकार व ३ षटकारांसह ४५ धावांची खेळी केली. वैभवच्या विकेटनंतर मौलिराजसिंग चावडा ( २२) व अभिग्यान कुंडू ( ३२) हे मोठी खेळी करू शकले नाही.

विहान ६८ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ४९ धावांवर बाद झाला. राहुल कुमार व कनिष्क यांनी चांगली खेळी करताना अनुक्रमे ४७ व ४५ धावा केल्या. त्यानंतर भारताचा डाव गडगडला आमइ संघाला ४९ षटकांत सर्वबाद २९० धावा करता आल्या. यामध्ये ३२ अतिरिक्त धावांचा समावेश होता. इंग्लंडकडून अॅलेक्स फ्रेंचने ४, जॅक होम व अॅलेक्स ग्रीन यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडची सुरुवात काही खास झाली नाही.

## पुणे जिल्हा सुपर १००० बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत मंजुषा सहस्त्रबुद्धेला तिहेरी मुकुट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** रायसोनी फाऊंडेशन पुरस्कृत योनेक्स सनराइज जीएच रायसोनी मेमोरियल पुणे जिल्हा सुपर 1000 बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत मंजुषा सहस्त्रबुद्धेने 40 वर्षांवरील महिला एकेरी व दुहेरी, 45 वर्षांवरील दुहेरी गटात विजेतेपद पटकावत तिहेरी मुकुट संपादन केला.

शिवाजीनगर येथील पीडीएमबीए बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत पुरुष एकेरीत अंतिम फेरीत अव्वल मानांकित सुविर प्रधान याने दुसऱ्या मानांकित अथर्व खिस्तीचा 15-13, 15-12 असा पराभव करून विजेतेपद पटकावले. महिला गटात अव्वल मानांकित तनिष्का देशपांडेने आठव्या मानांकित युतीका चव्हाणचा 15-12, 15-07 असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

35वर्षांवरील पुरुष गटात अंतिम लढतीत आनंद साहू याने ऋषिकेश कुलकर्णीचा 15-13, 11-15, 15-06 असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपद पटकावले. याच महिला गटात अव्वल मानांकित नुपूर बर्वेने दुसऱ्या मानांकित अमृता आगाशेचा 15-09, 15-09 असा पराभव करून विजेतेपद मिळवले.

40 वर्षांवरील पुरुष गटात दुसऱ्या मानांकित हर्षद भागवतने अव्वल मानांकित आदित्य काळेचा 15-07, 15-04 असा पराभव करून विजेतेपद पटकावले. महिला गटात मंजुषा सहस्त्रबुद्धेने दुसऱ्या मानांकित मोनिका गर्गचा 15-07, 15-05 असा पराभव करून विजेतेपद मिळवले.

स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या खेळाडूना करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण रायसोनी एज्युकेशनचे चेअरमन सुनील रायसोनी, जीएच रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे विभागीय संचालक डॉ. आर. डी. खराडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

## स्वप्नाली, नक्ष, श्रेयश, कौस्तुभ, नीरव, ईशान, पृथा यांचा सहभाग निश्चित

**पुणे :** डॉक्टर सतीश ठिगळे स्मृती प्लेयर्स चषक जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धा २ ते ६ जुलै आयोजित केली गेली आहे . या स्पर्धेस बालुफ ऑटोमेशन व ज्येष्ठ खेळाडूंनी आर्थिक सहकार्य केले आहे या स्पर्धेत स्वप्नाली नराळे, नक्ष महाजन, श्रेयश माणकेश्वर, कौस्तुभ गिरगावकर, नीरव मुळ्ये, ईशान खांडेकर, पृथा वर्टीकर इत्यादी नामवंत खेळाडूंचा सहभाग निश्चित झाला आहे. स्पर्धेचे सहसचिव श्रीराम कोनकर व बालुफ ऑटोमेशनचे व्यवस्थापकीय संचालक आणि स्पर्धेचे सहसचिव डॉक्टर उदय भालचंद्र यांनी सांगितले की, ही स्पर्धा सिम्बायोसिस क्रीडा केंद्र (प्रभात रस्ता) येथे होणार आहे. प्लेयर्स कपचे हे २५ वे वर्ष असून पुणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन २०२५-२६ या वर्षासाठी त्यांची तिसरी जिल्हा रँकिंग टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करीत आहे. माजी खेळाडूंना एकत्र आणण्याच्या दिवंगत डॉ. सतीश थिगळे यांच्या दृष्टिकोनाला श्रद्धांजली म्हणून, ही स्पर्धा त्यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आली आहे. सिम्बायोसिस स्पोर्ट्स सेंटरने हे ठिकाण मोफत उपलब्ध करून देऊन आपला पाठिंबा सुरू ठेवला आहे. या स्पर्धेत शरण्या पटवर्धन, आद्या गवात्रे, तनया अभ्यंकर, स्पृहा बोरगावकर, स्वरदा साने, स्वप्नाली नराळे, नक्ष महाजन, श्रेयश माणकेश्वर, कौस्तुभ गिरगावकर, नीरव मुळ्ये, ईशान खांडेकर, पृथा वर्टीकर आदी मान्यवर खेळाडू या स्पर्धेत सहभागी होत आहेत. ही स्पर्धा पुरुष एकेरी व दुहेरी,महिला एकेरी, प्रौढ ४० व ६० वर्षावरील, ११ वर्षांखालील ,१३ वर्षांखालील ,१५ वर्षांखालील, १७ वर्षांखालील,१९ वर्षांखालील मुले व मुली या गटात होणार आहे. स्पर्धेसाठी मुख्य पंच म्हणून मधुकर लोणारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या स्पर्धेला ३८९ प्रवेशिका मिळाल्याने प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. स्पर्धेसाठी ८४ हजार ५०० रुपयांची बक्षिसे दिली जाणार आहेत. बक्षिसाच्या रकमेव्यतिरिक्त, पदके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे दिली जातील.

## प्रथम श्रेणी सामन्यांसाठी व्हेरॉक-वेंगसरकर अकॅडमीचे मैदान सज्ज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व्हेरॉक-वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीमध्ये उभारण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकाशझोत यंत्रणेची चाचणी नुकतीच यशस्वीरित्या पार पडली. त्यामुळे येणाऱ्या हंगामात येथे प्रथम श्रेणी सामन्यांचे आयोजन शक्य होणार आहे.

या प्रकल्पाद्वारे मैदानावर रात्रीच्या सामन्यांसाठी आवश्यक प्रकाशझोत प्रणाली कार्यान्वित झाली आहे. या शिवाय पावसाळी सरावासाठी सहा कृत्रिम खेळपट्ट्यांचे ईनडोअर हॉल, तसेच सामन्यादरम्यान इतर राज्यांतील खेळाडू, व्यवस्थापक व पंच यांच्यासाठी पॅव्हेलियनमध्ये १८ खोल्यांची निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमासाठी पिंचिंमनपाचे विशेष योगदान उल्लेखनीय असून, त्यांच्या पुढाकारामुळेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुविधा स्थानिक खेळाडूंना मिळू शकल्या आहेत.

अकॅडमीच्या प्रायोजकत्वाची धुरा वाहणाऱ्या व्हेरॉक इंजिनिअरिंग कंपनीचे देखील विशेष आभार मानले जात आहेत. त्यांच्या पाठबळामुळे खेळाडूंना मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. यामुळे येथे घडणाऱ्या खेळाडूंना प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये निवड होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

दरवर्षी अकॅडमीच्या वतीने विविध वयोगटांतील सुमारे दहा स्पर्धांचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे, महिलांच्या क्रिकेटलाही येथे तितकेच प्राधान्य दिले जात असून, महिला क्रिकेटपटूंसाठी स्वतंत्र प्रशिक्षण सुविधा पुरवण्यात येतात. या सर्व घडामोडींचा परिणाम म्हणून व्हेरॉक-वेंगसरकर क्रिकेट अकॅडमी महाराष्ट्रातील आघाडीची क्रिकेट अकॅडमी ठरली आहे, याचा स्थानिक क्रीडाप्रेमींना अभिमान वाटतो.

## भारत-बांगलादेश मालिकेबाबत सस्पेन्स कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ढाका :** बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे (बीसीबी) अध्यक्ष अमिनुल इस्लाम यांनी सांगितले आहे की, भारताविरुद्धच्या एकदिवसीय आणि टी-२० मालिकेबाबतची परिस्थिती अद्याप स्पष्ट नाही. ते म्हणाले की, भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) त्यांच्या सरकारच्या मंजुरीची वाट पाहत आहे.

भारत १७ ऑगस्टपासून बांगलादेश दौऱ्यावर जाणार आहे, जिथे ३ एकदिवसीय आणि ३ टी-२० सामने खेळवले जाणार होते. परंतु सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे ही मालिका वेळेवर होणे कठीण दिसते. जर ही मालिका ऑगस्टमध्ये होऊ शकली नाही, तर आम्ही भविष्यात दुसऱ्या वेळी ती आयोजित करण्याचा प्रयत्न करू, असे अमीनुल म्हणाले.

सोमवारी (३० जून) शेर-ए-बांगला राष्ट्रीय स्टेडियममध्ये झालेल्या बोर्ड बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना अमिनुल इस्लाम म्हणाले, "आमची बीसीसीआयशी सकारात्मक चर्चा सुरू आहे. ही मालिका ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्ये होईलच असे नाही, आम्ही ती दुसऱ्या वेळी आयोजित करण्याचा विचार करत आहोत. बीसीसीआय त्यांच्या सरकारच्या मंजुरीची वाट पाहत आहे."

## राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा : महाराष्ट्राच्या मुली उपांत्यपूर्व फेरीत दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** महाराष्ट्राच्या मुलींनी " १ल्या १८वर्षाखालील मुले व मुलींच्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत" उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश केला. प्रेमनगर आश्रम, राणीपूर जवळ, हरिद्वार, उत्तर प्रदेश येथे सुरू असलेल्या मुलींच्या उप उपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राच्या मुलींनी मध्य प्रदेशचा ३४-१४ असा पाडाव केला. झंझावाती सुरुवात करीत पूर्वार्धात २६-०८ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने उत्तरार्धात सावध खेळ करीत विजयाला गवसणी घातली. सेरेना म्हस्करचा अष्टपैलू खेळ तिला संतोषी थोरवेची मिळालेली चढाईची, तर सानिका वाकसे, पूजा चिंदरकर यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे सहज शक्य झाले. मध्य प्रदेशचा प्रतिकार अत्यंत दुबळा ठरला.

या अगोदर झालेल्या इ गटातील साखळीतील शेवटच्या सामन्यात महाराष्ट्राने छत्तीसगडचा प्रतिकार ४५-३४ असा मोडून काढला. विश्रांतीला महाराष्ट्र १९-२२ अशा ०३ गुणांनी पिछाडीवर होते. विश्रांतीनंतर महाराष्ट्राने टॉप गिअर टाकत सामना आपल्या बाजूने झुकविला. सेरेना म्हसकर, बिदिशा सोनार, सानिका वाकसे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते. महाराष्ट्राने गटात प्रथम क्रमांक मिळवित बाद फेरी गाठली.

## राष्ट्रीय कराटे स्पर्धेत चॅम्पियन कराटे क्लबचा डंका

# पुण्याच्या तीन खेळाडूंची उज्ज्वल कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पुणे :** कराटे इंडिया ऑर्गनायझेशन यांच्या वतीने नुकतीच पार पडलेल्या चौथ्या नॅशनल कराटे चॅम्पियनशिप मध्ये देशभरातील ३० राज्यांतील १५०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या प्रतिनिधी म्हणून चॅम्पियन कराटे क्लब, पुणे येथील २८ खेळाडूंना निवडण्यात आले होते.

या खेळाडूंमध्ये सहकारनगर, पुणे येथील सीकेसी क्लबच्या ईशा रत्नपारखी, सचित अग्रवाल आणि प्रांजल अवचिटे या तीन खेळाडूंनी आपली निवड निश्चित केली होती. त्यांनी आपल्या जबरदस्त खेळ कौशल्याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली.

७ वर्षे वयोगटातील (-२० किलो) सब-ज्युनिअर कुमिते प्रकारात, ईशा रत्नपारखी हिने रौप्य पदक, सचित अग्रवाल यानेही रौप्य पदक जिंकून राष्ट्रीय पातळीवर आपली चमकदार कामगिरी सादर केली. चॅम्पियन कराटे क्लबच्या संपूर्ण संघाने एकूण ३ सुवर्ण,२ रौप्य आणि ५ कांस्य पदकांची कमाई करत राज्याच्या विजयी घडामोडीत महत्त्वाची भर घातली.

या सर्व खेळाडूंना सेंसेई वेदांत तडवळकर यांचे मार्गदर्शन लाभले. ते सान-दान ब्लॅक बेल्ट, सीकेसी पुण्याचे मुख्य प्रशिक्षक तसेच राष्ट्रीय पदक विजेते आहेत. चॅम्पियन कराटे क्लब इंडियाचे संस्थापक शिहान संतोष मोहिते यांनी सर्व विजेत्यांचे आणि सहभागी खेळाडूंचे अभिनंदन करत त्यांच्या अथक मेहनतीचे आणि चिकाटीचे कौतुक केले.

ही उल्लेखनीय कामगिरी केवळ सीकेसी क्लबसाठीच नव्हे, तर संपूर्ण पुण्यासाठी गौरवाची बाब आहे. या विजयामुळे शहरातील नवोदित कराटेपटूंसाठी प्रेरणादायी मार्ग निर्माण झाला असून पुण्याच्या कराटे क्षेत्रातील क्षमतेची चमक राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे.

#रा